
यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - १९७९



891.46501
KAR
59246

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

923.60954
NAG
G04278

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04278
DATE: 8/6/2015

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष ७ वे १९७९

923.60954/NAG
Y.C.P
G04278
LIBRARY

किंमत साडेसात रुपये

5 9 2 4 6

*

प्रकाशन :

मा. श्री. प्रतापराव भोसले,

माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

यांच्या शुभहस्ते

१२ मार्च १९८०

नगरपालिका नगरवाचनालय
कराड
या पुस्तकाचे वर्गी. – तारि
केलेले आहे.
ता. 14/7/93

Y. B. CHAVAN LIBRARY
MUMBAI
CALL NO.
ACC. NO.:
DATE

*

प्रकाशक :

श्री. पी. डी. पाटील

अध्यक्ष,

करांड नगरपालिका, कराड.

सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लि.,
यशवंतनगर

*

मुद्रक :

**कराड मुद्रणालय, कराड.**

२३९/२० शनिवार पेठ,

कराड.

**मुखपृष्ठ छपाई व रचना** : व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनीट, कोल्हापूर.

नगरपालिका नगरवाचनालय
कराड, जिल्हा सातारा



# मा. यशवंतराव चव्हाण

# मनोगत

'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' ही १९७३ साली सुरू झाली. १९७९ सालातील यशवंतरावांच्या वाढदिवशी ज्या थोर विचारवंतांची व्याख्याने झाली, त्यांची ही मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देताना मनाला एक समाधान वाटते.

साहित्य, संगीत, क्रीडा, करमणूक या समाजजीवनाला स्पर्श करणाऱ्या व सामर्थ्य देणाऱ्या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगरपालिकेने या संदर्भात स्थानिक जनतेत साहित्य, कला आणि क्रीडा या विषयाबद्दल एक वैशिष्टचपूर्ण अभिरुची निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

कराडचे एक थोर सुपुत्र, महाराष्ट्राचे नेते, अखिल भारतीय कीर्तीचे राजकारणी व विचारवंत यांचे विचार, कार्य आणि कर्तृत्व समाज परिवर्तनाला उपकारक ठरले आहे. या निमित्ताने त्यांचा वाढदिवस आम्ही नगरपालिकेतर्फे महाराष्ट्रांतील थोर व विद्वान विचारवंतांची मुख्यतः समाजकारण व अर्थकारण या विषयावर व्याख्याने आयोजित करून यशवंतरावजींच्या नावे गेल्या सात वर्षांपासून 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' या नावाने सुरु केलेली आहे.

महाष्ट्रामध्ये ब्रिटीश अमदानीपासून राजकारण आणि समाजकारण यांचे दोन वेगवेगळे प्रवाह चालत आलेले आहेत. हे दोन्ही प्रवाह कधी एकमेकांच्या जवळ आलेले आहेत तर कधी दूर गेलेले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनतर या दोन्ही प्रवाहांना एकत्रित आणण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यात मा. यशवंतरावजींना फार मोठे प्राधान्य द्यावे लागेल.

आमच्या निमंत्रणाला मान देऊन मा. आमदार पी. बी. साळुंखे, कोल्हापूर व प्राचार्य सत्यरंजन साठे, पुणे या दोन थोर विचारवंतानी या मालेत व्याख्याने दिली. त्याबद्दल त्यांचे कृतज्ञता पूर्वक आभार मानणे आमचे कर्तव्य आहे.

व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनिट, कोल्हापूरचे डिझाईन आर्टिस्ट श्री. भूपाल मांगोरे यांनी सदर पुस्तिकेचे बाह्यांग आकर्षित व मनोवेधक करण्यासाठी जे परिश्रम घेतले. तसेच हे ‘शब्दांकित’ स्वरूप प्रकट होताना प्रा. वि. पु. गोखले यांनी जे परिश्रम घेतले आहेत त्यांचे आणि कराड मुद्रणालयाचे व्यवस्थापक नि कामगार यांनी ही पुस्तिका वेळेवर व सुबक छापून दिली त्या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

या व्याख्यानमालेत जे जे विचारमंथन, चिंतन होईल ते ते त्याच विचारवंतांच्या भाषेत ‘शब्दांकित’ करण्याच्या हेतूने प्रतिवर्षी व्याख्यानांची पुस्तिका प्रसिद्ध केली जावी हा ही हेतू आहे. ही पुस्तिका समाज पुरुषाच्या हाती देताना एकच प्रार्थना—

मा. यशवंतरावजींना राष्ट्रसेवेसाठी उदंड आयुरारोग्य लाभो ! त्यांच्या जीवनाचा आदर्श नव्या पिढीला जीवनाची विधायक दृष्टी देणारा ठरो !

कराड — पी. डी. पाटील

दिनांक १२ मार्च १९८० — नगराध्यक्ष

# ' अं त रं ग '

१० व ११ मार्च १९७९

" महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे "

आमदार पी. बी. साळुंखे,

कोल्हापूर.

---

१२ मार्च १९७९

" भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन "

डॉ. सत्यरंजन साठे

प्राचार्य, लॉ कॉलिज, पुणे.

नगरपालिका नगर वाचनालय
कराड, जिल्हा सातारा.



# 'महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे-टप्पे'

**श्री. पी. बी. साळुंखे**

१९१८ साली पेशवाई बुडाली. इंग्रजांची राजवट सुरू झाली. हिंदुस्थानातील लोकांना पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण देण्यात येऊ लागले. पाश्चात्य संस्कृतीशी एतद्देशीय लोकांचा संबंध येऊ लागला पाश्चात्य शिक्षण घेतल्यामुळे आपल्या धर्मातील व चालीरितीतील उणिवा व दोष होते, सामाजिक विषमता होती, वर्णवर्चस्व, अस्पृश्यता, स्त्रीदास्य होते ते नाहीसे करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. हे प्रयत्न करण्यामध्ये काही विचारवंत होते, काही कर्ते सुधारक होते, काही समाजक्रांतिकारक होते.

गेल्या १५० वर्षांमध्ये ज्या सामाजिक चळवळी झाल्या त्यांचे स्थूलमानाने चार कालखंड पाडता येतील. पहिला कालखंड १८१८ ते १८४८. या कालखंडाचे अध्वर्यू बाळशास्त्री जांभेकर होते. दुसरा १८४८ ते १८९४. या कालखंडाचे प्रणेते म. ज्योतिबा फुले होते. तिसरा कालखंड १८९४ ते १९२५. याचे नेतृत्व राजर्षी शाहू महाराज यांनी केले आणि चौथा कालखंड १९२५ ते १९५६. याचे प्रतिनिधित्व डॉ. आंबेडकरांनी केले.

सामाजिक क्रांतीची चळवळ कलेकलेने वाढत गेली. या चारही कालखंडांमध्ये काम करणारी जी मंडळी होती त्यांचा पिंड, त्यांनी केलेले कार्य हे विचारात घेता या प्रत्येक कालखंडास अनुक्रमे ' झुळूक ', ' झंझावात ', ' वादळ ' व ' तुफान ' अशी एका एका शद्बात वर्णन करावयाचे झाले तर नावे देता येतील. या दोन व्याख्यानामध्ये महाराष्ट्रातील गेल्या दीडशे वर्षातील हे जे सामाजिक क्रांतीचे चार टप्पे आहेत त्यांचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**आमदार पी बी. साळुंखे**

कोल्हापूर.

जन्म : १८।२।१९१३

शिक्षण : एल् एल् बी.

व्यवसाय : वकिली.

घरची गरिबी, नोकरी करीत करीत शिक्षण.

१९४८ ते १९५२ कोल्हापूर म्युनिसिपल कौन्सिलवर बिनविरोध निवड. स्थायी समितीचे चेअरमन म्हणून काम. स्कूल बोर्डाचे सभासद. म्युनिसिपल प्रजापक्षाचे नेते.

१९५७ ते ६२ कोल्हापूर शहरातून विधानसभेवर निवड.

१९६२ ते ६७ डिव्हिजनल सिलेक्शन बोर्डाचे सभासद.

१९६७ ते ७० महाराष्ट्र रेव्हिन्यू ट्रॅब्युनलचे सभासद.

१९७० ते ७९ विधान परिषदेचे सभासद.

लेजिस्लेटर या नात्याने एस्टिमेटस् कमेटी, पब्लिक अकौंटस् कमिटी, प्रिव्हिलेजीस कमिटी, ॲश्युअरन्स कमिटी, भाषा सल्लागार समिती इत्यादी समित्यांवर कामे केली आहेत.

सध्या प्रिव्हिलेजीस कमिटीचे अध्यक्ष म्हणून काम पाहातात.

दोन वेळा कोल्हापूर नगरवाचन मंदिराचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड.

" राजर्षी शाहू गौरव ग्रंथ " संपादक मंडळाचे अध्यक्ष.

६५० पानांचा ग्रंथ महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित. पाच हजार प्रतींची पहिली आवृत्ती पाच महिन्यांत संपून लवकरच दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे.

सध्या ' Rajarshi Shahu, A Piller of Social Democracy ' या इंग्रजी ग्रंथाचे संपादन करीत आहेत. लवकरच हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

' राजर्षी शाहू ' व ' विठ्ठल रामजी शिंदे ' यांच्या जीवनकार्यावर शिवाजी विद्यापीठ व मराठवाडा विद्यापीठ येथे अभ्यासपूर्ण व्याख्याने दिलेली आहेत.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान कमिटीचे अध्यक्ष (१९७४ ते १९७९). निष्ठावंत लोकसेवक, व्यासंगी, पुरोगामी व समतोल विचारवत

पांडुरंग बापूजी साळुंखे

पत्ता :

४२७ शिवाजी पेठ, सरदार तालमीजवळ

कोल्हापूर.

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेचे अध्यक्ष, नगरपालिकेचे उपाध्यक्ष, नगरसेवक आणि महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतिबद्दल कुतूहल असणाऱ्या कऱ्हाड निवासी माझ्या बंधू भगिनींनो !

माझे परममित्र श्री. पी. डी. पाटील हे कऱ्हाड नगरपालिकेचे गेली सतत २५ वर्षे अध्यक्ष आहेत. याचाच अर्थ नगराध्यक्ष या नात्याने यंदा त्यांचे रौप्यमहोत्सवी वर्ष चालू आहे. साधारणपणे कुठल्याही नगरपालिकेची परिस्थिती पाहिली तर एखाद्या व्यक्तीला नगराध्यक्षपदाचा मान हा एक वर्षापेक्षा अधिक काल मिळत नाही. परंतू श्री. पी. डी. पाटील हे या गोष्टीला ठळक अपवाद आहेत. त्यांनी हा एक विक्रमच केलेला आहे. कऱ्हाडवासी जनतेचा श्री. पी. डी. पाटील यांच्यावर किती लोभ आहे याचेच हे दृष्य प्रतीक आहे. असा लोभ असण्याचे कारण श्री. पी. डी. पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत नवीन नवीन उपक्रम सुरू करून कऱ्हाड नगरपालिकेला एक आदर्श नगरपालिका असा दर्जा मिळवून दिला आहे श्री. पी. डी. पाटील यांनी नगरपालिकेतर्फे अनेक उपक्रम सुरू केलेले आहेत याची प्रचीती कऱ्हाडचे नागरिक या नात्याने आपणाला आहेच परंतू माझ्यासारख्या त्रयस्थ माण–साला त्यांचे दोन उपक्रम विशेषत्त्वाने आकर्षित करतात. पहिला उपक्रम नगरपालिकेने चालविलेले अद्यावत सुखसोयींनी युक्त असे एक उत्कृष्ट ग्रंथालय आणि दुसरा उपक्रम म्हणजे महाराष्ट्राचे थोर सुपुत्र मा. यशवंतरावजी चव्हाण यांनी देशासाठी आता–पर्यंत जो त्याग केलेला आहे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' हा होय. गेल्या ७ वर्षा–पासून ही व्याख्यानमाला अखंडपणे चालू आहे. या व्याख्यानमालेत मी दोन पुष्पे गुंफावीत अशी नगराध्यक्ष मला गेल्या तीन चार

वर्षांपासून आज्ञा करीत आहेत. मीही त्या गोष्टीला होकार देत आलो आहे. परंतू या ना त्या कारणामुळे आजपर्यंत तो योग जमून आला नाही. चालू वर्षी मात्र मी या व्याख्यानमालेत आपली हजेरी कोणत्याही परिस्थितीत लावायचा दृढनिश्चय केलेला होता. आपल्याला दिलेला शब्द पाळण्याची संधी आपण मला आणून दिलीत याबद्दल श्री. पी. डी. पाटील यांचे, नगर-पालिकेचे, नगरपालिकेने चालविलेल्या वाचनालयाचे आणि या ठिकाणी उपस्थित असणाऱ्या आपणा सर्वांचे मी अंत:करणपूर्वक व कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

कऱ्हाड नगरीला अभिमान वाटावा असेच मा. यशवंतरावांचे कर्तृत्त्व आहे पण ते महाराष्ट्राचे नेते आहेत आणि अखिल भार-तीय कीर्तीचे राजकीय पुढारी आहेत. यशवंतरावजींच्या संबंधी थोडक्यात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल :-

> " प्रज्ञा आणि प्रतिभा, विवेक आणि विचार, संयम आणि सहिष्णुता, मर्दुमकी आणि मुत्सदेगिरी या गुणांनी मंडित असं हे व्यक्तिमत्व आहे. यशवंतरावजी ही नुसती व्यक्ती नाही. ती एक शक्ती आहे. नुसती शक्ती नाही तर तो एक विचार आहे. नुसता विचारही नाही. ती एक विचारधारा आहे. नुसती विचारधारा नाही तो एक आचार आहे. किंबहुना आचार संहिता आहे. या व्यक्तीत, या शक्तीत, या विचारात, या आचारात, या विचारधारेत आणि या आचारसंहितेत महाराष्ट्राचं आणि भारताचं महन्मंगल करण्याचं प्रचंड सामर्थ्य साठविलेलं आहे. "

तेव्हा अशा प्रकारच्या थोर आणि महननीय व्यक्तीच्या नावानं जी व्याख्यानमाला सुरू केलेली आहे त्यामध्ये सहभागी होण्याचा

मान व सुवर्णसंधी मला आपण प्राप्त करून दिली याबद्दल मी पुन्हा एक वेळ आपले आभार मानतो.

प्रत्यक्ष विषयाला सुरवात करण्यापूर्वी अध्यक्ष महाराजांनी माझ्या वर आणखी एक कामगिरी सोपाविली आहे ती म्हणजे गेल्या वर्षी माझे मित्र डॉ. भालचंद्र फडके यांनी " डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती " या विषयावर दिलेल्या व्याख्यानाचं पुस्तक प्रकाशित करणं ही होय. प्रतिवर्षी वक्त्यांची व्याख्याने झाल्यानंतर ती व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध कर–ण्याचा आपला हा उपक्रम अभिनंदनीय व स्तुत्य आहे. या मुळे कोणत्या वक्त्यांचे कोणत्या विषयावर केव्हा काय भाषण केले याची ग्रंथरूपाने नोंद रहाते. ही फार महत्वाची गोष्ट आहे. व्याख्यानाला वक्ता येतो. व्याख्यान देतो आणि निघून जातो. जी मंडळी व्याख्यानाला हजर राहू शकत नाहीत त्यांना अशा पुस्तकाच्या प्रसिद्धीमुळे वक्त्याने विचार काय मांडले आहेत ही वाचण्याची संधी मिळते. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेमध्ये आपण प्रामुख्याने राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण या तीन विषयावर प्रतिवर्षी व्याख्याने आयोजित करत आलेला आहात. विद्वान, व्यासंगी आणि विचारवंत मंडळींनी आतापर्यंत दिलेली व्याख्याने आपण पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहेत त्या पैकीच गेल्या वर्षी झालेलं व्याख्यान ग्रंथरूपाने तयार झालेल असून ते आपण आज माझ्या हस्ते प्रकाशित व्हावं अशी इच्छा प्रदर्शित केली आहे याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो आणि या पुस्तकाचं प्रकाशन झालं असंही जाहीर करतो.

आज आणि उद्या असे दोन दिवस माझी आपल्यापुढे व्याख्याने आहेत. माझ्या व्याख्यानाचा विषय " महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे " असा आहे. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाली.

ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य आले. ब्रिटीश राजवट सुरू झाली. या दिवसापासूनच महाराष्ट्रामध्ये सामाजिक क्रांतीच्या प्रक्रियेला सुरवात झाली. इतिहास कालात सामाजिक क्रांतीच्या दिशेने चुकूनमाकून काही पावले पडलेली दिसून येतात. परंतू सामाजिक क्रांतीच्या दृष्टीने जाणीवपूर्वक व सातत्याने प्रयत्न झाल्याचे दृष्य दिसत नाही. परंतू तो काल ही असा होता की सामाजिक प्रश्नाकडे लक्ष देण्याची समाजाची प्रवृत्तीही नव्हती व कुवतही नव्हती. या दृष्टीने तेराव्या शतकामध्ये ज्ञानेश्वरांनी पहिल्यांदाच मराठी भाषेत भगवद्गीतेवरील टीका लिहून सनातन्यांच्या विरूद्ध पहिलं बंड पुकारलं. तत्पूर्वी ग्रंथनिविष्ठभाषा म्हणजे फक्त संस्कृत भाषा होती. विद्वता जी काय असेल ती फक्त संस्कृत भाषेतच व्यक्त करावयाची असा प्रघात होता. ज्ञानदेवांनी या वृत्तीविरूद्ध पहिला हल्ला चढविला :-

माझा मऱ्हाठाचि बोलु कौतुके ।
परि अमृतातेहि पैजा जिंके ।।
ऐशी अक्षरें रसिके । मेळवीन ।।

असे म्हणून मराठी भाषेला अमृताची उपमा देवून वयाच्या १८ व्या वर्षी तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा मनोहारी संगम झालेली अशी ज्ञानेश्वरी लिहिली.

त्या नंतर २०० वर्षे गेली. संत एकनाथ महाराजांनी खऱ्या खुऱ्या अर्थाने सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पैठणमध्ये राणू नावाच्या एका महार समाजातील व्यक्तीच्या घरात जाऊन त्यांनी भोजन केले. आज आपण सर्वजण नेहमीच सहभोजन करीत असल्याने ही गोष्ट आपणाला फारशी महत्त्वाची वाटणार नाही. परंतू ६०० वर्षांपूर्वी अशा

नगरपालिका नगरवाचनालय
कराड. जिल्हा सातारा.

प्रकारे अस्पृश्याच्या घरी जेवण करणे हे निश्चित महत्त्वाचे होते.

त्या नंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी मोंगलाशी लढून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. राजकीय क्रांतीबरोबरच महाराजांना सामाजिक क्रांतीची दृष्टी होती, याची चुणूक दाखविणाऱ्या काही घटना महाराजांच्या चरित्रात आपणाला दिसून येतात. दुर्दैवाने शिवाजी महाराज वयाच्या ५० व्या वर्षी दिवंगत झाले. सगळी हयात आदिलशाही, निजामशाही आणि मोंगलाई यांच्या विरुद्ध लढण्यात गेल्याने समाजकारणाकडे त्यांना फारसे लक्ष देता आले नाही. परंतू तशाही प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी केलेल्या २।३ गोष्टी सामाजिकदृष्टया फार महत्त्वाच्या आहेत. फलटणचे बजाजी निंबाळकर आणि महाराजांचा सेनापती नेताजी पालकर या दोन पराक्रमी पुरुषांना मोंगलांनी सक्तीनं धर्मांतर करावयास लावलं होतं या दोन्ही लोकांना महाराजांनी परत हिंदूधर्मात घेतले आणि बजाजी निंबाळकरांच्या मुलाला आपली मुलगी देऊन रक्तामासाची नाती जोडण्यास महाराजांनी मागे पुढे पाहिले नाही. नेताजी पालकर याला औरंगजेब बादशहाने महमद कुलीखान हे नाव दिले होते आणि त्याला अफगाणिस्थान जिंकण्यासाठी उत्तरेकडे पाठविले होते या पराक्रमी पुरुषाने काबूल, कंदाहार जिंकून बादशहाच्या मुलखात सामीलही केले होते. नंतर त्याला औरंगजेब बादशहाने दिलेरखानाबरोबर महाराष्ट्र जिंकण्यासाठी पाठविले. महाराष्ट्रात आल्यानंतर इथले डोंगर, इथल्या दऱ्या, इथल्या नद्या हे पाहून त्याला पश्चाताप झाला आणि आपण महाराजांची पूर्ववत सेवा करावी म्हणून तो दिलेरखानाच्या छावणीतून महाराजांना भेटण्यासाठी गेला. महाराजांनी त्याला उराशी कवटाळून धरलं आणि परत हिंदू धर्मात घेतलं. बजाजी निंबाळकर व नेताजी पालकर यांना परत

हिंदुधर्मात घेण्याची जी गोष्ट महाराजांनी केली त्यांत त्यांची सामाजिक दृष्टीच व्यक्त होते हे आपल्याला विसरता येणार नाही. आणखी दोन गोष्टी छ. शिवाजी महाराजांनी केल्या. मराठीभाषेवर आधीच्या तीनही शतकांत बहामनी राज्याच्या स्थापनेपासून फारशीभाषेचा पगडा फार मोठ्या प्रमाणात बसला होता तो नाहीसा करण्यासाठी त्यांनी अमात्य रघुनाथपंत हणमंते यांचेकडून " राज्यव्यवहारकोश " लिहून घेतला. त्या प्रमाणेच महाराजांनी पोर्तुगीजांचेपासून एक छापखानाही विकत घेतला होता. त्या छापखान्याचा निश्चितपणे काहीतरी उपयोग करावा ही महाराजांची मनीषा होती. महाराज जर अधिक काळ जगले असते तर त्यांच्या हयातीतच मराठी ग्रंथ छपाईला सुरवात झाली असती. इ. स. १८०५ साली पहिले मराठी पुस्तक प्रसिद्ध झाले. त्या ऐवजी ते महाराजांचे कारकीर्दीतच झाले असते. महाराजांच्या मृत्युनंतर १५० वर्षांनी पेशव्यांची सत्ता संपुष्टात आली. इंग्रजांचा बावटा शनिवारवाड्यावर चढला. इंग्रजांशी संबंध आल्यानंतर पौर्वात्य संस्कृती आणि पाश्चिमात्य संस्कृती यांचा एक प्रकारे संघर्षही सुरू झाला. आणि सहकार्यही सुरू झाले. हिंदी लोकांना इंग्रजीभाषेतून पाश्च्यात्य पद्धतीचे शिक्षण देण्याचा निर्णय लॉर्ड मेकॉले आणि माऊंट स्टुअर्ट एलफिनस्टन यांनी घेतला आणि इथून पुढेच भारतातील सामाजिक क्रांतीला सुरवात झाली. इंग्रजी शिक्षणाशी संबंध आल्यामुळे इंग्रजांची राज्यपद्धती, इंग्रजांच्या लोकशाहीच्या कल्पना, इंग्रजांच्या राजकीय व सामाजिक संघटनात्मक संस्था, लेखन स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य वगैरे नव्यानव्या कल्पनांचा एत्तदेशीय लोकांना परिचय होऊ लागला. या परिचयातूनच स्थानिक लोकांनी ब्रिटीश सरकारचा अनुग्रह घेत आपल्या संस्था वाढवायला सुरवात केली.

आपला धर्म म्हणजे पवित्रधर्म, आपल्या धर्मामध्ये काहीही न्यून नाही अशी त्या वेळच्या लोकांची ठाम कल्पना होती. कदाचित वेद आणि वेदांत यांच्या मधला धर्म आणि तत्वज्ञान चांगलेही असू शकेल. परंतू प्रत्यक्षात जो धर्म आचरला जात होता त्या मध्ये कर्मकांडाचे स्तोम फारमोठ्या प्रमाणात होतं. जप, तप, उपास, तापास व्रतवैकल्यं या मधेच सर्व सामान्य माणूस पूर्णपणे बुडालेला होता. समुद्रपर्यटन करणे हे पापात गणलं जात होतं. एकवेळची आपली भारतीय संस्कृती दक्षिणेत जावा-सुमात्रा पर्यंत उत्तरेत, मध्य आशियातील उझबेगिस्थान पर्यंत आणि आग्नेय आशियात जिथं आज युद्ध चाललेलं आहे. त्या व्हिएतनाम, लाओस, कंबो-डिया, सयाम व अतिपूर्वेकडे चीन आणि जपान वगैरे राष्ट्रांत पसरलेली होती. या सर्वभागांत बुद्धभिक्षू चालत गेलेले होते. समुद्र पर्यटन करून गेलेले होते. अशा प्रकारे ही भारतीय संस्कृती मोठ्या वैभवाने दशदिशांना पसरत असतानाच महाराष्ट्रातील स्थानिक कूपमंडुकवृत्तीची मंडळी समुद्र पर्यटन करणें हा गुन्हा आहे, हे पाप आहे आणि याबद्दल प्रायश्चित घेतले पाहिजे अशा प्रकारची दुराग्रही वृत्ती दाखवित होती. सुदैवाने छत्रपती शिवाजी महाराजांनी असल्या मनोवृत्तीला मुळीच भीक घातली नव्हती. १५ व्या शतकापर्यंत हिंदुस्थानावर ज्या स्वाऱ्या झाल्या होत्या त्या सर्व उत्तरेकडून खैबरखिंडीतून झाल्या होत्या. शक आले, हूण आले, मोंगल आले पण हे सर्व खैबरखिंडीतून आले. परंतू ब्रिटीश, फ्रेंच, डच, पोर्तुगीज वगैरे पाश्चात्य सत्ता समुद्रमार्गानें आल्या. त्यांच्याशी जर मुकाबला करायचा असेल, त्यांच्याशी जर यशस्वी तोंड द्यावयाचे असेल तर आपले आरमार सुसज्ज पाहिजे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या वेळच्या धार्मिक रूढी आणि अंध श्रद्धा यांचा मुलाहिजा न ठेवता आपलं स्वतःचं सुसज्ज असं आरमार तयार ठेवलं आणि डच, पोर्तुगीज, फ्रेंच, ब्रिटीश यांना यशस्वीपणे तोंड दिले.

पेशवाईमध्ये सगळाच रंग पालटला. संकुचित वृत्ती निर्माण झाली. विशेषत: उत्तर पेशवाईमध्ये समुद्रपर्यटन केलं की करणाऱ्याने प्रायश्चित घेतलं पाहिजे अशा प्रकारचा प्रघात सुरू झाला. याचं एक उदाहरण मी आपल्याला सांगतो राघोबादादा पेशवे यांनी आपल्याला पेशवेपद मिळावे म्हणून भले-बुरे सारे प्रयत्न चालविले होते परंतू त्यात त्यांना अपयश आले. निदान आपल्याला काहीतरी पेन्शन मिळावी म्हणून त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीकडे प्रयत्न चालविले. ईस्ट इंडिया कंपनीची मुख्यकचेरी इंग्लंडमध्ये होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाबरोबर बोलणी करण्याकरीता आपला वकील आबा काळे याला जहाजातून इंग्लंडला पाठविला. त्याने शिष्टाई केली आणि तो पुण्यास परत आला. पुण्यातल्या भटाभिक्षुकांनी आबा काळे याच्या विरुद्ध काहूर उठविले. आबा काळे याने समुद्र पर्यटन केलं असल्याकारणाने त्याने प्रायश्चित घेतल पाहिजे अशा प्रकारचा आग्रह धरला. कसल्या प्रकारचे प्रायश्चित घ्यावयाचे असा प्रश्न विचारल्यानंतर या गुन्ह्यांला देहांत प्रायश्चित आणि पुनर्जन्माशिवाय दुसरा मार्ग नाही असं त्याला सांगण्यात आले. त्यातून काही मार्ग निघतोय का काय याची चाचपणी केल्यानंतर त्या भिक्षुकांनी मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. तो मार्ग असा :-

> माणसाचा जन्म स्त्री योनीतून होत असतो तेव्हा या भिक्षुकांनी आबा काळे याला सांगितले की एक भलं मोठं सोन्याचं स्त्रीलिंग तयार करा ते स्त्रीलिंग एक खड्डा खणून त्यावर ठेवा. त्या खड्ड्यात आबा काळे याला बसवा आणि मग खड्ड्यात बसलेल्या आबा काळे यास त्या स्त्रीलिंगातून बाहेर काढून घ्या म्हणजे मग त्याचा पुनर्जन्म झाला व त्याचे प्रायश्चित मिळाले. हे स्त्रीलिंग सोन्याचंच केलं पाहिजे ही त्यांची अट.

इतिहासकालातला तो माणूस वयानं नाही म्हटलं तरी ४०-४५ वर्षाचा खास असेल. अशा माणसाला स्त्रीलिंगातून बाहेर काढावयाचे म्हणजे ते स्त्रीलिंग किती मोठं करावं लागलं असेल याचा आपण विचार करा. मला वाटते नाही नाही म्हटले तरी हजार बाराशे तोळे सोने खचित लागले असेल. आजच्या बाजारभावानें म्हणजे तोळयाला सुमारे हजार रुपये अशी किंमत धरली तर ती १० लाखाचे घरात सहज जाईल. अशा प्रकारचं, इतक्या मोलाचं, इतक्या तोळयाचं स्त्रीलिंग तयार करून खडयात बसविलेल्या आबा काळे याला दोन चार भिक्षुकांनी त्या स्त्रीलिंगातून बाहेर घेतला आणि त्याचा पुनर्जन्म झाला. योग्य ते प्रायश्चित घेतले असं त्यांनी जाहीर केले. त्या ठिकाणी जमलेल्या प्रायश्चित देणाऱ्या भिक्षुकांनी ते सुमारे दहा लाख रु. किंमतीचं सोन्याचं स्त्रीलिंग आपसात वाटून घेतलं आणि प्रायश्चिताची पूर्तता झाली. भिक्षुकांना पैसा किती दिला, द्रव्य किती दिलं, सोनं किती दिलं, नाणं किती दिलं, याच्यावर प्रायश्चिताचे दर ठरलेले असत. असल्या प्रकारच्या या अंद्धश्रद्धा हिंदुधर्माला काळीमा लावत होत्या. अशाच प्रकारच्या काही गोष्टी आपल्या धर्मामध्ये प्रचलित होत्या. बालविवाह, स्त्रीशिक्षण, केशवपन, विधवा विवाहाला बंदी, जरठकुमारी विवाह, सतीची चाल या आपल्या धर्माच्या विटंबना करणाऱ्या गोष्टी फार मोठ्या प्रमाणात प्रचलित होत्या. त्या नष्ट केल्या पाहिजेत असे पाश्चात्य शिक्षण घेऊन तयार झालेल्या आणि पाश्चात्य संस्कृतीशी संबंध आलेल्या पहिल्या पिढीतील काही विचारवंत तरुणांना कटाक्षाने वाटू लागले. मुंबई हे त्यावेळी सामाजिक चळवळीचं महाराष्ट्रांतील मुख्य केंद्र होते. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, जगन्नाथ

शंकर शेठ, डॉ. भाऊदाजी लाड, वगैरे मंडळी आपल्या धर्मांमध्ये सुधारणा व्हावी म्हणून प्रयत्नशील होती. यापैकी बाळशास्त्री जांभेकर हे शास्त्री घराण्यात जन्माला आले होते. इंग्रजी शिक्षण घेतल्यानंतर तुलनात्मकदृष्टचा आपल्या धर्मामध्ये काहीतरी चुकते आहे, काहीतही दोष आहेत, काहीतरी उणीवा आहेत आणि त्या दूर करणे आवश्यक आहे म्हणून त्यांनी त्या दिशेने प्रयत्न करण्यास सुरवात केली. १८३२ साली 'दर्पण' नावाचं मराठी आणि इंग्रजी भाषेतलं पहिलं पाक्षिक त्यांनी सुरू केलं इथल्या प्रजाजनांची दुःखे काय आहेत, त्यांच्या अडचणी काय आहेत हे ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटीश सरकार यांना कळण्यासाठी इंग्रजी मजकूर आणि इथल्या लोकांना कळण्यासाठी मराठी मजकूर असे हे दोन भाषेतील पाक्षिक त्यांनी जाणून बुजून सुरू केले. या पाक्षिकाचे द्वारे त्यांनी सामाजिक सुधारणा स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार, विधवा विवाहाला उत्तेजन आणि बालविवाहाचे व जरठकुमारी विवाहाचे निषेध करणारे लेख लिहिले. हे करीत असताना भिक्षुक, सनातती आणि शास्त्री पंडितांच्या अंगाचा तीळपापड झाला. हा कोणीतरी आपला धर्म बुडविण्यासाठी निर्माण झालेला चांडाळ आहे अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. बाळशास्त्रींनी पुरस्कारलेल्या सुधारणा महाराष्ट्रातील लोकांना संपूर्णपणे अपरिचित होत्या. पाळण्यात सुद्धा लग्ने लावली जात होती. सहा महिन्याची मुलगी आणि पाच सहा वर्षांचा मुलगा यांची लग्ने होत असत. एखाद्या लहान मुलाला आई-बापांनी कौतुकानं तुझं लग्न ठरलं आहे म्हणून सांगितलं तर ते लहान मूल आईबापांना विचारायचं की बाबा माझं लग्न ठरलंय माझ्या लग्नाला मला तुम्ही घेऊन जाल काय? इतक्या अल्लडपणानं विचारणा केली जात असे. अशाप्रकारची ही जी लग्ने होत त्याचा परिणाम बाल विधवांची संख्या वाढण्यात होई. मुलग्याचा पुर्नविवाह होत असे पण मुलींच्या पुर्नविवाहाला

धर्माची बंदी होती. एखादी मुलगी बालविधवा म्हणून घरात राहिली तर तिला काडीची किंमत नसे. घरातील सांदी कोपऱ्यात तिला स्थान असे त्यातून पुढारलेल्या ब्राम्हण समाजामध्ये तिचे केशवपन करून अधिकच विटंबना करीत असत. बाकीच्या समाजामध्ये केशवपन करण्याची पद्धत नव्हती. तरी ब्राह्मण समाजातील विधवांप्रमाणेंच त्या समाजातील विधवांच्या हाल अपेष्टा होत असत. कारण पुर्नविवाह हा धर्मबाह्य होता. अशा स्थितीत पुर्नविवाहाची चळवळ जोरात सुरू करावी, बाल विवाहाला प्रतिबंध करावा, जरठकुमारी विवाहाला आळा घालावा या दृष्टीने महाराष्ट्रातले पहिले-वहिले जे सुधारक होते त्यांनी आपल्या कुवतीप्रमाणे प्रयत्न करायला सुरवात केली. या सुधारकांच्यामध्ये दोन प्रकारची मंडळी होती. एक विचारवंत आणि दुसरे कर्ते सुधारक. विचारवंत म्हणजे आपले विचार बोलून नी लिहून दाखवित. पण कृती करावयाच्या वेळेला मात्र ते घाबरून जात. परंतू समाजाला दोन्ही प्रकारच्या लोकांची गरज होती. विचारवंताने व्यक्त केलेले विचार प्रत्यक्षपणे त्याला अंमलात आणता आले नाहीत तरी ते कोठे ना कोठे तरी आणि केव्हा ना केव्हातरी रुजल्याशिवाय रहात नाहीत. कम्युनिझमचा आद्य पुरस्कर्ता कार्लमार्क्स यांने १८४८ साली, 'जगातील कामगारांनो एक व्हा' अशा प्रकारची घोषणा दिली आणि वर्गकलहाचं एक नवीन तत्त्वज्ञान शोधून काढलं. 'वर्गकलहाचं' व 'विरोध विकासवाद' या नावाचे एक नवीन तत्त्वज्ञान शोधून काढले. हे तत्त्वज्ञान अंमलात आणण्यासाठी कार्ल-मार्क्स कोठे चळवळ करण्यास किंवा क्रांती करायला गेला नाही. इंग्लंडच्या ग्रंथालयात बसून त्याने आपल्या 'कॅपिटाल' या ग्रंथामध्ये वरील विचार व्यक्त केले आहेत. त्याने आपले हे हवेत फेकलेले विचार होते. ते विचार लेनिन आणि स्टॅलिन यांनी आत्मसात करून १९१८ साली रशियामध्ये राज्यक्रांती केली व कामगारांचे राज्य स्थापन केले. म्हणून नुसत्या विचारवंतांचे सुद्धा समाजात महत्त्व

असते. परंतू विचारवंत तेच विचार आचरणात आणत असेल तर अधिकस्य अधिकम् फलम् ।

मी आपल्याला सांगितले की बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' नावाचं पाक्षिक काढलं. त्यानंतर त्यांनी 'दिग्दर्शन' नावाचं एक मासिक काढलं. या मासिकात व पाक्षिकात त्यांनी सुधारणाविषयक लेख लिहायला सुरवात केली. त्यांना त्यांच्या या कार्यात भाऊ महाजन हे मदत करीत असत.

बाळशास्त्री जांभेकरांचे जीवनामध्ये एक प्रसंग असा आला होता की श्रीपाद शेषाद्री या नावाचा हैद्राबाद येथील देशस्थ ब्राह्मणसमाजातील एक मुलगा बाटून त्याने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. त्यावेळी बाळशास्त्री जांभेकरांनी पुढे होऊन इतर लोकांचा विरोध असताना त्याला हिंदू करून घेतला. मी आधीच सांगितल्याप्रमाणे, शिवाजी महाराजांनी बजाजी निंबाळकर आणि नेताजी पालकर यांना हिंदू करून घेतले. त्याच प्रमाणे त्या नंतर ख्रिश्चन धर्मातून हिंदूधर्मात एका बाटलेल्या मुलास आणण्याचे पहिले कार्य हे बाळशास्त्री जांभेकरांनी केले. आजच्या काळात ही गोष्ट आपल्याला तितकीशी महत्त्वाची वाटत नाही. परंतू १८४० च्या सुमारास त्यांनी हे घडवून आणलेले धर्मांतर सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता फार मोठ्या धैर्याने केले. सनातनी मंडळी या मुळे जांभेकरांच्यावर चिडून होती. त्यांनी त्यांना शिव्या-शाप द्यायला सुरवात केली. सनातनी मंडळींच्या सुदैवाने आणि बाळशास्त्रींच्या दुर्दैवाने बाळशास्त्री हे वयाच्या ३४ व्या वर्षीच १८४६ साली निधन पावले आणि मग सनातन्यांनी एकच गिल्ला करायला सुरवात केली की बाळशास्त्री आमच्याच शापामुळे मेला.

बाळशास्त्र्या प्रमाणेच बाकीची मंडळीही आपापल्या परीने

सुधारणा करण्यात मग्न होती. मराठीचे पहिलें व्याकरणकार ज्यांना गौरवाने मराठीचे पाणिनी असे म्हटले जाते ते दादोबा पांडुरंग त्यांनी मानवजाती समानताधर्म या नावाची संस्था काढली व निरनिराळ्या जाती जमातींचे लोक निरनिराळ्या धर्मांचे लोक एकत्र बोलावून मनुष्य तेवढा एक मानून धर्मांची आणि जातींची बंधने झुगारून देऊन सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी या संस्थेच्या नेतृत्त्वाखाली केला. परमहंससभा नावाची दुसरी एक संस्था त्यांनी काढली. त्यावेळी जी सुशिक्षित आणि समंजस मंडळी होती त्यांना एकत्रित आणून जातिभेदातीत अशी सामाजिक चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला. ही सर्व मंडळी एके ठिकाणी जमत आणि बटलरच्या हातचा चहा आणि पाव खावयाचा असा त्यांचा उपक्रम असे. ख्रिशन माणसाच्या हातचा पाव खाणे ही त्या वेळी फार मोठी सुधारणा समजली जात होती. परंतू ही गुप्त गोष्ट एकदा चव्हाटयावर आली आणि वर्तमानपत्रांतून त्यांच्यावर टीकेची झोड उठली. त्यामुळे यातील काही मंडळींचा धीर गळाला. त्यानंतर दादोबा पांडुरंग यांनी न्या. रानडे, डॉ. भांडारकर वगैरे मंडळींच्या सहकार्याने प्रार्थना समाजाची स्थापना करून समाज सुधारणा करण्याचे प्रयत्न चालविले. प्राथमिक शिक्षण देण्याच्या बाबतीत त्यानी प्रयत्न चालू केले. मुंबईला १८२० साली जगन्नाथ शंकर शेट यांच्या प्रयत्नाने प्राथमिक शाळा स्थापन झाली. आपल्या या सातारा जिल्ह्यामध्ये साताराचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी १८३० साली मुलींच्यासाठी शाळा काढली होती. मुलींना शिकविण्यासाठी शिक्षक मिळत नव्हता म्हणून त्यांनी एका ख्रिश्चन मिशनऱ्याला शिक्षक नेमले. मुलींनाही शाळेत पाठविण्यास कोणी पालक धजत नव्हते. म्हणून महाराजांनी आपल्या घरापासूनच सुरुवात केली व आपल्या सख्या बहिणीला त्या शाळेत पाठविल्यानंतर हळू हळू मुली जमा होऊ लागल्या. अशा प्रकारचे प्रयत्न ठिकठिकाणी

चालू होते आणि समाजाकडून त्यांना तीव्र विरोधही होत होता.

महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने ख्रिश्चन मिशनऱ्यांचे प्रयत्न फार मोठ्या प्रमाणात झाले आहेत. ख्रिश्चन मिशनरी हिंदुस्थानात आले ते मुख्यत: आपल्या धर्माचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आले. परंतू आपल्या धर्माचा प्रसार करीत असताना त्यांनी दीन-दलित, दुर्बल, रंजलेले, गांजलेले यांची सेवा करण्याचे व्रत घेतले होते. ही गोष्ट आपण कटाक्षाने लक्षात ठेवली पाहिजे. हिंदुधर्माने विद्येत मागासलेल्यावर्गांना आणि गोरगरिबांना ज्या सवलती नाकारल्या होत्या त्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सामान्य जनतेला देऊ केल्या मिशनऱ्यांनी शाळा काढल्या, दवाखाने काढले. दुष्काळामध्ये गोरगरिबांना अन्नधान्य पुरवून त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था केली. या मुळे गोरगरिब लोक मिशनऱ्यांकडे आकर्षित होऊ लागले व स्वेच्छेने धर्मांतर करु लागले. मिशनरी एवढेच करुन थांबले नाहीत तर हिंदूधर्मामध्ये ज्या अनिष्ट रूढी व अनिष्ट चाली होत्या त्यांच्यावरही हल्ले करायला सुरवात केली. मिशनऱ्यांनी बाटवाबाटवीचे जे प्रकार चालविले होते त्याबद्दल नापसंती दाखवित असताना सुद्धा त्यांनी समाजसेवेचा जो धडा घालून दिला त्यामुळे हिंदुसमाजातील सुशिक्षित आणि विचारवंत मंडळींचे डोळे उघडले. आणि या ख्रिश्चन मिशनऱ्यांप्रमाणे आपण सुद्धा आपल्या धर्मातील दोष आणि उणीवा नाहिशा केल्या पाहिजेत अशी प्रबल भावना मूठभर का होईना सुशिक्षित लोकांत निर्माण होऊ लागली. त्यामुळेच पूर्वी शिक्षण ही केवळ ब्राह्मण समाजाची मिरासदारी होती. ती नाहीशी करून सर्व सामान्य जनतेत शिक्षण प्रसार व्हावा, हिंदू स्त्री ही शिक्षणापासून वंचित होती, तिलाही शिक्षण द्यावं, बालविवाहाची पद्धत नाहीशी व्हावी, विधवाविवाह सुरू करावेत आणि जरठकुमारी विवाह मोठ्या प्रमाणावर होत

होते त्याना आळा घालावा या दृष्टीने हिंदू समाजातील विचारवंत प्रयत्नशील झाले. मुंबईच्या आणि पुण्याच्या काही विचारवंतांनी जाणीव पूर्वक प्रयत्न केले.

मुंबईत विष्णुबुवा ब्रह्मचारी या नावाचे एक गृहस्थ होते. त्यांनी मिशनऱ्यांचे हिंदूधर्मावरील हल्ले परतवून लावण्याचा फार मोठा प्रयत्न केला व त्याचवेळी आपल्या धर्मातील दोष दूर करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले.

विष्णुशास्त्री पंडित या नावाचे पुण्याला एक गृहस्थ होते. त्यांचा शास्त्री घराण्यात जन्म जरी झाला असला तरी विधवा विवाह शास्त्र संमत आहे अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. म्हणून त्यानी आयुष्यभर विधवा विवाहाचा पुरस्कार फार मोठ्या प्रमाणात केला. किंबहुना याच ध्येयासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. ' विधवा विवाहोत्तेजक सभा ' या नावाची संस्था त्यांनी स्थापन केली होती. त्या आधी १८५६ साली ईस्ट इंडिया कंपनीने विधवा विवाहाला मान्यता देणारा कायदाही केलेला होता. कायद्यामुळे प्रश्न सुटतात अशातला भाग नाही. परंतू कायद्यामुळे अशा प्रकारचे विवाह सुलभ होण्याला मदत होती. विष्णुशास्त्री पंडितांना या कामी न्या. रानडे, महात्मा जोतिबा फुले, विष्णुशास्त्री बापट यांच्या सारखी थोर थोर मंडळी मदत करत होती. त्यावेळी प्रामुख्याने ब्राह्मण समाजात दोन तट पडलेले होते. या सुधारणांना विरोध करणारे सनातनीही ब्राह्मणच आणि सुधारणांचा पुरस्कार करणारे सुधारक हे सुद्धा ब्राह्मणच. विष्णुशास्त्री पंडित अगर विष्णुशास्त्री बापट ही वेदशास्त्रसंपन्न अशा शास्त्री घराण्यातील मंडळी परंतू हिंदू धर्माचा संकुचितपणा उणिवा आणि दोष यावर कोरडे ओढण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. पहिला विधवा विवाह १८४२ साली बेळगाव येथे झाला.

या नंतर विशेषत: १८५६ च्या कायद्यानंतर असे विवाह तुरळकपणे होत होते. विष्णुशास्त्री पंडित आणि त्यांची 'विधवा विवाहोत्तेजक सभा' या संस्थेतर्फे अशा विवाहांचा जाणीव पूर्वक पुरस्कार करीत असत. असे विवाह, पत्रके काढून समारंभपूर्वक जाहीररीत्या वधू-वरांना आहेर वगैरे करून घडवून आणित असत. त्यामुळे सनातन्यांचे पित्त खवळत असे. त्याच्यांकडून अशा प्रकारच्या विवाहाला अडथळे करण्याचा प्रयत्न होत असे. न्या. रानडे, विष्णुशास्त्री पंडित, विष्णुशास्त्री बापट हे विधवा विवाह शास्त्र संमत आहे अशा भूमिकेतूनच त्यांचे कार्य चालू होते. एखादी गोष्ट शास्त्र संमत आहे की नाही या बद्दलचा दाखला वेद पुराणे, महाभारत, रामायण यातून शोधून काढायचा प्रयत्न होत असे.

विधवा विवाह शास्त्रसंमत आहे की नाही या संबंधी निवाडा देण्यासाठी सनातनी आणि सुधारक यांच्या मध्ये बोलणी होऊन एक लवादमंडळ नेमण्याचे ठरले. या मंडळामध्ये विधवा विवाह शास्त्र संमत आहे असे म्हणणारी पाच मंडळी, विधवा विवाह शास्त्र संमत नाही असे म्हणणारी पाच मंडळी आणि या दोघांच्या मान्यतेने एक अध्यक्ष. अशा प्रकारचं एक अकरा जणांचं लवादमंडळ नेमण्यात आले. पुण्याला दोहोंपक्षाकडून युक्तिवाद करून अखेर कोण जिंकेल त्या प्रमाणे वागायचे असे ठरविले. विष्णुशास्त्री पंडित हे विधवा विवाह शास्त्रसंमत आहे असे म्हणणाऱ्या पक्षाचे नेतृत्त्व करीत होते. व नारायणाचार्य गजेंद्रगडकर विधवा विवाह शास्त्रसंमत नाही अशा पक्षाचे नेतृत्त्व करीत होते. लवाद मंडळाचे अध्यक्ष म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे वडिल यांची नेमणूक झालेली होती, परंतू या नेमणूकीच्या बाबत सनातनी पक्षाने आक्षेप घेतला होता. त्याचे कारण असे की-केव्हा तरी एकदा कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी पुण्यामध्ये युरोपियन मंडळींच्या समवेत फलाहार केलेला होता. कृष्णशास्त्री

चिपळूणकरांनी ख्रिश्चन लोकांच्या बरोबर फलाहार केल्यामुळे ते बाटलेले आहेत. त्यांनी प्रायश्चित्त घेतल्याशिवाय व त्यांना शुद्ध करून घेतल्याशिवाय या लवाद कोर्टावर काम करता येणार नाही असा सनातन्यांनी आग्रह धरला. शेवटी कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी पाचशे रुपये दंड भरल्यानंतर गोमूत्र आणि गोमय प्राशन करून प्रायश्चित्त घेतल्यानंतर त्यांच्यावरची बंदी उठविण्यात आली. त्यांना लवाद कोर्टावर बसायला परवानगी दिली. त्या वेळी दुसराही असाच एक गमतीदार प्रसंग घडून आला. प्राच्यपंडित डॉ. रामकृष्णपंत भांडारकर हे संस्कृत पंडित. संस्कृत भाषेचा त्यांचा गाढा व्यासंग असल्या कारणाने विधवा विवाह सशास्त्र आहे असे म्हणणाऱ्यांची बाजू बळकट होणार होती. म्हणून त्यांचं नांव सुचविलं गेलं होतं. परंतू सनातन्यांनी डॉ. भांडारकरांच्या नावालाही आक्षेप घेतला. त्याचं कारण असं की डॉ. भांडारकर हे संस्कृत पंडित असले तरी ते सारस्वत जातीत जन्माला आले होते. आणि ब्राम्हणमंडळी सारस्वतांना ब्राम्हणेत्तराप्रमाणेंच शूद्र समजत असत. म्हणून डॉ. भांडारांकरच्या नावाला त्यांनी आक्षेप घेतला. लवाद कोर्टाचे काम ८–९ दिवस चालले होते. त्यावेळी सनातनी पक्षाने लाचलुचपत देऊन सुधारक पक्षातल्या एका व्यक्तीला आपल्याकडे फितूर करून घेतले त्यामुळे बहुमताने विधवा विवाह शास्त्रसंमत नाही असा निर्णय लागला. ज्या दिवशी हा निर्णय लागणार होता त्या दिवशी सकाळी कृष्णशास्त्री चिपळूणकर घाईघाईने सभेच्या ठिकाणी यावयास निघाले होते. सकाळची वेळ आणि त्यांचा पोषाख पाहून रस्त्याने जाणायेणारी मंडळी त्यांचेकडे बघून हसू लागली. लोक का हसतात हे त्यांच्याही लक्षात येईना. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे पुण्यात रंगेलपणाबद्दल प्रसिद्ध होते. त्यांच्या 'अंगवस्त्राच्या' घरातून बाहेर पडताना त्यांनी अंगावर शाल घेण्याच्या ऐवजी तिचा शालू घेऊन त्याची भाळ मारली

होती. ही गोष्ट त्यांच्याही ध्यानात आली नाही. परंतू अर्ध्या वाटेवर गेल्यानंतर जसे लोक चौकसपणाने त्यांचेकडे बघू लागले आणि फिदीफिदी हसू लागले तशी ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. परंतू घराकडे परत येऊन शाल घेण्याचा प्रयत्न न करता ते अंगावरील शालूसह सभास्थानी उपस्थित झाले. सभास्थानी जमलेल्या लोकांनाही आश्चर्य वाटले. त्यापैकी कोणीतरी त्यांना ओरडून सांगितले की आपल्या अंगावर शाल नसून शालू आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे प्रसंगावधानी व हजरजबाबी गृहस्थ होते. त्यांनी उत्तर दिले. आज विधवा विवाह शास्त्र संमत आहे की नाही याचा अखेरचा निर्णय लागणार आहे. जो पक्ष हरेल त्या पक्षाला हा शालू भेट देण्याचे ठरवून मी तो मुद्दाम अंगावर घेऊन आलो आहे.

फंदफितुरी मुळे विधवा विवाह शास्त्र संमत आहे असं म्हणणाऱ्या पक्षाचा पराभव झाला. पण तरी सुद्धा विष्णुशास्त्री पंडित प्रभूती मंडळी त्या पराभवाने खचली नाहीत. त्यांनी आपले काम नेटाने तसेच चालू ठेवले. खुद्द विष्णुशास्त्री पंडितांची पत्नी निधन पावली. त्या वेळी विष्णुशास्त्री पंडित हे आपल्या विचारांप्रमाणे एखाद्या विधवेशी पुनर्विवाह करतात की काय याबद्दल सुधारक मंडळी व सनातनी मंडळी यांच्यामध्ये सारखीच उत्सुकता निर्माण झाली होती. परंतू विष्णुशास्त्री पंडित त्या कसोटीला पुरेपुरे उतरले आणि पत्नीच्या निधनानंतर त्यानी पुनर्विवाह केला तो एका विधवेशीच. १००–१२५ वर्षापूर्वी हे केलेलं धाडस म्हणून त्याला विशेष महत्त्व आहे.

न्या. रानडे यांच्याही जीवनात असेच दोन प्रसंग आलेले होते. एक प्रसंग असा. त्यांच्या बहिणीचा नवरा मरण पावला. न्या. रानडे हे कट्टे विधवा विवाहाचे पुरस्कर्ते. त्यामुळे सुधारक

मंडळींनी न्या. रानडे यांना आपल्या बहिणीचा पुर्नविवाह करावा असा सल्ला दिला. परंतू न्या. रानडे यांना तसे धैर्य झाले नाही त्यांनी सांगितले की माझ्या बहिणीचा पुर्नविवाह केला तर माझ्या वडिलांच्या भावना दुखावल्या जाणार आहेत. तेव्हा मला या बाबतीत तुम्ही आग्रह करू नका. काही दिवसांनी न्या. रानडे यांची पत्नी वारली. त्या वेळी सुधारक मंडळींनी पुन्हा त्यांना सांगितलं की आपण विधवा विवाहाचे कट्टे पुरस्कर्ते, अनेक विधवा विवाहांना आपण हजर राहिलेला आहात. विधवा विवाहासंबंधी काढलेल्या पत्रकावर आपण सह्या सुद्धा केलेल्या आहेत. तेव्हा आपण विवाह करणार असालच तर एखाद्या प्रौढ विधवेशी विवाह करावा असा आमचा तुम्हाला सल्ला आहे. न्या. रानडे यांचे वय त्या वेळी ३५ वर्षांचे होते. परंतू न्या. रानडे यांनी सुधारकांचा सल्ला झुगारून देऊन पुन्हा एकदा कच खाल्ली आणि १० वर्षाच्या रमा या कुमारिकेशी विवाह केला. न्या. रानडे यांच्या या उदाहरणामुळे सामाजिक पुरस्कार करणाऱ्या मंडळीं-मध्ये सुद्धा दोन तट पडायला सुरुवात झाली. एकीकडे विधवा-विवाहाचा पुरस्कार करायचा व दुसरीकडे स्वत:वरच पुर्नविवाह करण्याची पाळी आली की कच खायची. विष्णुशास्त्री पंडित हे कर्ते सुधारक होते. उक्ती प्रमाणे त्यांनी कृती करून दाखविली. परंतू न्या. रानडे हे बोलके सुधारक होते. त्यांच्यावर प्रसंग आला त्या दोन्हीही वेळी त्यांनी कृती करण्याचं साफ नाकारलं, जी धीट मंडळी होती त्यांनी अशा प्रकारच्या चळवळी पुढच्या काळातही चालविल्या. कै. धोंडो केशव कर्वे यांचं उदाहरण आपल्यापुढे जिवंत आहे. त्यांना त्यांच्या जातीतून विरोध झाला असतांना सुद्धा त्यांनी एका विधवेशी विवाह केला.

लोकहितवादी देशमुख हे त्या काळी गाजलेले मोठे सुधारक होते. त्यांनी आपल्या शतपत्रांतून हिंदुधर्मातील अनिष्ट रुढी, चाली,

वर्णवर्चस्व, सामाजिक विषमता यावर प्रखर हल्ले चढविले. परंतू न्या. रानडे यांचे प्रमाणेच लोकहितवादी देशमुखांची शोचनीय अवस्था झाली. त्यांना इनाम कमिशनच्या संबंधात इंग्लंडला जाण्याची संधी आली असता समुद्रपर्यटन करणे हे निषिद्ध असल्याने जाण्याचे टाळले. मात्र त्यांनी आपल्या मुलग्याला बॅरिस्टरच्या परीक्षेसाठी इंग्लंडला पाठविले होते. तो मुलगा इग्लंडहून परत आले नंतर सनातनी मंडळींनी लोकहितवादी देशमुख व त्यांचा मुलगा यांनी प्रायश्चित घ्यावं असा आग्रह धरला सुरुवातीला त्यांनी नकार दिला, परंतू सनातनी मंडळी स्वस्थ बसली नाहीत. त्यांनी लोकहितवादी देशमुख यांची मुलगी ज्या घराण्यात दिली होती तेथे तिच्या सासूला जाऊन ही मंडळी भेटली आणि तिला सांगितले तुझ्या व्याह्यांना प्रायश्चित्त घ्यावयास सांग, त्याप्रमाणे ती बाई देशमुखांच्याकडे गेली आणि त्यांना सांगितले की तुम्ही प्रायश्चित्त घ्यायचे नाकारून सनातन धर्माच्या विरुद्ध आचरण करीत आहात. तुम्ही मुकाट्यान प्रायश्चित्त घ्या. नाहीतर तुमच्या मुलीला मी नांदविणार नाही, तिला परत तुमच्याकडे पाठवून देईन. सनातन्यांनी असा पेच टाकल्यामुळे लोकहितवादी देशमुखांनी नाईलाजाने का होईना प्रायश्चित्त घेणेचे मान्य केले आणि गोमूत्र आणि गोमय प्राशन करून प्रायश्चित्त घेतले.

विचारवंत आणि कर्ते सुधारक यांच्या मधला फरक हा, न्या. रानडे व लोकहितवादी देशमुख एका बाजूला व विष्णुशास्त्री पंडित आणि म. फुले दुसऱ्या बाजूला यावरून दिसून येते.

म. जोतिबा फुले यांचा अव्वल इंग्रजी अमदानीतील महाराष्ट्रातील .एक कर्ते सुधारक किंबहुना सामाजिक क्रांतीचे अग्रदूत म्हणून त्यांचा गौरवपूर्वक उल्लेख करावा लागेल. म. फुले समाजकारणात आल्यानंतर महाराष्ट्रातील बहुजन समाज ढवळून निघाला. आणि

सामाजिक चळवळीला अगदीच आगळं आणि वेगळं वळण लागलं म. जोतिबा फुले यांच्या अगोदर ख्रिश्चन मिशनऱ्यांनी गोरगरिबांच्या वस्त्यांत मोफत शिक्षण देण्याचं व्रत अंगिकारलेलं होत. ब्राम्हणमंडळीनी ज्या शाळा काढलेल्या होत्या. त्यांत ब्राह्मणेंत्तरांना प्रवेश करण्यास पूर्ण मज्जाव होता. नाही म्हणा-वयास बहुजन समाजाच्या लोकांपैकी मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मुंबईस जगन्नाथ शंकरशेठ यांनी एक शाळा काढलेली होती. व सातारच्या प्रतापसिंह महाराजांनी साताऱ्यामध्ये मुलींची शाळा काढण्याचा प्रयत्न केला होता. या नंतर बहुजन समाजाला. स्त्रियांना आणि दलितांना विद्येची गोडी लावण्याचे काम पहि-ल्यांदा म. जोतिबा फुले यांनी १८४८ साली मुलींची शाळा काढून व १८५२ साली अस्पृश्यांची शाळा काढून केलं. मुलींच्या शाळेत शिकवायला शिक्षिका मिळत नव्हत्या. म. जोतिबा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. आणि त्यांना मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करावयास सांगितले महाराष्ट्रातील पहिली शिक्षिका म्हणून जर कोणाचा उल्लेख करायचा असेल तर तो सावित्रीबाईचाच करावा लागेल. त्यांच्या पूर्वी शिक्षिका म्हणून महाराष्ट्रातून कोणतीच स्त्री पुढे आलेली नव्हती. किंबहुना मुलींना शिकविण्याचं काम त्यापूर्वी कुणीही केलेलं नव्हतं. मुलींना शिक्षण देणे हीच मुळी धर्मबाह्य गोष्ट मानली जात असे. प्राचीनकाळी गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा आणि मंडण मिश्र यांची पत्नी सरस्वती या स्त्रिया वेदाभ्यास करून विदुषी म्हणून त्या नावारूपाला आल्या होत्या. परंतू याही स्त्रिया ब्राह्मण समाजातीलच होत्या. मधल्या काळामध्ये शिक्षणाची परंपरा खंडित झाली. ब्राह्मण समाजाने बहुजन समाजाप्रमाणेच स्वतःच्या स्त्रियांना सुद्धा शूद्र लेखून त्यांना शिक्षणापासून वंचित केले. शिक्षण हे ब्राह्मण समाजातील फक्त पुरुषांचीच मिरासदारी होऊन बसलेली होती. इतर ब्राह्मणेत्तर समाजांना या शिक्षणाचा

गंध ही नसे. ब्रिटीशांचा अंमल येईपर्यंत शिक्षण घेणे हे दुरापास्त होऊन बसले होते. सातारच्या प्रतापसिंह महाराजांना सुद्धा त्यांच्या आईने रात्री १२ वाजता उठवून चोरून शिकवलं. कोणाच्या देखत आणि विशेषतः ब्राह्मणांच्या देखत शिकणे आणि शिकविणे ही दोन्ही दृष्टीने अशक्य गोष्ट होती.

ब्रिटीश राजवट सुरू झाल्यामुळे व पाश्चात्य संस्कृतीशी संबंध आल्यामुळे जे जे नवे विचार येऊ लागले त्या मुळेच स्त्रियांना, बहुजन समाजाला आणि दलितवर्गाला शिक्षण मिळण्याचा मार्ग सुलभ झाला. सातारच्या प्रतापसिंह महाराजांच्या नंतर पहिली मुलींची शाळा काढण्याचे श्रेय म. जोतिबा फुले यांना आहे. अस्पृश्यांना शिक्षणाचा गंध ही नव्हता. अस्पृश्य समाज हा हिंदु समाजाचा घटक म्हणून मानलं जात होतं. परंतू पिढ्यान पिढ्या ते शिक्षणाला पारखे झालेले होते. अस्पृश्यांची ही पहिली शाळा हिंदुस्थानामध्ये काढण्याचा मान म. जोतिबा फुले यांनाच आहे. आपल्या धर्म ग्रंथाचा अभ्यास करण्याचीही मुभा हिंदू समाजातील ब्राह्मण समाजाव्यतिरिक्त इतर कुठल्याही समाजाला नव्हती. ख्रिश्चन मनुष्य घेतला तर त्याला त्याचा पवित्र धर्म ग्रंथ 'बायबल या ग्रंथाचा अभ्यास करण्याचा अधिकार होता. मुसलमान माणूस घेतला तर त्याला त्याच्या धर्माचा पवित्र ग्रंथ 'कुराण' या ग्रंथाचा अभ्यास करण्याचा हक्क होता. परंतू वेद हे हिंदूचे धर्म–ग्रंथ असून सुद्धा ब्राह्मण समाजाव्यतिरिक्त कोणालाही वेदांचे अध्ययन करता येत नसे. अस्पृश्यांच्या बाबतीत तर त्यांना वेद नुसते ऐकण्याची सुद्धा मुभा नसे, एखादा ब्राह्मण वेदांचं पठण करीत असेल आणि नकळत सुद्धा वेदांचे शब्द एखाद्या अस्पृश्याच्या त्याचा काही दोष नसताना कानावर आले तर शिश्याचा कढत रस त्याच्या कानांत ओतून त्याला देहांत प्रायश्चित्त दिले जात असे. अशाप्रकारे ज्ञान मिळविण्याची सर्व साधने ही एकट्या

ब्राह्मण समाजाची मिरासदारी होऊन बसली होती. लोकांना विद्या उपलब्ध करून देण्याचा पहिला प्रयत्न ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केला. आणि त्यांचेच अनुकरण करून हिंदू समाजातील सामाजिक क्रांतिकारकांनी केले. अशा प्रतिकूल परिस्थितीत जोतिबा फुले यांनी मुलींच्यासाठी व अस्पृश्यांच्यासाठी समाजाच्या तीव्र विरोधाला न जुमानता प्रयत्न केला. त्यावेळी सरकारतर्फे समारंभपूर्वक शालजोडी व २००।- चे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

आजकाल आपण पाहतो की प्रत्येक खेड्यामध्ये शाळा आहेत आठ–दहा खेड्यांमध्ये एखादं हायस्कूल निघालेलं आहे. तालुक्याला बहुधा एखादे तरी कॉलेज असते. आणि ४–५ जिल्ह्यासाठी एखादे विश्व विद्यालय स्थापन झालेले आपल्याला दिसून येते. आज विश्व विद्यालयाची स्थापना करणं जेवढं सुलभ आहे त्याही पेक्षा म. फुले यांच्या काळात बहुजन समाजासाठी मराठी प्राथमिक शाळा काढणे अवघड होते. या पार्श्वभूमीवर म. फुले, सावित्रीबाई फुले आणि फुल्यांचे सहकारी यांनी ज्या शाळा सुरू केल्या त्या, त्या काळाच्या मानाने त्यांची फारमोठी कर्तबगारी आणि कामगिरी होती.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंध मालेत एके ठिकाणी म्हटले आहे की, ज्ञानाच्या किल्ल्या आमच्या कंबरेला आहेत. या किल्ल्या जोपर्यंत आमच्या कंबरेला आहेत तोपर्यंत आमचं कोणीही वाकडं करू शकत नाही. ब्राह्मण्याबद्दलचा दुरभिमान, गर्व आणि दर्प विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे ठिकाणी किती खोलवर रुजला होता याचेच हे उद्‌गार निदर्शक आहेत. पण विष्णुशास्त्रींना ही कल्पना नव्हती की ज्ञानाच्या किल्ल्या त्यांच्या कंबरेला तशाच राहिल्या आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्या

किल्ल्याच्या डुप्लीकेट किल्ल्या तयार करून ज्ञानाच्या तिजोरीचे दरवाजे सगळ्या जाती जमातींना खुले केले. विष्णुशास्त्री चिपळूणकर स्वत:ला मराठी भाषेचे शिवाजी म्हणवून घेत होते. त्यांनी निबंधमाला सुरू केली. या निबंध मालेतून त्यांनी आपल्या ओजस्वी आणि तेजस्वी भाषाशैलीने भूतकाळाबद्दलचा अभिमान लोकांच्या मध्ये जागृत केला. ही त्यांची जमेची बाजू आहे. पण नव्या विचारांना, समाज सुधारणांना आणि सामाजिक क्रांतीला त्यांनी तीव्र स्वरूपात विरोध केला. लोकहितवादी देशमुख आणि म. फुले यांच्यावर त्यांनी आपल्या निबंधमालेतून निंदाप्रचुर, घणाघाती आणि निरर्गल स्वरूपाची टीका केली. परंतू नव्या विचारानं भारलेल्या या मंडळींनी अशा प्रकारच्या टीकेला भीक न घालता त्यांनी आपलं सामाजिक क्रांतीचं काम अव्याहतपणे चालू ठेवलं. म. जोतिबा फुले यांनी तर अस्पृश्यासह सारा बहुजन समाज ढवळून काढला. आपल्या कार्याला संघटितपणा यावा आणि त्याचा मोठ्या प्रमाणात प्रचार व्हावा म्हणून त्यांनी ' सत्यशोधक समाज ' या नावाची संघटना आणि ' दीनबंधू ' या नावाचं वर्तमानपत्र काढलं. या शिवाय म. फुले यांनी ' गुलामगिरी ' ' इषारा ' ' शेतकऱ्याचा आसूड ' ' सार्वजनिक सत्यधर्म ' वगैरे पुस्तके लिहून ब्राह्मण्यावरं तीव्र हल्ला चढविला. ' शेतकऱ्याचा आसूड ' या पुस्तकामध्ये त्यांनी विद्येचे महत्त्व किती आणि कसे आहे, बहुजन समाजाने शिक्षण घेतल्याशिवाय त्यांचा उद्धार होऊ शकणार नाही. या तत्त्वांचा जोरदार पुरस्कार केला. या पुस्तकाच्या सुरवातीसच एक वाक्य आहे त्यावरून जोतिबांना विद्येबद्दल किती तळमळ होती याची प्रचीती येते. ते म्हणतात :–

" विद्येविना मती गेली; मतीविना नीति गेली;
नीतीविना गति गेली ! गतीविना वित्त गेले,

वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."

या वरून विद्येची महती, कळकळ आणि तळमळ त्यांना किती वाटत होती हीच गोष्ट दिसून आल्याशिवाय रहात नाही.

सर्व सामान्य जनता ही विद्येत मागासलेली आहे. त्यांना शिक्षण देणे आवश्यक आहे. शिक्षणामुळेच त्यांच्यामध्ये स्वत्व, स्वाभिमान आणि सुधारणा होऊ शकेल. ते स्वतंत्रपणाने विचार करू शकतील. आपली पूर्वीची परिस्थिती आणि आताची परिस्थिती याची तुलना करू शकतील. आपल्यावर असलेली धर्माची बंधने, जातीची बंधने, समाजातील दुष्ट रूढी, चाली आणि विषमता, उच्चनीचपणा यांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न शिक्षणामुळेच होऊ शकेल. आणि म्हणून फुले प्रभृत्ती मंडळींनी बहुजन समाजात व दलित समाजात शिक्षणाचा प्रसार होईल याची काळजी घेतली.

म. फुले एवढेच करून थांबले नाहीत. त्यावेळी समाजात बालविवाह मोठ्या प्रमाणावर होत असत. त्यामुळे बालविधवांची संख्याही मोठ्या प्रमाणात होती. स्वतःला सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणविणाऱ्या ब्राह्मण समाजात तर या बालविधवांना प्रत्यक्ष त्यांच्या मातापित्याकडूनच केशवपन करुन विद्रूप केले जात असे. स्वतःला 'शहाणवकुळी' म्हणून घेणाऱ्या मराठा समाजात पडद्याची चाल असल्यामुळे या समाजातील बालविधवा कण्हत-कुथत घराच्या अडगळीत कसेतरी आपले जीवन कंठीत असत. या सगळ्याच बालविधवा वयात आल्यानंतर नैतीकदृष्ट्या चांगल्या रीतीने वागत असत असे म्हणता येणार नाही. सगळ्यांनाच निसर्गावर मात करता येत नसे. बऱ्याच बालविधवा विषय वासनेला बळी पडत असत. कोणीतरी त्यांना फसवीत असे अगर त्या फसल्या जात असत. आणि अशा फसलेल्या अगर फसविलेल्या तरुण बालविधवा गरोदर राहिल्यानंतर भृणहत्या

करून अपमानीत जीवन कंठीत. नदीचा, तळ्याचा, विहिरीचा, नाल्याचा, ओढ्याचा आश्रय घेऊन आत्महत्त्या करीत. अगर वेश्येचं जीवन कंठीत. हेच त्यांच्या पुढे मार्ग होते. ही गोष्टम. फुले यांच्या ध्यानात आल्यानंतर अशा गरोदर झालेल्या विधवांची मुक्तता करण्याच्या उदात्त हेतूने त्यांनी पुण्यात ' बालहत्त्या प्रतिबंधक गृह ' या नावाची संस्था काढली. साऱ्या पुण्यात अशा प्रकारची संस्था काढल्याबद्दलच्या जाहिराती लावल्या. या जाहिरातीत अशा प्रकारच्या ज्या विधवा असतील त्यांनी भ्रूहण-हत्त्या न करता माझ्या घरात यावे आणि खुशाल बाळंत होऊन जावे. त्यांची वाच्यता आपण कोठेही करणार नाही. आणि त्यांनी जन्म दिलेल्या बालकांचं पालन पोषण करण्याला आपण व आपली पत्नी सावित्रीबाई फुले हे समर्थ आहोत. असे जाहीरपणे सांगितले. त्याचा परिणाम होऊन अशा अडचणीत सापडलेल्या विधवा बहुतेक ब्राह्मण समाजातील या म. फुले यांच्या घरी येत व बाळंत होऊन निघून जात. म. फुल्यांच्यावर ब्राह्मणद्वेषाचा आरोप नेहमी केला जातो. परंतू या महात्म्याने ब्राह्मण समाजावर आणि विशेषतः ब्राह्मणसमाजातील विधवांवर किती अनंत उपकार करून ठेवले आहेत याची – 'बालहत्या प्रतिबंधक गृह' ही एक साक्ष आहे. याही पुढे जाऊन काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला म. फुले यांनी त्यांना मूलबाळ नसल्यामुळे दत्तक घेतले व त्याचे यशवंत असे नाव ठेवले. हिंदू समाजामध्ये भाऊबंदापैकी कोणातरी मुलाला दत्तक घेण्याची पद्धत होती. परंतू परिस्थितीमुळे वाममार्गाला लागलेल्या ब्राह्मण कुटुंबातील एका विधवेच्या अनौरस मुलाला दत्तक घेणे ही काही लहान सहान गोष्ट नव्हती. १९५६ साली हिंदू कायद्यामध्ये जी सुधारणा झाली त्या सुधारणा प्रमाणे हिंदू कुटुंबात हिंदू समाजातील कोणत्याही जातीच्या मुलाला अगर मुलीला दत्तक घेण्याची तरतूद केलेली आहे. जी गोष्ट कायद्याने

१९५६ साली केली तीच गोष्ट फुले यांनी आधीच १०० वर्षे प्रत्यक्ष कृतीने करून दाखविली होती. या वरून हा माणूस केवढया पहाडाच्या अंतःकरणाचा असला पाहिजे ही तर गोष्ट दिसून येतेच. पण Prophetes are head of their Times म्हणजे दृष्टे पुरुष काळाच्या पुढे असतात. या म्हणीची प्रचीती येते. मघा सांगितल्या प्रमाणें साविवित्रीबाई फुले यांनी शिक्षिकेचे काम मुलींच्या शाळेत केले होते. बालहत्या प्रतिबंधक गृह काढून या माऊलीने परिचारिकेचे (नर्स) ही काम केले. म्हणून महाराष्ट्रातील किंबहुना हिंदुस्थानातील पहिली शिक्षिका आणि पहिली परिचारिका या सावित्रीबाई फुलेच होत, असे सामाजिक चळवळीच्या इतिहासकाराला सुवर्ण अक्षरांत नमूद करा वेलागेल.

म. फुले यांचे 'बालहत्या प्रतिबंधक गृह' ची कल्पना घेऊनच पुढे प्रार्थना समाजातर्फे पंढरपूरला 'अनाथाश्रम' ही संस्था सुरू झाली. ती आज तागायत चालू आहे.

हिंदुस्थानात आतापर्यंत सावित्री या नावाच्या दोन स्त्रिया होऊन गेल्या. एक महाभारतकालिन 'सती सावित्री' आणि म. फुले यांची धर्मपत्नी 'सावित्रीबाई' फुले. या दोघींनी आपल्या नवऱ्यावर अपरंपार प्रेम केले व त्यांच्या जीवनकार्यात त्यांना साथ दिली. महाभारतकालिन सावित्रीने आपला नवरा सत्यवान याचे प्राण यमाने हरण केल्यानंतर यमाच्या तावडीतून सुटका करून आपला नवरा परत मिळविला पण त्यासाठी तिला यमापुढे, आजकालच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे एकप्रकारे सत्याग्रहच करावा लागला. म्हणून मला वाटते या सावित्रीला सत्याग्रही सावित्री म्हणणे हे ज्यास्त उचित होईल. यम सत्यवानाचे प्राण घेऊन चाललेला होता. ही सावित्री यमाच्या पाठोपाठ चालली. यमाने आपल्याबरोबर येऊ नकोस अशी तिला सक्त ताकीद

दिली. पण मी माझ्या नवऱ्याचे प्राण परत घेतल्याशिवाय जाणार नाही असे यमाला तिने निक्षून सांगितले आणि या आपल्या म्हणण्याच्या पुष्ठ्यर्थ एक सनातन धर्माचे व पति-पत्नीधर्माचे मोठे तत्त्व सावित्री सहज बोलून गेली. सावित्री म्हणाली :–

यत्रमे नीयते भर्ता
स्वयमेवहि यत्र गच्छति
मया हि तत्र गन्तव्यम्
एष धर्मः सनातनः ॥

(जेथे माझ्या नवऱ्याला नेले जाते अगर जेथे माझा नवरा स्वखुषीनें जातो त्या ठिकाणीच पत्नीला गेले पाहिजे हा सनातन धर्म आहे.) असे म्हणून सावित्रीने पुन्हा यमाचा पाठलाग सुरू केला. ही बाई काही ऐकत नाही असे म्हणून तिच्या तावडीतून सुटण्यासाठी यमाने एक युक्ती योजिली. यम सावित्रीला म्हणाला तू वाटेल तो वर माग पण तुझ्या नवऱ्याचे प्राण मागू नकोस. सावित्रीने 'मी मागेल तो वर देणार काय?' असे यमाला पुन्हा पुन्हा विचारले. आणि यमाकडून मागेल तो वर देणार याची खात्री करून घेतली. तिने यमाकडे 'मला शंभर पुत्र होऊ देत' असा वर द्या अशी यमराजांना विनंती केली. यमराजाने तथास्तू म्हणून वर दिल्याचे मान्य केले. आणि सत्यवानाचे प्राण घेऊन यम पुढे चालला सावित्रीही त्याचे पाठोपाठ चालली. यमाने पाठीमागे वळून पाहिले. तो सावित्री परत आपल्या पाठीमागेच आहे हे त्याला दिसून आले. यम सावित्रीला म्हणाला; मी तुला पाहिजे तो वर दिला असताना तू पुन्हा माझ्या पाठीमागे का ? सावित्री म्हणाली यमराज आपण मला शंभर पुत्र होऊ द्यात म्हणून वर दिला आहे. माझा नवरा परत मिळाल्याशिवाय मला शंभर पुत्र कसे होणार ? हा सावित्रीचा युक्तीवाद कळल्यानंतर आपण फसल्याचे यमाचे लक्षात आले परंतू दिलेला वर पाळणे हे आपले कर्तव्य असलेने यमाने मोठ्या उदार अंतःकरणाने सत्यवानाचे

प्राण सावित्रीस परत दिले. आणि अशा रीतीने सावित्रीने यमापासून आपल्या नवऱ्याची सुटका केली. जी गोष्ट महाभारतकालीन सावित्रीने केली. तशाच प्रकारची गोष्ट सावित्रीबाई फुले यांनी ही केली. आपल्या नवऱ्याच्या पाठीमागे त्या सावली सारख्या उभ्या राहिल्या. नवऱ्याच्या हरेक कामात त्यास मदत केली. स्वत: शिकली व शिक्षिकेचा पेशा पत्करला. बालहत्या प्रतिबंक गृहातील मुलांचे पालन पोषण केले एवढेच नव्हे तर म. जोतिबा फुले यांची ही सामाजिक समतेची चळवळ सहन न होऊन त्यांना ठार मारण्यासाठी सनातन्यांनी मारेकरी पाठविले होते. त्यावेळीही फुल्यांच्या प्रमाणेच या बाईच्या प्रसंगावधानाने फुल्यांचे प्राण वाचले.

म. जोतिबा फुले हे महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे अग्रणी आहेत. ते नुसते शाळा काढून थांबले नाहीत, बालहत्या प्रतिबंधक गृह काढून थांबले नाहीत, सत्यशोधक समाजाची स्थापना करून थांबले नाहीत. तर त्यांनी भारताचा कणा जो शेतकरी आणि गिरणीत काम करणारा कामगार यांच्याही संघटना करण्यासाठी चळवळी सुरू केल्या. नारायण मेघाजी लोखंडे हे महात्मा फुल्यांचे उजवे हात होते. त्यांनी 'बाँबे मिल हँडस् असोसिएशन' या नावाची संस्था स्थापन करून कामगारांच्यावरील अन्याय वेशीवर टांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला. महाराष्ट्रातील किंबहुना हिंदुस्थानातील कामगारांच्यासाठी चळवळ करणारी हीच पहिली संस्था. त्यावेळी कामगारांना गिरणीमध्ये १४ तास काम करावे लागत असे. लहान मुलांची अगर स्त्रियांची त्यापासून सुटका होत नसे. स्त्रियांना व मुलांना पुरुषाप्रमाणेच राबावे लागे. स्त्रियांना बाळंतपणाची रजा दिली जात नसे. कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सवलती दिल्या जात नसत. तेव्हा या कामगारांची दुखणी आणि गाऱ्हाणी ब्रिटीश सरकारच्या कानांवर घालून

मालकांच्या जाचातून कामगारांना सोडविण्याच्या दृष्टीने या संस्थेने जोरदार प्रयत्न केले. कृष्णराव भालेकर हे म. फुल्यांचे डावे हात. त्यांनी शेतकऱ्यांची संघटना स्थापन केली. शेतकऱ्यांना चांगले दिवस येण्यासाठी व सरकारी अंमलदाराकडून त्यांना होणारा त्रास नाहीसा करण्यासाठी भालेकरांनी जीवापाड परिश्रम घेतले.

महाराणी व्हिक्टोरियाचा मुलगा ड्यूक ऑफ् कॅनॉट हा पुण्याला आलेला असता म. फुले यांचे एक सहकारी हरी रावजी चिपळूणकर यांनी त्याला मानपत्र देण्याचा समारंभ योजिला होता. पुण्यातील प्रतिष्ठित व्यक्तींना या समारंभाची आमंत्रणे गेली होती. म फुले यांनाही आमंत्रण होते. म. फुले त्या ठिकाणी गेले पण ते शेतकऱ्याचे वेषात. डोक्याला एक मुंडासं, अंगात खादीची एक बंडी, कमरेला विळा आणि ढुंगणाला लंगोटी अशा पोषाखात ड्यूक ऑफ् कॅनॉटच्या सभेस उपस्थित राहण्यासाठी म. फुले गेले. बाकीची मंडळी झकपक आणि उंची पेहराव करून त्या ठिकाणी जमली होती. म. फुल्यांचा पोषाख पाहून त्यांना पोलिस अधिकाऱ्याने आत जाण्यास मनाई केली. परंतू म. फुल्यांचे जवळ आमंत्रण पत्रिका होती. त्यामुळे पोलीसही बुचकळ्यात पडले. समारंभाला सोडावे तरी पंचाईत. न सोडावे तरीही पंचाईत. पोलीस आणि म. फुले यांची बाचाबाची चालू असतानाच समा–रंभाचे यजमान हरी रावजी चिपळूणकर हे धावतच तेथे आले व जोतिबांना घेऊन गेले आणि त्यांना व्यासपीठावर बसविले. ड्यूक ऑफ् कॅनॉट आल्यानंतर मुख्य समारंभ चालू असतानाच म. फुल्यांनी १०–१५ मिनिटे इंग्रजीत भाषण करून ड्यूक ऑफ् कॅनॉटला हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था प्रभावी रितीने सांगितली. ते म्हणाले, हिंदुस्थानात राणीचं राज्य सुरू आहे. खरा हिंदुस्थान हा खेड्यात आहे. ब्रिटीश राजवटीच्या

जोखडाखाली शेतकऱ्यांचे अंगात कसलेही त्राण राहिलेले नाहीत. त्यांचं सर्वांच्याकडून शोषण करण्याचं काम सुरू झालेलं आहे. अशावेळी तुम्ही तुमच्या आईला म्हणजे महाराणी व्हिक्टोरीया इजला हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची परिस्थिती सांगा. आणि या शेतकऱ्याला त्याच्या या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी राज्यकर्ते या नात्याने काही प्रयत्न करा. ड्यूक ऑफ् कॅनॉट व तेथे जमलेली मंडळी म. फुल्यांचे भाषण ऐकून स्तिमित झाली.

म. फुल्यांना शेतकऱ्यांच्या बद्दल किती कळवळा होता याचं आणखी एक उदाहरण अभ्यसनीय आहे. १८८५ साली इंडियन नॅशनल कॉंग्रेस या संस्थेची स्थापना झाली. हिंदुस्थानातील लोकांची गाऱ्हाणी ब्रिटीश सरकारच्या कानांवर घालण्यासाठी अशा एखाद्या राजकीय संस्थेची गरज निर्माण झाली होती. सर ॲलन ऑक्टेव्हिअन ह्यूम या इंग्रज गृहस्थानेच कॉंग्रेसची स्थापना केली. सुरवातीस या संस्थेमध्ये अति श्रीमंत आणि अति विद्वान अशी फारच थोडी माणसे होती. मध्यमवर्ग, बहुजनसमाज, शेतकरी, कामगार, दलित यांना या संस्थेत प्रवेश नव्हता. हे वर्ग जो पर्यंत कॉंग्रेसमध्ये नाहीत तो पर्यंत या कॉंग्रेसला राष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार नाही. असे म. फुल्यांचे म्हणणे होते. नॅशनल कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन पुण्यात भरले. त्यावेळी निषेध म्हणून म. फुल्यांनी शेतकऱ्याचा एक भव्य पुतळा कॉंग्रेसच्या मंडपाबाहेर उभा केला. कॉंग्रेसचे त्यावेळचे जे चालक होते त्यांच्या निदर्शनाला आणून दिले की तुमची संस्था ही संकुचित आहे, वरिष्ठ वर्गापुरतीच मर्यादित आहे. आणि म्हणून बहुजन समाजाला कॉंग्रेसमध्ये प्रतिनिधित्व मिळत नाही तो पर्यंत तुम्हाला देशाचं आणि सर्वसामान्य जनतेचं प्रतिनिधित्व करता येणार नाही.

म. फुले यांनी १८७३ साली 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली व आपण चालविलेल्या चळवळींना संघटीत व संस्थात्मक

स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजाचे ध्येय परमेश्वर आणि भक्त यांच्या मध्ये कोणत्याही प्रकारचा दलाल असता कामा नये असे होते. एखाद्या व्यक्तीने परमेश्वराची पूजा करावी, त्याची भक्ती करावी, त्याला अनन्यभावे शरण जावे पण कोणा मध्यस्थाच्या मार्फत ही कृत्ये करू नयेत. सत्यशोधक समाजाच्या या ध्येय धोरणांमध्ये आर्थिक दलाली करणारी मंडळी म्हणजे भिक्षु, जोशी, ग्रामोपाध्ये काही अपवाद वगळता सर्वसामान्यणे ब्राह्मण समाज यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांचं वेतन बुडू लागलं. म. फुल्यांनी पुरोहिताशिवाय अगदी साध्या पद्धतीने नवरानवरीने एकमेकांच्या गळयात हार घालून लग्ने लावण्याचा सपाटा सुरू केला. अशा प्रकारची लग्ने लावता येणार नाहीत. ती लग्ने भिक्षुकामार्फतच लागली पाहिजेत आणि भिक्षुकाला त्याची योग्य ती दक्षिणा मिळाली पाहिजे अन्यथा अशी लग्ने बेकायदेशीर ठरवावीत अशा प्रकारचे दावे भिक्षुक मंडळींनी निरनिराळ्या कोर्टांत दाखल केले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या न्या. रानडे यांनी सत्यशोधक समाजाच्या संस्थापनेला मदत केली होती त्यांच्या पुढे ते मुनसफ असताना एक दावा आला. न्या. रानडे यांनी भिक्षुकामार्फतच लग्ने लावून घेतली पाहिजेत अन्यत: ते लग्न बेकायदेशीर आहे अशा प्रकारचा निर्णय सत्यशोधकीय पद्धतीने लग्ने लावणाऱ्या व्यक्तींच्या विरुद्ध व भिक्षुकांच्यावतीने दिला. भिक्षुकांचा आनंद गगनात मावेना. त्यावर जिल्हा कोर्टात अपील झाले. जिल्हा कोर्टाने खालचे कोर्टाचे ठरावात थोडीशी दुरुस्ती केली की अशी लग्ने भिक्षुका–शिवाय सत्यशोधक पद्धतीने लावली तरी भिक्षुकाचं वेतन हे त्याला मिळालंच पाहिजे. तो त्याचा हक्क आहे. याही ठरावावर उच्च न्यायालयात अपील करण्यात आले. अपीलामध्ये एका इंग्रजी न्यायमूर्तीने लग्ने कशी लावायची हा ज्या त्या व्यक्तीचा हक्क आहे. भिक्षुकाला त्याच्या मदतीशिवाय लग्ने लावली तर

दक्षिणा मागणेचा हक्क नाही. अशा रीतीने या दाव्याचा अखेर-पक्षी सत्यशोधक समाजाच्यावतीने निर्णय झाला. हा निर्णय म्हणजे म. फुले यांनी विवाह पद्धतीमध्यें अंगिकारलेल्या नव्या तत्त्वाचा विजयच होता. या निर्णयानंतर पुणे जिल्ह्यात ठिक-ठिकाणी सत्यशोधक पद्धतीने लग्ने लावण्याचा धूमधडाका सुरू झाला यामुळे भिक्षुकशाहीला फार मोठा हादरा बसला.

म. फुले यांनी विविध प्रकारच्या ज्या चळवळी केल्या त्या मुळे बहुजन समाज फार मोठ्या प्रमाणात जागृत झाला. त्यांची परावलंबीवृत्ती नाहीशी होत चालली. त्यांच्या ठिकाणी स्वाभिमान व तेजस्वीबाणा निर्माण झाला. हजारो वर्षे धार्मिक अंद्धश्रद्धेमुळे आपण पिळले जात होतो, त्याला या चळवळीमुळे फार मोठ्या प्रमाणांत आळा बसला. म. फुले यांनी केलेल्या चळवळींची विविधता, व्यापकता आणि ब्राह्मणापासून दलितापर्यंत सगळ्याना जागृत करण्याचे जे प्रयत्न केले त्यामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील सामाजिक क्रांतीचा अग्रणी नेता म्हणून म. फुले यांचे नाव सामाजिक चळवळीचे इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावे लागेल.

म. फुले यांच्या काळातच आणखी एका समाजसुधारकाने महारा-ष्ट्रातील सामाजिक चळवळींना एका वेगळ्या विचाराने कलाटणी देण्याचा प्रयत्न केला. तो समाजसुधारक म्हणजे कं. गोपाळ गणेश आगरकर. म. फुले यांचे व्यतिरिक्त जांभेकरांच्या पासून ते लोकहितवादी देशमुख, न्या. रानडे, विष्णुशास्त्री पंडित वगैरे मंडळींनी ज्या सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला त्याला शास्त्राधार शोधून काढून ते चळवळी करीत गेले. परंतू म. फुले यांचे प्रमाणेच आगरकर याला अपवाद होते. आगरकरांचा भर बुद्धिप्रामाण्यवादावर होता. शास्त्रात एखादी गोष्ट आहे किंवा नाही याचा शोध घेत न बसता आणि शास्त्रे न धुंडाळता

आजच्या परिस्थितीला इष्ट काय आहे, योग्य काय आहे, गरजेचे काय आहे. याचा विचार करूनच योग्य तो निर्णय घेतला पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. शास्त्रात असो अगर नसो आपल्या बुद्धीला एखादी गोष्ट पटली तर ती करण्यामध्ये अनमान करायचा नाही. हे त्यांचे ब्रीद होते. हा एक नवा विचार आगरकरांनी पुढे आणला. त्या मुळे सामाजिक क्रांतीच्या चळवळीला एक प्रकारची मोठ्या प्रमाणावर धार आली.

592461

साधारणपणे १८८०-८२ च्या सुमारास महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात तीन प्रकारच्या चळवळी सुरू होत्या व त्यांचे प्रतिनिधित्व निरनिराळ्या नेत्यांच्याकडे होते. पहिली चळवळ म्हणजे 'नवजीवनाची चळवळ' दुसरी 'पुनर्जीवनाची चळवळ' आणि तिसरी 'उदारमतवादी चळवळ.' म. फुले, कै. आगरकर हे नवजीवनाच्या चळवळीचे कट्टर पुरस्कर्ते होते. समाजाच्या गरजेची प्रत्येक नवीन गोष्ट घ्यायची त्यांची तयारी होती. नवं ते हवं असं त्यांचं ब्रीद होतं. पुनर्जीवनाच्या चळवळीचे नेते विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि लो. टिळक होते. जुनं ते सोनं या तत्त्वाला ते घट्ट चिकटून बसले होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे फार दिवस जगले नाहीत. परंतू निबंधमालेत त्यांनी जुन्याचा फार मोठ्या प्रमाणात पुरस्कार केला होता. आणि नव्या विचारांची हेटाळणी केली होती. लो. टिळक १९२० सालापर्यंत हयात होते. त्यांनी प्रत्येक सामाजिक सुधारणेला कसून विरोध केलेला होता. लो. टिळकांनी संमतिवयाच्या बीलाला, फॅक्टरी ॲक्टला, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला, अस्पृश्यता निवारणाला आणि स्त्री शिक्षणाला कसून विरोध केला होता. लो. टिळक हे राजकीय स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. पण सामाजिक चळवळीचे कट्टर विरोधक होते. १८८५ सालापासून इंडियन नॅशनल काँग्रेसचे अधिवेशनात न्या. रानडे प्रभुतींच्या प्रयत्नाने काँग्रेसच्या मंडपात सामाजिक

परिषद भरविण्याची प्रथा सूरू झाली होती. परंतू लो. टिळकांच्या हातात कॉंग्रेसची सूत्रं गेल्यानंतर सामाजिक परिषदेची अधिवेशने कॉंग्रेसच्या मंडपात भरविण्याचे बंद झाले. लो. टिळकांना असे वाटत होते की एकदां का हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले की सामाजिक सुधारणा चुटकीसरशी करता येतील. हे त्यांचं प्रामाणिक मत होत की सामाजिक चळवळीला बगल देण्यासाठी योजलेली युक्ती होती. हे समजणे कठीण आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर डॉ आंबेडकरांनी हिंदू कोड बील लोकसभेमध्ये मांडून ते मंजूर करून घेण्याचा प्रयत्न केला. खुद्द पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हिंदू कोड बिल मंजूर झाले नाही तर आपण राजिनामा देऊ असे अभिवचन दिले होते. परंतू हिंदू कोडापैकी घटस्फोटासंबंधीची फक्त चार कलमे मंजूर झाली. आणि संबंध हिंदू कोड बील बाजूला पडले. अधून मधून हिंदू कोड दुरुस्त करणारे एखादे विधेयक येते आणि मलमपट्टी बांधल्याप्रमाणे हिंदू कोडात सुधारणा होतात. परंतू मुळचे बील अजूनही मंजूर होऊ शकले नाही. ही खेदाची गोष्ट आहे. लो. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर सामाजिक सुधारणा चुटकीसरसी करता येतील हे त्यांच म्हणणं कसं निराधार होत याची प्रचीती या उदाहरणावरून आल्या शिवाय रहाणार नाही.

गेल्या शतकातल्या उत्तरार्धातील तीसरी चळवळ म्हणजे उदारमतवादी चळवळ. या चळवळीचे पुरस्कर्ते लोकहितवादी देशमुख, न्या. रानडे, ना. गोखले प्रभृती मंडळी होती. त्यांचा कल साधारणपणे जुन्यातलं सोनं आणि नव्यातील हवं ते घेऊन सामाजिक चळवळी करण्याचा होता. लोकहितवादी देशमुख व न्या. रानडे हे स्वतः जी तत्त्वे समाजाने अंगीकारावीत असे प्रतिपादन करीत तीच तत्त्वे स्वतः आचरणात आणण्यात कशी कच खात असत याची अनेक उदाहरणे मी मघाशी सांगितलेली आहेत.

लो. टिळक व आगरकर हे दोघेही समवयस्क. दोघांचाही जन्म १८५६ साली झालेला. कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणांत दोघांनीही कारावास भोगलेला होता. दोघांनी मिळून १८८० साली केसरी नावाचं वृत्तपत्र सुरू केल. परंतू राजकारणात व समाजकारणात दोघांचे विचार परस्पर विरोधी होते. राजकारण अगोदर की समाजकारण अगोदर या बाबतीत टिळकांचा कल राजकारणाकडे होता. तर आगरकरांचा कल समाजकारणाकडे होता. दोघांची परस्परविरोधी अशी विचारसरणी असल्यामुळे आगरकरांना केसरी सोडावा लागला व आपले सामाजिक विचार प्रभावीपणाने मांडण्यासाठी त्यांनी 'सुधारक' पत्राची स्थापना केली. या वर्तमानपत्रातून आगरकरांनी बुद्धिप्रामाण्यवादी सामाजिक चळवळींचा जोरदार पुरस्कार केला. लो. टिळकांनी केसरीतून आगरकांची भंबेरी उडविण्यास सुरवात केली. आगरकर हे फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य होते. प्राचार्य या नात्याने एक झोपडीवजा घर बांधून फर्ग्युसन कॉलेजच्या माळावर रहात असत. आगरकरांच्या सामाजिक सुधारणांचा लोकांच्यावर प्रभाव पडतो आहे हे पाहून केसरीतून त्यांची निर्भत्सना सुरू झाली. आणि एके दिवशी केसरीचा आगरकरांविषयी एक अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्या अग्रलेखाचा मथळा 'माळावरचा महारोगी' असा होता. यावरून सामाजिक चळवळीच्या बाबतीत टिळक आणि आगरकर यांचे संबंध किती बिनसले होते. हेच आपल्या निदर्शनाला आल्याशिवाय रहात नाही.

सामाजिक सुधारणा एका चुटकीसरशी कधीच होत नाहीत. त्याच्यासाठी अखंडपणे खस्ता खाव्या लागतात व चळवळी कराव्या लागतात. समाजाला चळवळीच्या रुपाने धक्का दिल्याशिवाय समाजाचं मतपरिवर्तन होऊ शकत नाही. पूर्वी राजकीय चळवळ करणाऱ्या माणसांच्या भोवती आपोआपच एक तेजोवलय निर्माण

झालेले होते. त्यांचा लढा हा ब्रिटीश सत्तेशी असल्याकारणाने गुलामगिरीत असलेल्या देशांतील सर्व लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा त्यांना मिळत होता. परंतू सामाजिक चळवळी करणाऱ्या नेत्यांना टीकेच्या अग्निदिव्यातून जावे लागते. त्यांना समाजामध्ये परिवर्तन घडवून आणणेसाठी कधी समाजाशी, कधी ते ज्या जातीत जन्माला आले असतील त्या जातीशी, तर कधी स्वतःच्या कुटुंबातील माणसाशी मुकाबला करावा लागतो. सामाजिक चळवळ करणाऱ्या लोकांना त्यांच्या हयातीत अपमानीत जीणे जगावे लागते. त्यांच्या कार्याच कौतुक व्हायला आणि गौरव व्हायला दोन-तीन पिढ्या जाव्या लागतात. त्यावेळी कोठे त्यांनी केलेल्या कर्याचे समाजाला महत्त्व पटू लागते.

म. फुले १८९० साली दिवंगत झाले. लोकहितवादी देशमुख हे १८९२ साली निधन पावले. आगरकर हे १८९५ साली मृत्यु पावले. न्या. रानडे १९०१ साली स्वर्गवासी झाले म्हणजे १८९० सालापासून ते १९०१ सालापर्यंत महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी करणारी कर्ती मंडळी एकापाठोपाठ एक नाहीशी झाली. सामाजिक परिषदेचे अस्तित्वही संपुष्टात आले त्यामुळे ही चळवळ सामाजिक क्रांतीची लाट ओसरती की काय ? ही सामाजिक क्रांतीची मशाल विझते की काय ? अशा प्रकारचा संभ्रम फार मोठ्या प्रमाणांत महाराष्ट्रात निर्माण झालेला होता. याचवेळेला शरिराने धिप्पाड, बुद्धीने अचाट, मुत्सद्देगिरीत हार न जाणारा असा एक राजबिंडा पुरुष महाराष्ट्रामध्ये सामाजिक क्रांतीच्या क्षितिजावर दिसू लागला. या थोर पुरुषाच वय होत फक्त २० वर्षाच त्याला मिसरूडही फुटली नव्हती. ओठ पिळले तर दूध निघेल असं त्याचं कोवळं वय होतं. अशा या अल्पवयस्क व्यक्तीवर महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची जबाबदारी येऊन पडली. म. फुले यांनी पेटविलेली सामाजिक क्रांतीची मशाल या

थोर पुरुषाने आपल्या हाती घेतली. म. फुले यांनी रोवलेले सामाजिक क्रांतीचे निशाण त्यांनी आपल्या खांद्यावर घेतले. १८९४ साली कोल्हापूर संस्थानची राज्यसूत्रे हाती आल्या बरोबर ही जबाबदारी त्यांचेवर येऊन पडली आणि जवळ जवळ २८ वर्षे म्हणजे १९२२ सालापर्यंत सामाजिक क्रांतीची ही चळवळ त्यांनी नुसत्या कोल्हापूरातच नव्हे केवळ महाराष्ट्रातही नव्हे तर सबंध हिंदुस्थानभर फैलावली. तो रार्जबिंडा पुरुष दुसरा तिसरा कोणी नसून कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होत. १९२२ साली त्यांचा हृदयविकाराने मृत्यु झाल्यानंतर त्यांनी हे सामाजिक क्रांतीचं निशाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दलित समाजातील विद्वान, धैर्यवान, शूर आणि पंडित अशा पुढाऱ्याकडे दिले. यांच्या कार्यासंबंधी व सामाजिक क्रांतीच्या चळवळीसंबंधी उद्याच्या व्याख्यानात मी ऊहापोह करणार आहे.

आजच्या व्याख्यानात मी महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे दोन टप्पे सांगितले आहेत. पेशवाई संपुष्टात आली त्यावेळे पासून तो १८४८ साली म. फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली तेथपर्यंतचा एक टप्पा. या टप्प्यात बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, जगन्नाथ शंकरशेठ, भाऊ महाजन प्रभुती मंडळीनी एक नव्या विचाराची झुळूक महाराष्ट्रात आणून सोडली. १८४८ साली म. जोतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढून महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीचे बीज रोवले म्हणून १८४८ साला-पासून ते १८९४ सालापर्यंत महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचा दुसरा टप्पा असे मी स्थूलमानाने मानले आहे. या काळांत न्या. रानडे, विष्णुशास्त्री पंडित, आगरकर यांनी या सर्वांत थोर म्हणजे म. फुले यांनी केलेल्या सामाजिक क्रांतीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या काळाचे प्रतिनिधित्व करणारे आणि सर्वस्पर्शी, सर्वव्यापी व सर्वगामी अशा प्रकारची चळवळ

म. फुले यांनी केली असल्यामुळे या कालाचं वर्णन एकाच शब्दात करावयाचे झाले तर ' झंझावात ' या शब्दानेच करता येईल.

आजच्या व्याख्यानात हे दोन टप्पे मी विस्ताराने विषद करून सांगितले आहेत. उद्याच्या व्याख्यानात दुसरे दोन टप्पे म्हणजे राजर्षि छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

आपण गेला तास–दीडतास माझं व्याख्यान शांतपणे ऐकून घेतले या बद्दल मी आपला आभारी आहे.

अध्यक्ष महाराज आणि बंधू भगिनीनो ! ' महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे ' या विषयावर आपण माझी दोन व्याख्याने आयोजित केलेली होती त्यापैकी पहिल्या दोन टप्प्या-संबंधीचा उहापोह कालच्या व्याख्यानात करून या विषयाचा पूर्वार्ध संपविला. आज राहिलेल्या दोन टप्प्यांसंबंधी माहिती देऊन या विषयाचा उत्तरार्ध पुरा करणार आहे.

पहिल्या टप्प्याचा केंद्रबिंदू मुंबई हा होता तर दुसऱ्या टप्प्याचा केंद्रबिंदू पुणे हा होता. पहिल्या टप्प्याचे प्रतिनिधित्व बाळशास्त्री जांभेकर यांचेकडे जाते. तर दुसऱ्या टप्प्याचे नेतृत्व म. जोतिबा फुले यांचेकडे जाते.

काल मी आपणास सांगितल्याप्रमाणे सामाजिक चळवळी करणारी मुंबई, पुण्यातील मंडळी नाहीशी झाल्यानंतर या चळवळीच्या भवितव्याबद्दल चिंता निर्माण झालेली होती. परंतू महाराष्ट्राच्या सुदैवाने या सामाजिक क्रांतीच्या क्षितिजावर छ. शाहू महाराजांचे रूपाने एक नवा तेजस्वी आणि दिप्तिमान सायंतारा उगवला आणि त्यांनी १८९४ सालापासून ते १९२२ सालापर्यंत म्हणजे जवळ जवळ २८ वर्षे या सामाजिक क्रांतीचे नेतृत्व केले.

छ. शाहू महाराजांचा जन्म १८७४ साली कागलच्या घाटगे घराण्यात झाला. १८८४ साली ते कोल्हापूर संस्थानच्या छत्रपती घराण्यात दत्तक म्हणून गादीवर आले व त्यांचा राज्यारोहण

समारंभ झाला. राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये व धारवाडला त्यांचे शिक्षण झाले. या कालात त्यांनी भारतभर प्रवास केला. १८९४ साली त्यांच्या हातात संस्थानची राज्यसूत्रे आली. हनुमानाने जन्म झालेबरोबर सूर्यबिंबाच्या दिशेने उड्डाण केले त्याच प्रमाणे महाराजांनी राज्यसूत्रे हातात आल्याबरोबर वयाच्या फक्त २० व्या वर्षी कोल्हापूर संस्थानात त्यावेळी प्रचलित असलेली वेठबिगार पद्धती बंद केली. इंग्रजीत "Forced Labour" म्हणतात तीच ही वेटबिगार पद्धती. वीस वर्षाचा मुलगा पण त्याची दृष्टी किती विशाल होती हीच गोष्ट आपल्याला या वरून दिसून येते. हिंदुस्थान १९४७ साली स्वतंत्र झाला. त्यानंतर पं. जवाहरलाल नेहरूंच्यासारखा जग-विख्यात थोर पुरुष भारताचा पंतप्रधान झाला. त्यांच्या नंतर लालबहादूर शास्त्री व श्रीमती इंदिरा गांधी भारताचे पंतप्रधान झाले आणि जवळ जवळ २९ वर्षे हिंदुस्थानामध्ये काँग्रेसची अबाधित राजवट होती. परंतू वेठबिगार पद्धती बंद करण्याची कल्पना पं. जवाहरलाल नेहरूंना, शास्त्रीना अगर इंदिराजीना १९७६ पर्यंत सुचली नाही. मात्र इंदिराजी पंतप्रधान असताना १९७६ सालच्या जानेवारी महिन्यात आणिबाणी चालू असता लोकसभेने वेठबिगार बंद करण्याचा कायदा केला. म्हणजे हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर वेठबिगार रद्द होण्याला २९ वर्षे लागली. तो कायदा छ. शाहू महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेतल्याबरोबर म्हणजे १८९४ साली केला या गोष्टीवरून 'दृष्टे पुरुष कालाचे पुढे असतात' या म्हणीची प्रचीती आल्याशिवाय रहात नाही.

१८९४ साली महाराजांनी राज्यसूत्रें हाती घेतली त्या वेळी झालेल्या समारंभास हजर राहणेसाठी पुण्याच्या 'सार्वजनिकसभे' चे एक शिष्टमंडळ कोल्हापूरला आलेले होते. कै. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी या शिष्टमंडळाचे नेतृत्व केले होते. सार्वजनिक

सभेतर्फे या शिष्टमंडळाने महाराजांना एक मानपत्र दिले. त्या मानपत्रामध्ये त्यांनी महाराजांना उद्देशून 'तुम्ही छत्रपति घराण्यात जन्माला आलेला आहात. छत्रपतींच्याकडे महाराष्ट्राचे नेतृत्व नैसर्गिक असते. तुम्ही कोल्हापूर संस्थानचे अधिपती असल्यामुळे कोल्हापूरच्या जनतेची काळजी घेणे हे तुमचे परमपवित्र कर्तव्य आहेच पण त्याचबरोबर सर्वसामान्यपणे महाराष्ट्राच्या जनतेची काळजी घेणे हे देखील छत्रपती या नात्याने आपले कर्तव्य आहे.' अशा आशयाचे उद्‌गार छत्रपतींना उद्देशून ना. गोखले यांनी मानपत्रात नमूद होते. राज्यसूत्रे हाती घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कै. लो. बाळ गंगाधर टिळक यांनी केसरीमध्ये 'करवीर क्षेत्री कपिलाषष्ठीचा योग' असा मथळा देऊन एक अग्रलेख लिहिला होता. या अग्रलेखात लो. टिळकांनी नामदार गोखल्यांच्या प्रमाणेच छत्रपती शाहू महाराजांच्याबद्दल आपले विचार व्यक्त केले होते. या दोन थोर पुरुषांनी महाराजांच्याकडून ज्या अपेक्षा केलेल्या होत्या त्या अपेक्षा पुढच्या २८ वर्षात महाराजांनी पुऱ्या करून दाखविल्या.

महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेतल्यानंतर आपल्या अवती-भोवतीच्या परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले. त्यांना दिसून आलेली हिंदुसमाजामध्ये वर्णवर्चस्व, सामाजिक विषमता, खोल रुजलेली अस्पृश्यता आणि अज्ञान फार मोठ्या प्रमाणात आहे. नोकरीमध्ये बहुतांशी ब्राह्मण समाजाचा भरणा आहे. धार्मिक आणि सामाजिक बाबतीत ब्राह्मणांचे वर्चस्व फार मोठ्या प्रमाणात आहे. जातिभेद तीव्र स्वरूपात आहेत हे सगळे नाहीसे करावयाचे झाले तर शिक्षण हाच त्याच्यावर एकमेव रामबाण उपाय आहे. म. जोतिबा फुल्यांनी सर्वसामान्य जनतेला शिक्षणावाचून तरणोपाय नाही हे सूत्र हाती घेतले होते व त्या दृष्टीने त्यांनी हयातभर प्रयत्न चालविले होते. इंग्लंडमध्ये १८८० साली

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत झाले पाहिजे अशा प्रकारचा कायदा झाला होता. त्याचाच आधार घेऊन हिंदुस्थान सरकारने १८८२ साली शिक्षणविषयक प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी व योजना आखण्यासाठी एक कमिशन नेमले होते. त्या कमिशनचे नाव 'हंटर शिक्षण कमिशन' (आयोग) या कमिशनपुढे साक्ष देताना म. जोतिबा फुल्यांनी हिंदुस्थानामध्येसुद्धा सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले पाहिजे असे सांगितले होते. त्याच सुमारास हिंदुस्थानामध्ये जे मोठ मोठे राजकीय पुढारी व विचारवंत होते त्यांनी व खुद्द ब्रिटीश सरकारने शिक्षण क्षेत्रामध्ये 'Filtration Theory' चा पुरस्कार केलेला होता. फिल्टरेशन थिअरी म्हणजे झिरपण्याचा सिद्धांत. वरच्या वर्गाला शिक्षण दिले म्हणजे ते झिरपत झिरपत तळच्या वर्गापर्यंत केव्हा ना केव्हा तरी जाईल. अशा प्रकारचा तो सिद्धांत होता. म. जोतिबा फुल्यांनी या सिद्धांताला तीव्र विरोध केला. त्याचे कारण असे की हिंदुसमाजातील जातिव्यवस्था ही एकावर एक ठेवलेल्या अनेक भांडयाच्या उतरंडी प्रमाणे आहे. सर्वात वरचे भांडे हे ब्राह्मणांच ! व हिंदु समाजातील अनेक पंथ, जाती, पोट-जाती यांनी रचलेल्या या उतरंडीचे तळाचे भांडे म्हणजे भंगी समाज. म. फुल्यांच्या मते अशा या जातिप्रधान व्यवस्थेमध्ये झिरपण्याची क्रिया कदापिही होणे शक्य नाही कारण गेल्या तीन-चार हजार वर्षांत ज्ञानाची मक्तेदारी फक्त ब्राह्मणसमाजापुरतीच मर्यादित राहिली. पिढयानुपिढया, शतकानुशतके इतर वर्ण, वर्ग, जाती-पोटजाती या शिक्षणापासून वंचित राहिल्या. या उतरंडीची भांडी मातीचीच असतील तर कदाचित वरच्या मडक्यातले पाणी झिरपत झिरपत उशिरा का होईना खालच्या मडक्यापर्यंत पोहोचले असते. परंतू हिंदुसमाजातील जातिव्यवस्था इतकी टणक आहे की ही भाडी मडक्याची नसून धातूची आहेत. त्या मुळे वरच्या भांडयातले पाणी खालच्या भाडयापर्यंत कसे पोहोचणार. म्हणून हा झिरपण्याचा सिद्धांत

जातिव्यवस्था आहे तोपर्यंत हिंदुस्थानला कदापी लागू पडणार नाही. सर्वसामान्य जनतेला मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे अशा प्रकारे म. फुल्यांनी आग्रहाने मागणी केलेली होती.

म. फुल्यांचे हे सूत्र छ. शाहू महाराजांनी घट्ट हाती धरले आणि आपल्या राज्यापुरते तरी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. त्या मुळे विद्यार्थ्यांची व शाळांची संख्या वेगाने वाढू लागली. महाराष्ट्रामध्ये प्रा. शिक्षण सक्तीचे व मोफत हे १९४७ साली सुरू झाले हीच गोष्ट महाराजांनी १९१७ सालच्या सुमारास केली. यावरून दृष्टे पुरुष आपल्या कालाच्या पुढे असतात या म्हणीची प्रचीती येते. महाराजांनी प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच दुय्यम शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षणाची सुद्धा व्यवस्था केली. परंतू गोर-गरीब मुलांना दुय्यम शिक्षण किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेणे दुरापास्त होते. विशेषत: संस्थानातील खेड्यापाड्यांतील अगर संस्थानाबाहेरील गोर-गरीब मुलांना केवळ त्यांच्या गरिबीमुळे अशा प्रकारच्या शिक्षणाला पारखे व्हावे लागत असे. म्हणून महाराजांनी विद्यार्थी वसतिगृहांची एक नवी कल्पना अंमलात आणावयास सुरवात केली. शिक्षणासाठी बाहेरून कोल्हापूर शहरात येणाऱ्या गोर-गरीब मुलांच्या विद्याभ्यासाची, जेवणाखाण्याची, दिवाबत्तीची, कपड्यालत्त्याची, पुस्तके, वह्या यांची व्यवस्था करणे आवश्यक होते त्यावेळी खानावळीचा दर ५ ते ७ रुपये होता. ती ही ब्राह्मणी खाणावळ. खेड्यांतून आलेल्या मुलांना महिना ५ रुपये देणेसुद्धा परवडत नसे. शिवाय खाणावळवाले ब्राह्मण बहुजन समाजातील जी व्यक्ती खानावळीत जेवत असे त्याला आपल्या पत्रावळी स्वत:च काढाव्या लागत असे व पत्रावळी खालची जमीन शेणकाल्याने सारवून घ्यावी लागत असे. जेवणाऱ्याच्या खिशातून पैसे घेताना या खानावळ–

वाल्यांना शिवाशीव वाटत नसे. परंतू त्यांच्या पत्रावळी काढतांना त्यांचे ब्राह्मण्य आड येत असे. अस्पृश्यांना तर खाणावळीत जाण्याचा मज्जावच होता. तेव्हा ही सारी परिस्थिती विचारात घेऊन लोकांच्या मध्ये जर सुलभ रितीने व मोठ्या प्रमाणात शिक्षण प्रसार करावयाचा असेल तर कोल्हापूर शहरामध्ये विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांची स्थापना करणे आवश्यक होते एखाद्या शहरात अनेक जाती-जमातींची वसतिगृहे काढणे, त्यांना जमीन मिळवून देणे, त्यांना इमारती बांधण्यासाठी मदत करणे. संस्थानच्या तिजोरीतून या वसतिगृहांना त्यांच्या नित्य आणि नैमित्तिक खर्चाची तरतूद करणे. मुलांच्या जेवणाखाण्याची, दिवाबत्तीची, कपड्यालत्याची व केशकर्तनाचीसुद्धा व्यवस्था करणे ही खास महाराजांची कल्पना. यापूर्वी वसतिगृहे होती पण ती महाविद्यालयाला जोडून होती मुंबईचे विल्सन कॉलेज, एलफिनस्टन कॉलेज किंवा पुण्याचे फर्ग्युसन कॉलेज या महाविद्यालयांची वसतिगृहे त्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या पुरतीच मर्यादित होती. याशिवाय स्वतंत्रपणाने वसतिगृहे स्थापण्याचा प्रयत्न महाराष्ट्रात कुठेही व कोणीही केला नव्हता. अशा प्रकारची वसतिगृहे स्थापण्याचा प्रयत्न केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध हिंदुस्थानात महाराजांनीच प्रथम केला.

महाराजांनी निरनिराळ्या जातींची वसतिगृहे काढली म्हणून काही विचारवंत मंडळी त्यांना एक प्रकारे जातिभेद वाढविण्याला मदत केली अशा प्रकारचा दोष देतात. परंतू भिन्न भिन्न जातींची वसतिगृहे काढण्यापूर्वी महाराजांनी राजाराम कॉलेजला जोडून कॉलेजमधील सगळ्या जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांचेसाठी एकच वसतिगृह स्थापन केले होते व त्याची जबाबदारी कॅं. न्या. गोखले यांच्यावर सोपविली होती. गोखले हे कोल्हापूर संस्थानात न्यायाधीश होते. त्यांचे कडून तरी निदान पक्षपात होणार नाही

अशी महाराजांची अपेक्षा होती. या वसतिगृहाच्या खर्चासाठी वर्षाचे काठी दरबारातून दहा हजार रुपयांची तजवीजही केली होती. कित्येक वर्षांत या वसतिगृहामध्ये ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही. ही गोष्ट महाराजांचे नजरेस आली म्हणून महाराजांनी त्या वसतिगृहाचे अनुदान बंद केले. सगळ्या जातींचे एकच बोर्डिंग असावे असा महाराजांनी केलेला प्रयोग फसला आणि मग महाराजांनी भिन्न भिन्न जातींची वसतिगृहे काढण्याचा संकल्प केला.

आपला समाज निरनिराळ्या जातीत विभागला आहे. कोणाही व्यक्तीला स्वतःच्या जातीचा थोडाफार अभिमान असतोच. कुठल्या जातीत जन्माला येणे हे काही माणसाच्या हातात असत नाही. तो एक अपघात आहे. परंतू कोणत्या का होईना जातीत जन्माला आल्यानंतर त्या माणसाला आपल्या जातीबद्दल प्रेम व अभिमान वाटतो. हा अभिमान बाळगीत असताना सुद्धा कोणत्याही जातीतील सूज्ञ आणि समंजस व्यक्तीने स्वतःची जात आणि इतर जाती यांच्यामध्ये सलोखा, सहिष्णुता आणि साहचर्य निर्माण व्हावे या दृष्टीने प्रयत्न करणे हे त्याचे कर्तव्य असते. महाराजांची एक अपेक्षा होती की जातिभेद मोडायचे झाले तर भिन्न भिन्न जाती मधील जी तरुण मुले आहेत त्याना प्रथम शिक्षण देणे आवश्यक आहे. शिक्षणाचीद्वारे सगळ्यांना खुली असली पाहिजेत. ज्ञानार्जनाची साधने व सुखसोयी त्यांना उपलब्ध झाल्या पाहिजेत आणि या सर्वांचा परिणाम हीच भिन्न भिन्न जातीतील मुले हळू हळू जातिभेद मोडायला तयार होतील.

१९३५ च्या घटना कायद्याप्रमाणे १९३७ साली सर्व भारतभर निवडणुका झाल्या. कॉंग्रेस या निवडणुकीत भाग घ्यायला तितकीशी उत्सुक नव्हती. कायदे मंडळावर बहिष्कार टाकण्याची

भाषा चालू होती पण शेवटी काँग्रेसने निवडणुका लढविण्याचे ठरविले आणि या निवडणुका लढविताना त्यांनी १९३५ चा घटना कायदा आम्हाला मान्य नसल्याकारणाने आम्ही निवडून येऊन हा घटना कायदा मोडण्याचे ठरविले आहे. हे जसे काँग्रेसला घटना कायदा मोडण्यासाठी त्या घटनेप्रमाणे होणाऱ्या निवडणुकीत भाग घ्यावा लागला. तद्वतच महाराजांनी तत्कालीन परिस्थिती विचारांत घेऊन निरनिराळ्या जातींची वसतिगृहे काढली. कारण त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते की या वसतिगृहांतून शिकून जी पिढी बाहेर पडेल ती हिंदुसमाजातील जाती मोडायला मदत करील म्हणून महाराजांनी निरनिराळ्या जातींच्या पुढारी मंडळीना बोलावून त्यांना तुमच्या जातीतील गोरगरिब मुलांचेसाठी वसतिगृहे काढा मी त्यांना हरेक प्रकारची मदत करतो. असे सांगितल्यानंतर कोल्हापूर शहरामध्ये १९०१ सालापासून ते १९२२ सालापर्यंत म्हणजे महाराजांचे मृत्युपर्यंत भिन्न भिन्न धर्मांची व भिन्न भिन्न जातींची एकूण २३ वसतिगृहे अस्तित्त्वात आली.

१९०१ साली व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगची स्थापना झाली व १९२० साली प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगची स्थापना झाली. परंतू ही दोन्ही बोर्डिंगे महाराजांनी मराठा समाजापुरती मर्यादित ठेवलेली नव्हती. या दोन्ही बोर्डिंगात मराठ्यांच्या मुलाबरोबरच मुसलमान, साळी, माळी, कोष्टी, भोई वगैरे जातींच्या मुलांचीही व्यवस्था केली होती. त्याच प्रमाणे महाराजांनी आर्य समाजाचे 'गुरूकुल' हे बोर्डिंग काढले होते. या विद्यार्थी वसतिगृहांत स्पृश्यास्पृश्य अशा दोन्ही प्रकारचे विद्यार्थी ताटालाताट व मांडीलामांडी लावून एकत्रित बसत, जेवत व अभ्यास करीत. हे दृष्य दिसून येत होते. महाराजांची दृष्टी जातिभेदातीत आणि धर्मातीत कशी होती हे यावरून दिसून येणार आहे. या शिवाय

अस्पृश्य, मुसलमान, जैन लिंगायत, ख्रिश्चन, शिंपी वगैरे जातींच्या व धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी वसतिगृहांची स्थापना केली. विद्यार्थी वसतिगृहे ही खास महाराजांचीच कल्पना असल्यामुळे हिंदुस्थानातील विद्यार्थी वसतिगृहाचे आद्यजनक म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा गौरवपूर्वक उल्लेख करणे उचित होईल. महाराज मोठ्या अभिमानाने म्हणत असत की इंग्लंडचे पार्लमेंट हे जगांतील सगळ्या पार्लमेंटची जननी आहे. तसेच कोल्हापूर हे भारतातील सगळ्या विद्यार्थी वसतिगृहाची जननी आहे. परंतू या कल्पनेचे आद्य पुरस्कर्ते खुद्द छत्रपतीच होते. ही गोष्ट आपल्याला विसरता येणार नाही. महाराजांची विद्यार्थी वसतिगृहाची कल्पना किती यशस्वी झाली हे या विद्यार्थी वसतिगृहांतून शिकून बाहेर पडलेले विद्यार्थी पाहिल्यानंतर आपल्याला दिसून येईल. वानगी दाखल काही नावे मी आपल्यापुढे ठेवित आहे. भारतातील सुप्रसिद्ध कृषितज्ञ डॉ. पी. सी. पाटील, भारताचे माजी उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती, पंजाबचे माजी गव्हर्नर व कर्नाटक विद्यापीठाचे माजी कुलगुरू डी. सी. पावटे, सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ जे. पी. नाईक, कै. पद्मभूषण भाऊराव पाटील, महाराष्ट्रातील माजी मंत्री बाळासो. देसाई, यशवंतराव मोहिते, तसेच सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ डॉ. अंकूश गावडे इत्यादि निरनिराळ्या क्षेत्रांतील थोर पुरुष महाराजांनी स्थापन केलेल्या विद्यार्थी वसतिगृहांच्या आधारानेच मोठ्या पदाला चढली.

आज ही बहुतांशी सर्व विद्यार्थी वसतिगृहे चालू आहेतच पण त्यांनी विद्यार्थ्यांची संख्या व आपला शैक्षणिक व्यापही वाढविलेला आहे. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगचे आता शाहू बोर्डिंगमध्ये नामांतर झाले आहे. या शाहू बोर्डिंगतर्फे व प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगतर्फे दोन महाविद्यालये चालू आहेत आणि या दोन्ही महाविद्यालयांना 'Quality Colleges' म्हणून शिवाजी विद्यापीठाची

व विद्यापीठ अनुदान मंडळाची मान्यता मिळालेली आहे. या दोन्ही महाविद्यालयामध्ये आज अनुक्रमे २००० व ३००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही महाराजांनी खास लक्ष पुरविले होते. मुलींच्यासाठी स्वतंत्रपणाने प्राथमिक शाळा काढल्या होत्या. प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत मुलींना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. मुलींच्यासाठी एक वसतिगृह ही महाराजांनी काढले होते व त्यांच्यासाठी शिष्यवृत्त्या ठेवल्या होत्या. भावनगर संस्थानचे अधिपती कै. भाऊसिंगजी महाराज हे महाराजांचे जिवलग स्नेही होते. त्या संस्थानातील मुलींच्या शिक्षणासाठी शाहू महाराजांनी शिष्यवृत्त्या ठेऊन गुजराथमधील स्त्रियांनीसुद्धा शिक्षण घ्यावं अशा प्रकारची व्यवस्था केली होती.

कोल्हापूर संस्थानात ज्याप्रमाणे सर्वांगीण विद्यादानाची महाराजांनी व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे कोल्हापूर बाहेर महाराष्ट्रांत बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून पुणे, नगर, नाशिक, नागपूर, पंढरपूर, धारवाड या ठिकाणी विद्यार्थी वसतिगृहे स्थापनेसाठी सढळहाताने मदत केली होती. पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे महाराज तहाहयात अध्यक्ष होते. महाराजांनी या संस्थेच्या फर्ग्युसन कॉलेजला सुमारे ६० हजार रुपये पर्यंत मदत केली आहे. गोर-गरीब मराठा विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी म. फुल्यांचे सहकारी गंगाराम भाऊ मस्के यांनी ' डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी ' ही संस्था स्थापन केली होती. या संस्थेचे महाराज पेट्रन होते. पुण्याची शिवाजी मराठा सोसायटी व त्या संस्थेचे शिवाजी मराठा हायस्कूल, ताराबाई मराठा बोर्डिंग आणि मॉडर्न हायस्कूल या संस्थाना महाराजांनी भरघोस आर्थिक सहाय्य केले होते. नाशिकला

उदाजी मराठा बोर्डिंगच्या कोनशिला समारंभासाठी महाराज गेलें असता त्या संस्थेला तर महाराजांनी मदत केलीच पण तिथल्या महार समाजाने व वंजारी समाजाने आपापल्या समाजासाठी विद्यार्थी वसतिगृहे काढण्यासाठी महराजांचेकडे मदतीची याचना केली तर महाराजांनी त्यांनाही मदत केली. १९२० साली महाराज अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून नागपूरला गेलें असता तेथील अस्पृश्य पुढारी कै. गणेश अक्काजी गवई यांनी आपल्या चोखामेळा बोर्डिंगला भेट द्यावी म्हणून महाराजांना विनंती केली. महाराजांनी भेट ही दिली आणि या संस्थेला पांच हजाराची मदतही केली. महाराजांचे दत्तक-वडिल चौथे शिवाजी महाराज यांचा नगरला अंत झालेला होता. तिथल्या स्थानिक मंडळींनी त्यांच्या स्मरणार्थ तिथे एक वसतिगृह काढलेले होते या ही संस्थेला महाराजांनी भरपूर आर्थिक सहाय्य केले. सध्या त्या संस्थेतर्फे विद्यार्थी वसतिगृहाशिवाय एक माध्यमिक शाळा, कला वाणिज्य, शास्त्र, विधी महाविद्यालय व टिचर्स ट्रेनिंग कॉलेज अशा संस्था काढल्या आहेत. १९१७ सालच्या सुमाराला महाराज खामगांव येथे मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष म्हणून गेले होते. त्यावेळी महाराजांचे भाषण ऐकून तिथल्या कांही स्थानिक कार्यकर्त्यांनी ' बेरॉर एज्युकेशन सोसायटी ' या नावाची एक संस्था काढलेली होती. त्या सस्थेतर्फे एक हायस्कूल सुरू करण्याचा निर्णय घेतला. महाराजांनी त्या संस्थेला आठ हजार रुपये मदत करतो म्हणून सांगितले. परंतु महाराजांच्या अकाली निधनामुळे ती मदत त्या संस्थेला मिळू शकली नाही. त्यामुळे संस्थाही मोडकळीस आली होती. परंतु विदर्भाच्या राजकारणांत बहुजन समाजातले तरुण कार्यकर्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ते हायस्कूल आपल्या ताब्यात घेतले. आणि शाहू महाराजांच्या आठ हजार रुपये मदत देणेच्या अभिवचनाची आठवण महाराजांचे सुपुत्र छत्रपती राजाराम महाराज यांना देऊन त्यांचेकडून तेवढी रक्कम घेतली. या

आर्थिक मदतीच्या बळावर बेरॉर एज्युकेशन सोसायटीचे नामांतर शिवाजी एज्युकेशन सोसायटीत केले व शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सध्या विदर्भामध्ये या संस्थेची जवळ जवळ दोनशे हायस्कूल्स, २५-३० महाविद्यालये, अनेक विद्यार्थी वसतिगृहे सुरू करून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी या संस्थांचे जाळेच निर्माण केलेले आहे. शिवाजी एज्युकेशन सोसायटी आणि त्या सोसायटीच्या या अनेकविध संस्था याचं उगमस्थान शाहू महाराजांनी खामगांवला केलेलं भाषण आणि त्या भाषणाचेवेळी जाहीर केलेली देणगी होती असं म्हणायला हरकत नाही.

कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराजांचे पट्टशिष्य. महाराजांच्या मृत्युनंतर १९२२ साली त्यांनी महाराजांच्या स्मरणार्थ शाहू विद्यार्थी वसतिगृह या नावाची एक संस्था स्थापन करून रयत शिक्षण संस्थेचा पाया घातला. म. गांधीनी या वसतिगृहाला भेट दिली. त्यांनी भाऊरावांना विचारलं की शाहू महाराजांनी तुम्हाला किती पैसे दिलेले आहेत ? भाऊरावानी सांगितलं की महाराज हयात असते तर मला पैशाची ददात पडली नसती. परंतू महाराज दिवंगत झाल्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ मी ही संस्था काढलेली आहे. शाहू महाराजांनी मला जर काही दिलं असेल तर समाजसेवेची दृष्टी दिली आहे आणि महाराजांनीं दिलेली ही दृष्टीं घेऊन मी खेड्यापाड्यांतील समाजाला शिक्षण देण्याचं व्रत घेतलेलं आहे. शिवाजी एज्युकेशन सोसायटी प्रमाणेच रयत शिक्षण संस्थेचा व्यापही महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांत महाविद्यालये, माध्यमिक शाळा, विद्यार्थी वसतिगृहे, अनाथाश्रम वगैरे काढून चालविला आहे.

भाऊराव पाटील यांचे प्रमाणेच कै. भाऊसाहेब हिरे हे नाशिक येथे उदाजी मराठा बोर्डिंगमध्ये विद्यार्थी म्हणून शिकत असताना महाराजांचेकडून प्रेरणा घेऊन त्यांनी नाशिक व डांग (गुजरात)

जिल्ह्यात शेकडो प्राथ. शाळा व माध्यमिक शाळा काढल्या आहेत. महाराजांनी आणि महाराजांच्या प्रेरणेने सबंध महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार फार मोठ्या प्रमाणात झाला आहे. त्या मुळे महाराष्ट्राच्या समाजकारणावर आणि राजकारणावर फार मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते.

१८९४ साली महाराजांच्या हातात राज्यसूत्रे आल्यानंतर आणखी एका गोष्टीची त्यांना प्रखरतेने जाणीव झाली. सरकारी नोकरीत एकट्या ब्राह्मण जातीचाच भरणा फार मोठ्या प्रमाणात झालेला होता. १८४० सालापासून तो महाराज गादीवर येईपर्यंत कै. बाबासाहेब महाराज, कै. राजाराम महाराज, कै. चौथे शिवाजी महाराज यांच्या अल्पवयस्क कारकिर्दी झाल्या आणि त्यामुळे कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभारात ब्रिटिश सरकारचा हस्तक्षेप सुरू झाला. १८४४ साली दाजी पंडित यांची ब्रिटिश सरकारतर्फे कोल्हापूर संस्थानचे कारभारी म्हणून व मेजर ग्रॅहॅम यांची पोलिटिकल सुपरिटेंडेंट म्हणून नेमणूक झाली आणि चौथे शिवाजी महाराजांचे वेळी महादेव वासुदेव बर्वे हे कोल्हापूर संस्थानचे कारभारी म्हणून काम करत होते. दाजी पंडितापासून ते महादेव वासुदेव बर्वे यांच्यापर्यंत म्हणजे जवळ जवळ ४० वर्षात कोल्हापूर संस्थानच्या वरीष्ठ श्रेणीच्या नोकरीत युरोपियन आणि पारशी अधिकारी यांच्या नेमणुका झाल्या होत्या व दुय्यम श्रेणीच्या आणि तत्सम नोकऱ्यामध्ये स्थानिक व बाहेरील ब्राह्मण लोकांचा भरणा फार मोठ्या प्रमाणात झाला होता. एरव्ही संस्थानच्या प्रजाजनांत ३% एवढीच ज्यांची लोकसंख्या होती त्यांनीच संस्थानच्या नोकरीत मात्र ९७% जागा व्यापलेल्या होत्या. ही गोष्ट महाराजांच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नाही. हीच अवस्था ब्रिटिश हद्दीतही होती. ब्राह्मण समाजाला दोन तीन हजार वर्षांपासून विद्येची परंपरा असल्याने आणि विशेषतः पेशवा-

ईच्या काळात सर्व क्षेत्रात त्यांचे प्रभुत्व असल्याकारणाने इंग्रजी राजवट सुरू झाल्यानंतर सुद्धा विद्येबद्दल आस्था असणारा हा एकमेव वर्ग होता. ब्रिटिशांनी पौर्वात्य शिक्षणाला फाटा देऊन पश्चिमात्य शिक्षण पद्धती सुरू केल्यानंतर ब्राह्मण समाजाने संस्कृतकडे पाठ फिरवून इंग्रजी भाषेतील शिक्षणाचे दिशेने वाट-चाल सुरू केली. बाकीचा समाज निद्रित होता पण ही एकमेव जात संपूर्णपणाने जागृत होती. शाहू महाराज गादीवर आले त्यावेळी साक्षरतेचे प्रमाण पाहिले तर ब्राह्मण समाजामध्ये ते सुमारे ८५% असल्याचे दिसून येते. उलटपक्षी बहुजन समाजातील निरनिराळ्या जातीमध्ये हे प्रमाण १% पासून ते जेमतेम १०% पर्यंत जात होते. परंतू बहुजन समाजातील जी काही थोडी फार मंडळी शिकलेली असत त्यांना ब्राह्मण समाजाच्या मक्तेदारी मुळे नोकरीची द्वारे संपूर्णपणे बंद होती. म्हणून शिक्षणाच्या चळवळीला चालना देत असताना महाराजांनी विद्येत मागासलेल्या या समाजाला काही खास संरक्षण दिल्याशिवाय नोकरीत व राज्य-कारभारात स्थान मिळणार नाही ही गोष्ट हेरून १९०२ साली इंग्लंडला एडवर्ड बादशहाच्या राज्याभिषेक समारंभाला गेले असता तेथूनच एक वटहुकूम काढून विद्येत मागासलेल्या वर्गांसाठी नोकरीत ५०% जागा राखून ठेवल्याचे जाहीर केले. शेकडा ५०% जागा विद्येत मागासलेल्या लोकांचेसाठी राखून ठेवणारा हिंदुस्थानातील ६०० संस्थानिकांपैकी हा एकमेव संस्थानिक होता. इतर संस्थानिक पराच्या गादीवर लोळण्यामध्ये, चंगी-भंगी जीवन जगण्यामध्ये व ख्याली खुशाली मध्ये आपलं आयुष्य कंठीण होते. अशा प्रकारचं जीवन कंठणं शाहू महाराजांनाही अवघड नव्हतं. परंतू हा लोकांचा राजा होता. राजदंड ही शोभेची वस्तू नसून ते सेवेचे साधन आहे. याची जाणीव ठेवणारा हा राजा होता. राजवाड्यातून महारवाड्यात जाणारा हाच पहिला राजा. महाराज महारवाड्यात गेले ते फॅशन म्हणून गेले नाहीत तर त्या

लोकांची दुःखं, अडचणी काय आहेत हे समजावून घेणेसाठी, त्यांचे अश्रू पुसण्यासाठी, त्यांच्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी गेले. गोरगरीब, रंजलेले-गांजलेले, नडलेले, नाडलेले, पिडलेले अशा या सगळ्या लोकांना आपल्या मदतीचा हात देण्यासाठी म्हणून हा राजा महारवाड्यात गेला, खेड्यापाड्यात गेला, जंगलात गेला आणि सामान्यातल्या सामान्य माणसाशी मिळून मिसळून वागण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्या वेळचा काळ असा होता की अस्पृश्य समाजाबरोबर जेवण करणं, त्यांच्या वस्तीत जाणं, त्यांची झुणकाभाकर खाणं ही गोष्ट पापात गणली जात असे. म्हणून अस्पृश्यासह विद्येत मागासलेल्या सर्व लोकांना खास संरक्षण देण्यासाठी, नोकरीमध्ये शेकडा ५०% जागा त्यांना देण्याची व्यवस्था केली अशी व्यवस्था करणारा हा हिंदुस्थानातील पहिलाच राजा होता. त्या नंतर २०–२५ वर्षांनी माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांचा अंमल झाल्यानंतर मुंबई प्रांतात व मद्रास प्रांतात राखीव जागा ठेवण्याचा उपक्रम सुरू झाला. त्या मुळे बहुजन समाज व अस्पृश्य समाज यांना काही प्रमाण नोकरीमध्ये निश्चितपणे प्रवेश मिळत होता. परंतू १९३७ साली कॉंग्रेसचे खेर मंत्रिमंडळ आल्यानंतर गुणवत्तेच्या गोंडस नावाखाली Advanced class, Intermediate class, Backward class साठी राखून ठेवलेल्या जागा कमी केल्या त्यामुळे बहुजन समाजाचे अपरिमित नुकसान झाले.

महाराजांनी १९०२ सालचा वटहुकूम काढल्यानंतर कोल्हापूर संस्थानच्या नोकरीत हळू हळू बहुजन समाजाचा व मागासलेल्या वर्गांचा भरणा फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. शाहू महाराजांच्या मृत्युच्यावेळी महाराजांनी सुरवातीला मनाशी बाळगलेली इच्छा बहुतांशी फलद्रुप झाली असे म्हणावयास हरकत नाही. महाराजांनी डोळसपणाने आपल्या राज्यातील ब्राह्मणासह

सर्व जातीजमातींना नोकऱ्यामध्ये व राज्यकारभारामध्ये योग्य तो न्याय मिळावा म्हणून प्रयत्न केले. परंतू ब्राह्मण समाज त्यांच्या मक्तेदारीला शह बसल्यामुळे दुखावला गेला. वर्तमानपत्रे त्यांच्याच हाती असल्यामुळे महाराजांचेवर चोहोकडून टीकेचा भडीमार सुरू झाला. पुढे कोल्हापूरात जे वेदोक्त प्रकरण निर्माण झाले त्याचे कारण महाराजांनी बहुजन समाजाच्या व अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी अवलंबलेले धोरण होते हेच दिसून येईल.

महाराजांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या सवलती दिल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. विद्यार्थी वसतिगृहांची सोय केली. माध्यमिक शाळेत व महाविद्यालयात शिष्यवृत्त्या, नादाऱ्या व अर्धनादाऱ्या दिल्या त्यामुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजातील होतकरू विद्यार्थी शिक्षण घेणेच्या आशेने कोल्हापूर येथे मोठ्या प्रमाणात येऊ लागले. कोकणपट्टी, विदर्भ, खानदेश, मराठवाडा वगैरे लांबच्या भागातून सुद्धा कोल्हापूर येथे विद्यार्थी आले. कोल्हापूर हे त्यावेळी महाराजांच्या नेतृत्त्वामुळे सत्यशोधक समाजाचे व सामाजिक क्रांतीचे एक शक्तीशाली केंद्र झालेले होते. येथे बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांच्यावर येथील सामाजिक चळवळीचा खोलवर परिणाम होत असे. आणि शिक्षण संपल्यानंतर असे काही विद्यार्थी कोल्हापूर संस्थानच्या नोकरीत अगर ब्रिटिश सरकारच्या नोकरीत जात असत किंवा परत आपापल्या जिल्ह्यांत जाऊन स्वतंत्र व्यवसाय करीत असत. महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजाची चळवळ विदर्भासह सबंध महाराष्ट्रात फैलावली त्याचे कारण छत्रपती शाहू महाराजांचे महाराष्ट्रातील दौरे हे जसे होते तसेच कोल्हापूर येथे शिक्षण घेत असता सामाजिक चळवळीचे संस्कार घेऊन जे विद्यार्थी परत आपल्या गावी जात असत ते तिथे अशा चळवळी सुरू करीत असत.

महाराजांनी कोल्हापूरात व कोल्हापूराबाहेर शिक्षणाचा प्रसार करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असता त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्नही हाती घेतला होता. अस्पृश्यांना कोणी पुढारी नव्हता व कोणी वालीही नव्हता. त्यांची स्थिती फार हलाखीची झालेली होती. म. फुल्यांचे शिवाय त्यांच्याकडे कोणाही कर्त्या पुरुषाचे लक्ष गेले नव्हते. पेशवाईत तर त्यांचे हाल कुत्रा सुद्धा खात नव्हता. अस्पृश्य समाजातील व्यक्तीला सकाळी किंवा संध्याकाळी घराबाहेर पडण्यास बंदी असे कारण सकाळी किंवा संध्याकाळी माणसाची सावली लांबवर पडत असते. अशी सावली ब्राह्मणांच्या अंगावर पडली तर ते विटाळ मानीत म्हणून त्यांना फक्त भर दुपारीच घराच्या बाहेर जाण्यास परवानगी असे. कारण सूर्य मध्यानीला आला म्हणजे माणसाची सावली त्याचे पाया-खालीच पडते. दुपारी सुद्धा अस्पृश्य माणूस रस्त्याने चालला तर त्याला आपल्या कंबरे भोवती रस्त्यापर्यंत लांब अशी झाडाची फांदी लावून चालावे लागत असे. कारण त्यांच्या पाऊलामुळे विटाळलेला रस्ता त्या फांदीचा उपयोग झाडून काढण्याकडे होत असे. अस्पृश्यांना सोन्या-चांदीचे दागिने वापरता येत नसत. त्यांना रेशमीवस्त्र वापरायला परवानगी नसे. अस्पृश्यांच्या लग्नात घोडयावरून त्यांना वरात काढता येत नसे. ही सारी दयनीय परिस्थिती पाहून म. फुल्यांनी अस्पृश्यांचेसाठी पहिली शाळा काढली. अस्पृश्यांना आपल्या पाण्याच्या हौदावर पाणी भरणेस परवानगी दिली त्यामुळे परिस्थितीत हळू हळू बदल होऊ लागला. म. फुल्यांची ही दूर दृष्टी, अस्पृश्यांच्या बाबतीतील दूरदृष्टी महाराजांनी उचलली व आपल्या संस्थानात अस्पृश्यांच्या साठी स्वतंत्र शाळा काढल्या व अस्पृश्य विद्यार्थ्यांचेसाठी तीन स्वतंत्र वसतिगृहे काढली. प्राथमिक शिक्षण महाराजांनी सक्तीचं आणि मोफत केल्यानंतर अस्पृश्यांच्यासाठी स्वतंत्र काढलेल्या शाळा त्यांनी बंद केल्या व अस्पृश्य मुलांना सरकारी शाळेत इतर

स्पृश्य मुलाप्रमाणेच प्रवेश देण्यासंबंधी जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यात या मुलांना शिकविण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पंक्तिप्रपंच किंवा भेदभाव शिक्षकांनी करू नये अशी त्यांना सक्त ताकीद दिली. त्यामुळें हरिजनांची मुले या शाळांतून बिनबोभाट जाऊ लागली.

अस्पृश्य समाजात काही गुन्हेगार जाती आहेत. मांग गारुडी ही त्यापैकीच एक महत्त्वाची जमात. या जातीतील सर्व लोकांना आपल्या गावी पाटलाकडे सक्तीने हजेरी द्यावी लागत असे. महाराजांनी ही हजेरीची पद्धत काढून टाकली. अस्पृश्यता निवारणेच्या बाबतीत महाराजांनी चार महत्त्वाचे वटहुकूम काढलें. पहिल्या वटहुकूमाने सरकारी नोकरीत ज्या अस्पृश्यांना घेतलें जात असे त्या ऑफिसमधील अधिकाऱ्यांनी व इतर नोकरांनी त्यांना समतेची, ममतेची व माणुसकीची वागणूक दिली पाहिजे अशी सक्त ताकीद दिली. अशी वागणूक जे अधिकारी देणार नाहीत त्यांनी एक तर राजिनामा द्यावा किंवा त्यांना नोकरीतून मुक्त केलं जाईल. त्या मुळे सर्व स्पृश नोकर-वर्गांना एक प्रकारची दहशत बसली व अस्पृश्य नोकरांशी ते मिळून मिसळून वागू लागले. दुसऱ्या वटहुकूमान्वये सरकारी शाळा किंवा सरकारी मदत मिळत असलेल्या खाजगी दुय्यम शाळा यातील चालकांनी हरिजनांच्या मुलांना त्या शाळेमध्ये मोफत प्रवेश द्यावा व त्या मुलांशी प्रेमळपणाने वागावे. असे जे चालक करणार नाहीत त्यांची सर्व प्रकारची इमारतीच्यारूपाने, अनुदानाच्यारूपाने, ग्राऊंडच्यारूपाने वगैरे प्रकारची सरकारी मदत बंद केली जाईल. सरकारी शाळेतील शिक्षकांनी जर या प्रमाणे वागणूक केली नाही तर त्यांनी एक तर राजिनामा द्यावा. अगर त्यांना नोकरीतून मुक्त करणेत येईल. कोल्हापूर संस्थानात असलेल्या सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांना उद्देशून महाराजांनी

तिसरा एक वटहुकूम काढला. स्पृश्य रोग्यांना ज्या प्रमाणे डॉक्टर तपासतात, औषध देतात व त्यांची सेवाशुश्रुषा करतात त्याचप्रमाणे अस्पृश्य रोग्यांच्या बाबतीतही तशीच काळजी घेतली पाहिजे अशी सक्त आज्ञा दिली. पूर्वी अस्पृश्य रोगी डॉक्टरांचेकडे गेल्यानंतर त्याला दुरूनच डॉक्टरांशी बोलता येई. डॉक्टरांनी त्याला विचारायचं की तुला काय होतंय म्हणून आणि रोग्यांनी आपल्याला ताप आला आहे, पोटात दुखते आहे, डोकं दुखतं आहे अशा प्रकारचे उत्तर द्यायचे. रोग्याने डॉक्टर देतील ते औषध घ्यायचे. नशिबाने तो बरा झाला तर ठीक, नाही तर मेला तरी त्याची कोणी पर्वा करीत नसत. त्या वेळची परिस्थिती अशी होती की डॉक्टराचा थर्मामीटर अस्पृश्य रोग्याच्या काखेत कधी गेला नाही, डॉक्टराचा स्टेथास्कोप अस्पृश्य रोग्याच्या छातीला कधी लागला नाही आणि डॉक्टराचा हात अस्पृश्य रोग्याच्या नाडीवर कधी पडला नाही म्हणून महाराजांनी सरकारी दवाखान्यातील डॉक्टर्स, परिचारक, परिचारिका (नर्स), ड्रेसर यांना उद्देशून एक वटहुकूम काढला की हरिजनांच्या बाबतीत इतर स्पृश्य रोग्यांप्रमाणेच त्यांना तपासलं पाहिजे आणि औषध उपचार केले पाहिजेत. असे करण्यामध्ये डॉक्टर प्रभृती मंडळींनी जर अनमान केला तर त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा अगर तसे केले नाही तर त्यांना नोकरीतून कमी करण्यांत येईल. त्या नंतर महाराजांनी चौथा वटहुकूम काढून सार्वजनिक विहिरी, तळी, नदीचे पाणवठे, विश्रांतिगृहे वगैरे अस्पृश्यांना खुली केली. या ठिकाणी जी कोणी व्यक्ती अस्पृश्यता पाळील त्याला कडक शासन केले जाईल अशा प्रकारचा इषाराही देण्यास महाराज चुकले नाहीत. महाराजांनी काढलेले हे चार वटहुकूम म्हणजे अस्पृश्यतेविरुद्ध, सामाजिक विषमतेविरुद्ध, वर्णवर्चस्वाविरुद्ध चढविलेले चौफेर हल्ले होते. महाराजांनी अस्पृश्यता निवारण्याच्या सद्हेतूने हे जे चार जाहीरनामे काढले त्या बाबतीत मिरजेचे

सुप्रसिद्ध मिशनरी डॉक्टर वालनेस यांनी आपल्या आत्मचरित्रामध्ये हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये अस्पृश्यता निवारणेसाठी अशा प्रकारचे जाहीरनामे काढून त्याची अंमलबजावणी करणारा हा पहिलाच राजा होता. असे महाराजांचे संबंधी गौरवपूर्ण उद्‌गार काढलेले आहेत. हिंदुस्थानातील इतर संस्थानिकांनी किंवा खुद्द ब्रिटिश सरकारने सुद्धा कायद्याने अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न कधी केला नव्हता. या पार्श्वभूमीवर महाराजांनी केलेले कार्य अभूतपूर्व होते याची साक्ष पटणारी आहे.

अस्पृश्य हा शब्द असा आहे की तो शब्द उच्चारणाऱ्याला व ऐकणाऱ्याला घृणा वाटावी म्हणून म. गांधीनी १९३४ नंतर अस्पृश्य या शब्दाऐवजी ' हरिजन ' हा शब्द अस्तित्वात आणला व त्या नावाचे एक साप्ताहिकही काढले. हरिजन म्हणजे हरीचे जन शब्द बोलायला सोपा, दिसायला सात्त्विक आणि शब्दाबद्दल घृणा तर मुळीच वाटत नाही. भिन्न भिन्न काळात झालेल्या दोन थोर व्यक्तींचे विचार नकळत कसे समान असतात हे दर्शविण्याच्या दृष्टीने महाराजांनीही अशाच सोज्वळ शब्दांची योजना केली होती. महाराजांनी १९१७ साली एक गॅझेट काढून कोल्हापूर संस्थानात रहाणाऱ्या अस्पृश्य समाजातील मंडळीनी या पुढे आपल्याला अस्पृश्य म्हणून न घेता ' सूर्यवंशी ' म्हणून आपले नाव लावावे अशा प्रकारची आज्ञा प्रसिद्ध केली. म. गांधींचा हरिजन हा आणि शाहू महाराजांचा सूर्यवंशी शब्द हे अस्पृश्य शब्दासंबंधी या दोन थोर व्यक्तींच्या मनात कशी घृणा निर्माण झालेली होती व त्यांचे विचारामध्ये कसे साम्य होते हे दाखविण्यासाठी मुद्दाम मी ही गोष्ट आपल्याला सांगितलेली आहे.

महाराजांनी अस्पृश्यांना स्पृश्य हिंदूच्या बरोबर स्थान मिळावे, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढावी या दृष्टीने बहुमोल कार्य केले

आहे. महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट करण्याची योजना मनाशी आखण्यापूर्वी बहुजन समाजातील लोकांना ते काम करता यावे म्हणून तलाठी निर्माण करण्याची योजना आखली. त्यासाठी स्वतंत्र शाळा काढली. या शाळेत अस्पृश्य विद्यार्थ्यांना खास शिष्यवृत्त्या देऊन त्यांचा शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर त्यांच्या तलाठी म्हणून नेमणूका केल्या. पूर्वी अस्पृश्य समाजातील ज्या व्यक्तींना चावडीच्या बाहेरच थांबावे लागे ती व्यक्ती गावच्या चावडीमध्ये पाटलांच्या मांडीला मांडी लावून पूर्वी ज्या ठिकाणी कुलकर्णी बसत होता त्या ठिकाणी मानाने बसू लागली. काही शिकल्या सवरलेल्या अस्पृश्य लोकांना महाराजांनी वकिलीच्या सनदा दिल्या. त्यामुळे ही मंडळी ब्राह्मण वकिलांचे बरोबरीने कोर्टात कामे चालवू लागली आणि बाररुममध्ये ब्राह्मण वकिलांच्या समवेत तक्याला तक्या लावून मानाने बसू लागली. मात्र अशा सनदा देताना महाराजांनी गुणवत्तेवर भर दिला होता व या सनदी वकिलांना सनद देण्यापूर्वी कायद्याचे यथोचित ज्ञान मिळावे याचीही योजना आखली होती. अशिक्षित अस्पृश्यांना खाजगीकडे अगर दरबारकडे चाकरमान्यांच्या, हुल–स्वारांच्या, कोचमनच्या, हत्तीवरील माहुतांच्या, मोटारीवरील ड्रायव्हर-क्लिनर या जागेवर व पोलीस म्हणून त्यांच्या नेमणुका केल्या होत्या. दरबार भरेल त्यावेळी मानकऱ्यांचा पोषाख घालून व कमरेला म्यानासह तलवारी लटकावून ही मंडळी स्पृश्य समाजात मन मोकळेपणाने वावरत असत.

डॉ. आंबेडकरांनी "Who were the Shudras!" या नावाचा एक इंग्रजी ग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथामध्ये त्यांनी शूद्र हे पूर्वाश्रमीचे क्षत्रिय होते. असा संशोधनात्मक निष्कर्ष काढला आहे. महाराजांनी अस्पृश्य नोकरांना मानकऱ्याचा पोषाख देऊन आणि त्यांच्या कमरेला म्यानासह लटकत्या तलवारी देऊन एक

प्रकारे ते क्षत्रिय असल्याचे डॉ. आंबेडकरांनी लिहिण्यापूर्वीच मान्य केले होते.

गंगाराम कांबळे या नावाच्या महार समाजातील एका व्यक्तीला महाराजांनी कोल्हापूर शहराच्या मध्यवस्तीत एक हॉटेल काढून दिले. महाराज नित्यनेमाने या हॉटेलला भेट देत असत. गंगाराम कांबळे याच्या हातचा चहा मागवून पीत असत. आपल्या रथात बसलेल्या १०-१५ माणसांना त्यांना आवडो अगर न आवडो महाराजांनी चहा घेतल्यामुळे त्यांना गंगाराम कांबळे यांच्या हातचा चहा पिणेच भाग पडे. या वेळी रस्त्यावर तोबा गर्दी जमत असे. खुद्द महाराजच महाराच्या हॉटेल मधील चहा पीत असलेले दृष्य पाहून स्पृश्य समाजातील कडव्या लोकांच्या भावनासुद्धा हळू-हळू बोथट होऊ लागल्या. गंगाराम कांबळे यास महाराजांनी काढून दिलेले हे हॉटेल म्हणजे सबंध हिंदुस्थानातील अस्पृश्य समाजातील व्यक्तीने चालविलेले हे पहिलेच हॉटेल होते. याची सामाजिक क्रांतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करावी लागेल.

कोल्हापूर संस्थानात अगर संस्थानाबाहेर निरनिराळ्या सभा संमेलनांसाठी वा परिषदांसाठी महाराज जात असत. त्यावेळी जाहीररीत्या ते अस्पृश्यांच्या हातचे पाणी अगर चहा सुद्धा मागवून घेत असत. त्यामुळे स्पृश्यसमाजच काय तर अस्पृश्य समाज सुद्धा चकीत होत असे.

महाराजांनी प्राचीन काला पासून चालत आलेली आलुता बलुत्याची पद्धती बंद केली व कुलकर्णी आणि महार वतने नष्ट केली. त्या मुळे एक प्रकारच्या गुलामगिरीच्या गर्तेतून या समाजाला वर काढले. ते स्वतंत्रपणाने आपले व्यवसाय करण्यास

मोकळे झाले. कोणाला काय द्यायचे असेल अगर घ्यायचे असेल ते नक्त रकमेतच द्यावे किंवा घ्यावे लागे.

कुलकर्णी व महार वतने महाराजांनी नष्ट केली तरी ही दोन्ही वतने नष्ट करण्यामध्ये महाराजांचे भिन्न दृष्टिकोन होते. कुलकर्णी वतन हे स्वामित्त्वाशी निगडीत होते तर महार वतन हे गुलामगिरीशी निगडीत होते. कुलकर्णी व पाटील ही वतने बहामनी कालापासून चालत आलेली होती. पाटील हा गावचा प्रमुख, त्याचं पहिलं स्थान आणि कुलकर्णी त्याच्या हाताखाली काम करीत असे. परंतू कालाच्या ओघात पाटील अडाणी राहिला आणि कुलकर्णी शिकला-सवरला असल्याकारणाने गावच्या सगळ्या व्यवहारांची इत्यंभूत माहिती फक्त त्यालाच असे. हळू हळू कुळकर्णी यांनी पहिलं स्थान पटकावलं आणि पाटलाला दुय्यम स्थानावर समाधान मानून घ्यावं लागलं. कुलकर्णीपणा बद्दल कुलकर्णी यांना सरकारातून वतनी जमीन दिलेली असे. परंतू कुलकर्णी हा गावातल्या सगळ्यात शहाणा व धूर्त माणूस असल्याने व गावातील सावकारही तोच असल्याने सावकारीचे पोटी, लांडयालबाडीचे पोटी गोरगरिबांच्या जमिनी व नष्टांशाच्या जमिनी आपल्या नावावर चढवून तो गब्बर झाला होता. पेशवाई मध्ये कुलकर्ण्याला भलतेच महत्त्व प्राप्त झाले होते. शाहू महाराजांचे वेळी कोल्हापूर संस्थानातले कुलकर्णी तर एवढे शेफारून गेले होते की महाराजांच्या सार्वभौमत्त्वाला आव्हान देण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली होती. ही गोष्ट लक्षात घेऊन महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट केली, म्हणजे त्यांच्या जमिनी काढून घेतल्या असा एक जाणूनबुजून पसरविलेला प्रवाद आहे. परंतू वस्तुस्थिती अशी होती की कुलकर्ण्यांच्या वतनी जमिनी या रयतावा केल्या; त्या जमिनी त्यांचेकडेच राहू दिल्या. परंतू लांडी-लबाडीने कुलकर्ण्यांनी ज्या जमिनी गिळंकृत केल्या होत्या

त्या बद्दल चौकशी कमिशन नेमून अशा जमिनी दरबारने आपल्या ताब्यात घेतल्या तसेच ज्यांच्या फसवून जमिनी बळकावल्या होत्या त्या मूळ मालकांना परत केल्या. आणि कुलकर्ण्यांच्या ठिकाणी बहुजन समाजातील व अस्पृश्य समाजातील नवशिक्षित पिढी तयार झाली होती त्यांच्या तलाठी म्हणून नेमणुका केल्या.

महार वतनाच्या बाबतीत मी वर म्हटल्याप्रमाणे हे वतन गुलामगिरीशी निगडीत होते. या वतनी जमिनींची विभागणी भाऊबंदामध्ये इतकी झाली होती की वर्षाच्या अखेरीला पीक हाती आल्यानंतर त्याच्या ज्या वाटण्या होत त्या इतक्या लहान असत की पायली, अर्धपायली पर्यंत वर्षाची मिळकत असे. पण या महार वतनदारांना जमिनीचा मोह सुटत नसे. आणि या वतनासाठी समस्त महारांना आळीपाळीने कोतवाल, तराळ, पहारेकरी वगैरे गावकीची कामे उपाशी, अर्धपोटी करावी लागत असत. कधी कधी घरात मुलंबाळ आजारी असतानासुद्धा कोणत्याही प्रकारची दया माया न दाखविता त्याला परगावी धाडले जात असे. आणि जनावराप्रमाणे त्याला राबवून घेतले जात असे, ही त्यांची शोचनीय अवस्था पाहून या समाजाला गुलामगिरीतून सोडवायचे झाले तर ह्यांची महार वतने नष्ट केल्याशिवाय गत्यंतर नाही. या निर्णयाप्रत महाराज आले. अशा रीतीने महाराजांनी १९१९ साली एक वटहुकूम काढून ही वतने नष्ट केली म्हणजे रयतावा केली आणि गावकीच्या कामासाठी पगारदार नोकर नेमले. बाकीच्या महारांना आपल्या इच्छेप्रमाणे कोणतेही काम करणेस सर्वांनाच परवानगी दिली.

डॉ. आंबेडकर अस्पृश्य समाजाचे पुढारी म्हणून प्रसिद्धीला आल्यानंतर मुंबईच्या लेजिसलेटीव्ह कौन्सिलमध्ये कधी सरकारनियुक्त तर कधी लोकनियुक्त म्हणून त्यांनी काम केले. १९२८ साला पासून १९४० सालापर्यंत मुंबई विधान परिषदेमध्ये

डॉ. आंबेडकरांनी महार वतने नष्ट करावीत म्हणून तीन वेळा ठराव व खाजगी बिले मांडण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांची बिले फेटाळली गेली व ती यशस्वी होऊ शकली नाहीत. मात्र अस्पृश्यांच्या सभा, संमेलने व परिषदा भरत असत त्या वेळी महार वतने नष्ट करण्यासंबंधीचे ठराव एक मताने मंजूर होत असत. ते ठराव विचारार्थ सरकारकडे पाठविले जात असत. शेवटी १९५८ साली ज्यांच्या नावाने ही व्याख्यानमाला तुम्ही सुरू केलेली आहे ते मा. यशवंतरावजी चव्हाण हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी महार वतने नष्ट करण्यासंबंधीचे बिल मुंबईच्या कायदे मंडळात मांडून ते मंजूर करून घेतले. यशवंतरावांनी हे बिल मांडू नये, त्या मुळे सरकारी तिजोरीवर फार मोठा ताण पडणार आहे म्हणून नोकरशाहीने व प्रतिगामी लोकांनी हे बिल मांडण्यापासून यशवंतरावांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतू यशवंतराव हे खंबीर, पुरोगामीवृत्तीचे व अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट व्हावी या मताचे असल्याने सरकारी तिजोरीवर कितीही ताण पडला तरी बेहत्तर पण ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आपण हे बिल मांडणारच अशी आग्रही भूमिका घेऊन ते बिल मंजूरही करून घेतले. पण हे पहायला दुर्दैवाने डॉ. आंबेडकर जीवंत नव्हते. कारण १९५६ सालीच ते दिवंगत झाले होते.

मुंबई राज्याने कुलकर्णी वतने, परगणा वतने, महार वतने वगैरे स्वरूपाची वतने नष्ट करण्याचा प्रयत्न १९५४ ते १९६० या कालात केला. ती वतने राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात १९१८-१९ सालच्या सुमारास नष्ट केली होती. या वरून हा राजा दूरदृष्टीचा कसा होता याची प्रचीती आल्यावरून रहात नाही.

दुसऱ्या महायुद्धानंतर १९१८ साली हिंदुस्थानला स्वराज्याचे काही

हक्क द्यावेत म्हणून पार्लमेंटमध्ये ब्रिटिश सरकारने घोषणा केली. त्या वेळी माँटचेग्यू हे भारत मंत्री होते. व चेम्सफर्ड हे हिंदुस्थानचे व्हॉयसरॉय होते. राजकीय सुधारणांचा हप्ता आपल्याही पदरात पडावा या दृष्टीने महाराजांनी सबंध हिंदुस्थानात दौरा केला. या बाबत महाराजांची स्वतःची अशी ठाम भूमिका होती की वयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा हक्क मिळावा म्हणजे त्याला आपल्या इच्छेप्रमाणे आपला प्रतिनिधी निवडता येईल. परंतू मतदानाचा हक्क हा एखादी व्यक्ती शेतसारा किती भरते किंवा इन्कमटॅक्स किती भरते यावरूनच अवलंबून ठेवावयाचा असेल तर गोर-गरिबांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क रहाणार नाही. म्हणून हिंदुसमाज हा भिन्न भिन्न जाती मध्ये विभागला असल्याकारणाने व आर्थिकदृष्टया उच्चवर्णीय लोक सधन असल्याने अल्पसंख्य असूनही त्यांचेच प्रतिनिधी निवडून येतील म्हणून महाराजांनी ठिकठिकाणी परिषदा घेऊन हिंदुस्थानातील भिन्न भिन्न जातींना जातवार प्रतिनिधीत्त्व मिळावे म्हणून जारीने प्रयत्न चालविले होते. माँटचेग्यूचा दौरा हिंदुस्थानात चालू असता निरनिराळ्या लोकांच्या नव्या सुधारणाचं स्वरूप कसं असावं या बाबतीत गाठीभेटी, साक्षी घेण्याचे काम चालू होते. महाराजांनी आपल्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीसाठी माँटचेग्यू यांची दिल्ली व मुंबई येथे दोन वेळा भेट घेतली. सुरवातीला माँटचेग्यू चेम्सफर्ड सुधारणेचा जो आराखडा प्रसिद्ध झालेला होता त्यात महाराजांचे मागणीला ब्रिटिश सरकारने वाटाण्याच्या अक्षता लावल्या होत्या. परंतू त्या नंतर काही प्रमांणात महाराजांचे म्हणणे मान्य करून अस्पृश्यांना प्रांतिक व मध्यवर्ती कायदे मंडळात स्वतंत्र प्रतिनिधीत्त्व दिले आणि मुंबई प्रांतातील कायदेमंडळात मराठा आणि तत्सम जातींसाठी सात जागा राखीव ठेवल्या या मुळे महाराजांच्या प्रयत्नाला काही प्रमाणात का होईना यश आले. जी गोष्ट महाराजांनी

ब्रिटिशांच्याकडे मागितली होती त्याच गोष्टीची कोल्हापूर नगरपालिकेत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने निरनिराळे मतदार संघ निर्माण केले. त्यामध्ये अस्पृश्यातील निरनिराळ्या पोट जातींना प्रतिनिधीत्त्व मिळावे असे त्यांचे गट केले त्यामुळे निरनिराळ्या जाती जमातींना नगरपालिकेमध्ये प्रतिनिधीत्त्व मिळाले. एवढेच नव्हे तर म्यु. पल. कौन्सिलचा चेअरमन म्हणून दत्तोबा पोवार या नावाच्या चांभार गृहस्थांची महाराजांनी नियुक्ती केली स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सबंध महाराष्ट्रात एवढ्या उच्चपदावर अस्पृश्य समाजातून गेलेली दत्तोबा पोवार हीच पहिली व्यक्ती होती.

माँटचेग्यू चेम्सफर्ड सुधारणाप्रमाणे मुंबईच्या कौन्सिलमध्ये ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप या महार समाजातील व्यक्तीची नेमणूक व्हावी म्हणून महाराजांनी खास प्रयत्न केले होते. आणि त्यात त्यांना यशही मिळाले होते. मुंबई कौन्सिलातील ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप हाच अस्पृश्यांचा पहिला प्रतिनिधी होय !

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाची डॉक्टर ही पदवी घेऊन हिंदुस्थानात आले. महार समाजातील एक ऐन पंचविशीतील तरुण डॉक्टर होऊन आलेला आहे. हे पाहून महाराजांना आनंद आणि अभिमान वाटला. डॉ. आंबेडकर त्यावेळी मुंबई येथे परळला बदक चाळीतील एका खोलीत रहात होते. महाराज जातीनिशी डॉ. आंबेडकरांचा शोध करीत त्या ठिकाणी गेले. महाराजांचा देह एवढा धिप्पाड होता की डॉ. आंबेडकरांच्या खोलीच्या अरुंद दारातून सरळ प्रवेश करणे त्यांना शक्य नव्हते. म्हणून त्यांनी आडवे होऊन प्रवेश केला. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज आपणहून आपल्या घरी आले हे पाहून डॉ. आंबेडकर स्तिमित झाले. त्यांना महा-

राजांचे स्वागत कसं करावं हे समजनासे झाले. महाराजांनी डॉ. आंबेडकरांना आपादमस्तक न्याहळून पाहिले. त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मारली. आणि अस्पृश्यांना डॉक्टरांच्या रूपाने त्याच्यातील खरा पुढारी मिळाला याबद्दल समाधान व्यक्त केले. महाराज डॉ. आंबेडकरांना आपल्या रथात घेऊन खेतवाडी येथील आपल्या पन्हाळा लॉजमध्ये घेऊन गेले. त्यानंतर वेळोवेळी मुंबईच्या मुक्कामात डॉ. आंबेडकरांशी ते अस्पृश्यता निवारण्याच्या संबंधाने चर्चा करीत असत. अस्पृश्यांच्यामध्ये स्वत्त्व, स्वाभिमान व जागृती करण्याच्या दृष्टीने एखाद्या वर्तमानपत्राची जरूरी आहे ही गोष्ट डॉ. आंबेडकरांनी महाराजांच्या नजरेस आणून दिली. परंतू पैशाच्या अभावामुळे ही गोष्ट आपल्यास करता येणार नाही. म्हणून त्यांनी महाराजांच्याकडे आर्थिक सहाय्याची मागणी केली. महाराजांनी आंबेडकरांची ही अडचण जाणून त्यांना २५००।– रुपये दिले. या रकमेतून डॉ. आंबेडकरांनी 'मूकनायक' या नावाचं साप्ताहिक काढलं. या साप्ताहिकाची जाहिरात लो. टिळकांच्या केसरीमध्ये प्रसिद्ध करण्यासाठी डॉ. आंबेडरांनी दिली होती. परंतू अस्पृश्याने काढलेल्या वर्तमानपत्राचा जाहिरातीने सुद्धा आपल्या लोकमान्य वर्तमानपत्राला विटाळ होऊ नये म्हणून केसरीने ती जाहिरात प्रसिद्ध करण्याचे नाकारले.

या नंतर महाराजांचे व डॉ. आंबेडकरांचे संबंध दृढ व जिव्हाळ्याचे होऊ लागले. अस्पृश्यता निवारणावर त्यांच्या चर्चा होऊ लागल्या. या तरुणाला लोकांसमोर आणण्याच्या दृष्टीने महाराजांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. कोल्हापूर येथे महाराष्ट्रातील अस्पृश्यांची परिषद घेण्याचे ठरवून महाराजांनी डॉ. आंबेडकरांना अध्यक्षपद देऊ केले. २१ मार्च १९२० साली हातकणंगले तालुक्यातील माणगाव या गावी ही परिषद झाली. महाराज या परिषदेला जातिनिशी हजर राहिले. आपल्या डोक्यावरचा जरीचा पटका

डॉ. आंबेडकरांच्या डोक्यावर घातला आणि जमलेल्या अस्पृश्य, शूद्र समुदायासमोर उत्स्फूर्तपणे भाषण केले. डॉ. आंबेडकर हे तुमचे खरेखुरे नेते आहेत, त्यांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता, पांडित्य, कर्तृत्व व सेवावृत्ती या गोष्टी विचारात घेता ते नुसत्या अस्पृश्यांचेच नव्हे तर सबंध हिंदुस्थानचे नेते भविष्यकालात झाल्याशिवाय रहाणार नाही. महाराजांची ही भविष्यवाणी स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. आंबेडकरांनी भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून त्यांचा गौरव झाल्याने खरी ठरली आहे.

डॉ. आंबेडकरांना या सभेचा मिळालेला अध्यक्षपदाचा मान म्हणजे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा झालेला तो प्रारंभ होता. अस्पृश्य जमातीतील एका तरुणाची गुणवत्ता विचारात घेऊन त्याला पुढे आणण्याचे श्रेय छ. शाहू महाराजांना आहे.

माणगावची परिषद संपल्यानंतर महाराजांनी डॉ. आंबेडकर व परिषदेचे प्रतिनिधी यांना राजवाड्यावर भोजनाचे आमंत्रण दिले. आपल्या पंक्तीला अस्पृश्य समाजातील महारापासून भंग्यापर्यंत सगळ्यांना घेऊन त्यांनी जेवण केले. डॉ. आंबेडकर व त्यांच्या बरोबरीची मंडळीही त्या दिवशी सरकारी पाहुणे होती. डॉ. आंबेडकरांना त्या दिवशी महाराजांनी आपल्या रथात घेऊन कोल्हापूर शहरातून फिरविले. अशा रीतीने अस्पृश्यतेचा नायनाट करण्याच्या दृष्टीने महाराजांनी आपली पावले उचलली.

सार्वजनिक जीवनात अशा रीतीने डॉ. आंबेडकरांनी प्रवेश केला असला तरी बॅरिस्टरचा कोर्स बडोदा सरकारची स्कॉलरशिप बंद झाल्यामुळे इंग्लंडहून त्यांना मध्येच यावे लागले होते. तेव्हा तो कोर्स पुरा करावा, वकिलीचा स्वतंत्र व्यवसाय करून चरितार्थ चालवावा आणि सामाजिक चळवळीत पडावे असा त्यांचा मानस होता. महाराजांना त्यांनी बॅरिस्टर व्हावे ही कल्पना अतिशय

आवडली व त्यासाठी जरूर ते आर्थिक सहाय्य डॉ. आंबेडकरांना देऊन त्यांनी त्यांना इंग्लंडला पाठविले. एवढेच नव्हे तर डॉ. आंबेडकरांच्या गैरहजेरीत त्यांच्या कुटुंबियांची आर्थिक कुचंबणा होऊ नये म्हणून डॉ. आंबेडकरांच्या पत्नी कै. रमाबाई यांनाही महाराजांनी आर्थिक मदत केली.

महाराजांच्या बद्दल डॉ. आंबेडकरांना कमालीचा आदर व जिव्हाळा वाटत होता. महाराजांनी सामाजिक समता निर्माण करण्यासाठी बहुजन समाजाच्या चळवळीचे नेतृत्व केलेलं होतं. त्या बद्दल डॉक्टर आंबेडकरांनी इंग्लंडहून पाठविलेल्या एका पत्रामध्ये महाराजांचा गौरव करताना 'सामाजिक लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या चळवळीचे आपण आधारस्तंभ आहात' अशा आशयाचे उद्‌गार काढलेले आहेत. ते मूळ वाक्य असे :-

" I hope your Highness is enjoying good health. We need you ever so much for you are the Piller of that great movement towards Social democracy which is making its headway in India. "

महारष्ट्र शासनातर्फे लवकरच मी अध्यक्ष असलेल्या संपादक मंडळाच्यावतीने छ. शाहू महाराजांच्या जीवनातील विविध पैलूंवर एक इंग्रजी ग्रंथ प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. या ग्रंथाला काय नाव द्यावे असा प्रश्न आमच्यापुढे उभा होता परंतू शाहू महाराजांच्या चरित्राच्या साधनांचा अभ्यास करीत असता योगायोगाने डॉ. आंबेडकरांचे हे पत्र उपलब्ध झाल्याने आम्ही त्यातील शब्द योजनेचा वापर करून या इंग्रजी पुस्तकाला ' Rajarshi Shahu the Piller of Social Deomocracy. ' असे

नाव द्यायचे ठरविले आहे. ते पुस्तक लवकरच प्रकाशित होईल.

१९२० साली नागपूर येथे व १९२२ साली दिल्ली येथे छ. शाहू महाराजांचे अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्यांच्या दोन प्रचंड परिषदा झाल्या या दोन्ही वेळेला धेडोंका राजा अशी महाराजांची निर्भत्सना करणारी पत्रके वाटली होती. नागपूरच्या परिषदेच्यावेळी तर महाराजांचे आप्त नागपूरचे लक्ष्मणराव भोसले हे अस्पृश्य अनुयायांसह येणाऱ्या महाराजांचे स्वागत करण्यापेक्षा आपण दूर गेलेलेच बरे म्हणून ते शिकारीस निघून गेलें व महाराजांना एका ख्रिश्चन मिशनऱ्याचे बंगल्यात उतरावे लागले. महाराजांनी या दोन्ही परिषदांमध्ये जी भाषणे केली त्या मुळे अस्पृश्य समाजामध्ये नवा जोम, नवा उत्साह, नवी अस्मिता निर्माण झाली. आणि ते महाराजांच्याकडे आपला उद्धारकर्ता या नात्याने पाहू लागले.

महाराजांचा मूळचा पिंड हा मानवतावादी होता. हिंदूसमाज हा जातिभेदानी, वर्णवर्चस्वानी व सामाजिक विषमतेने पोखरलेला आहे. तेव्हा सामाजिक समता निर्माण होणे हे हिंदुसमाजाच्या दृष्टीने व एकूण राष्ट्राच्या दृष्टीने आवश्यक होते. महाराजांनी जातिभेदाचा नायनाट करण्याच्या दृष्टीने कोणी कुठल्याही जातीत जन्माला आलेला असला तरी मनुष्य तेवढा एक हा विचार मनांत आणून अस्पृश्यतेविरुद्ध व ब्राह्मण्याविरुद्ध कडाडून हल्ले केले. माझ्या पेक्षा उच्च कोणी नाही व माझ्या पेक्षा हलकाही कोणी नाही ही उदात्त भूमिका घेऊन महाराज काम करीत होते. परंतू ही भूमिका ज्यांची समाजात मक्तेदारी होती, ज्यांच्या हातात वृत्तपत्रे होती अशा ब्राह्मण समाजाला रूचली नाही. म्हणून स्वतःला राष्ट्रीय म्हणविणारे मोठ मोठे पुढारी, देशभक्त व

क्रांतिकारक यांनी महाराजांची ही भूमिका समजावून घेण्याचा यत्किंचितही प्रयत्न न करता किंवा समजली असली तरी तिचा विपर्यास करून महाराजांच्यावर विषारी, जहरी आणि विघातक टीका करण्यासाठी आपली लेखणी व वाणी झिजवली.

महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी ज्या कालखंडात बहुविध चळवळी केल्या त्याच कालखंडात आणखी एका थोर पुरुषाचे नाव आपल्याला घेतले पाहिजे. ते म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे. त्यांचा पिंड मूळचा धार्मिक व सत्त्वशील होता. ब्राह्मोसमाजाचा त्यांच्या आचार विचारांवर फार परिणाम झाला होता. सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी म्हणून ब्राह्मोसमाजाने त्यांना इंग्लंडला पाठविले होते. न्या रानडे, डॉ. भांडारकर यांनी स्थापन केलेल्या प्रार्थना समाजामध्ये ते नियमितपणे भाग घेत असत. ते स्वतः पदवीधर होते. नोकरीच करायची असती तर त्यांना कुठेही चांगल्या पगाराची नोकरी सहज मिळू शकली असती. परंतु ते स्वतः आपल्या सर्व कुटुंबियांसह अस्पृश्यांची सेवा करण्यासाठी चंदनासारखे झिजले १९०६ साली त्यांनी 'डिप्रेसड् क्लास मिशन' या नावाची संस्था स्थापन केली. आणि महाराष्ट्रामध्ये अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शाळा व वसतिगृहे काढली त्यांच्यासाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. सुरुवातीला त्यांचे कार्य मुंबईला होते. त्यानंतर ते पुण्याला आले व पुण्याला त्यांनी 'अहिल्याश्रम' या संस्थेची स्थापना केली. या अहिल्याश्रमातर्फे चालविलेल्या प्राथ. शाळा, माध्य. शाळा व वसतिगृहे यांतून बरीच अस्पृश्य समाजातील मंडळी शिकून बाहेर पडली.

काँग्रेसची स्थापना १८८५ साली झाली होती. सुरुवातीला अतिश्रीमंत व अतिशिक्षित अशा उच्चवर्णीयांनाच काँग्रेसमध्ये स्थान होते.

१९०७-८ साली सुरतेला काँग्रेस अधिवेशन भरले. त्यावेळी लो. टिळकांनी जी आक्रमक भूमिका घेतली त्या वेळेपासून सुशिक्षित, उच्चवर्णीय व मध्यमवर्गीयांचा भरणा काँग्रेसमध्ये झाला. परंतू बहुजन समाज, शेतकरी, कामगार, हरिजन, स्त्रिया यांना काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये काही स्थान नव्हते. १८८५ साली पुण्यास काँग्रेसचे अधिवेशन भरले त्यावेळी म. फुल्यांनी एक शेतकऱ्याचा भव्य पुतळा काँग्रेसच्या अधिवेशनाच्या मंडपापुढे उभा करून शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्याकडे काँग्रेसचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. १९१६ सालपर्यंत काँग्रेसचे या वर्गाकडे लक्ष गेलेले नव्हते. परंतू डॉ. ॲनीबेझंट या १९१६ च्या कलकत्ता काँग्रेच्या अध्यक्षा झाल्यानंतर महर्षी वि. रा. शिंदे यांच्या प्रयत्नाने डॉ. ॲनीबेझंट यांनी हरिजना संबंधीचा ठराव मांडला. तो ठराव पासही झाला. ही महर्षी शिंदे यांची विशेष व बहुमोल कामगिरी होय.

सामाजिकदृष्टचा प्रतिगामी असलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात हरिजनांसंबंधी सहानुभूति दाखविण्याचा ठराव मंजूर करून घेणे ही हलकी-सलकी गोष्ट नव्हती. परंतू महर्षी शिंदे यांच्या प्रयत्नाने व डॉ. ॲनीबेझंट यांच्या सारख्या सगळी मानव जात ही परमेश्वराची लेकरे आहेत असे मानणाऱ्या थिऑसाफिस्ट बाईच्या पाठिंब्याने हा ठराव मंजूर झाला. १९२० नंतर म. गांधी हे भारताच्या राजकीय व्यासपीठावर काँग्रेसचे नेते म्हणून आले. आणि स्वराज्याची चतू:सूत्री म्हणून हरिजनोद्धार हा काँग्रेसच्या कार्यक्रमाचा एक प्रमुख भाग होऊन बसला.

छत्रपती शाहू महाराज सर्व आकाश दीप्तिमान करणारा एक विजेचा लोळ म्हटला तर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे नंदादीपाप्रमाणे किंवा समुद्रातील दीपस्तंभा प्रमाणे होते असे म्हणावयास

हरकत नाही. शांत व धीम्मेपणाने, सेवावृत्तीने त्यांनी स्वतःला सहकुटुंब सहपरिवार सार्वजनिक सेवेला वाहून घेतले. अध्यात्म शक्तीवर त्यांचा फार मोठा भर होता. इतिहास संशोधनाची त्यांना आवड होती. मराठ्यांच्या इतिहासावर त्यांनी अनेक लेख लिहले. 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ लिहून अस्पृश्यतेच्या उगमस्थानावर त्यांनी बोट ठेवले. अस्पृश्य मंडळी पूर्वाश्रमीची बुद्ध असली पाहिजेत हा एक नवीन शोध त्यांनी लावला. हाच धागा हाताशी धरून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य हे पूर्वाश्रमीचे बुद्धधर्मीय होते हे Who were the Shudras ! या आपल्या ग्रंथात साधार, सुस्पष्टपणे व विस्तारपूर्वक मांडले आहे. अस्पृश्य हे क्षत्रिय होते. ब्राह्मणांचं नेहमीचं कसब म्हणजे एखाद्याला हिंदु-धर्मातून दूर लोटायच झालं तर त्याला चौथ्यावर्णात टाकत. म्हणून अस्पृश्य हे क्षत्रिय असून त्यांना ब्राह्मणांनी शूद्र म्हणायला सुरवात केली. आणि त्यामुळे अस्पृश्य हे हिंदु समाजापासून दुरावले. गावच्या कुसवाबाहेरच त्यांना स्थान मिळे. आणि शहरा-मध्ये गलिच्छ वस्तीत त्यांच्यासाठी जागा ठेवली जात असे.

महर्षी शिंदे यांनी केलेल्या संशोधनामुळे मानववंशशास्त्र, समाज-शास्त्र व इतिहासशास्त्र या शास्त्रांमध्ये मौलिकभर पडलेली आहे. महर्षी शिंदे यांनी अनेक हाल अपेष्टा सोसत अस्पृश्यांची सेवा करण्यामध्ये आनंद मानला परंतू त्या मुळे ते स्पृश्यापासूनही दुरावले व ज्यांची सेवा करण्यामध्ये त्यांनी आपली ऐन उमेद घालविली त्यांनीही त्यांना शेवटी दोष दिला. म्हणून महर्षी शिंदे यांचे बद्दल असे म्हणता येईल की महर्षी शिंदे म्हणजे त्याग-मूर्तिमंत त्याग, महर्षी शिंदे म्हणजे सेवा- असीमसेवा, महर्षी शिंदे म्हणजे समर्पित जीवनाची उदात्त पण करूण कहाणी.

गेल्या १०० वर्षांत महाराष्ट्रामध्ये रखमाबाई प्रकरण,

वेदोक्त प्रकरण, क्रॉफर्डमार्केट प्रकरण, खान-पाणंदीकर विवाह प्रकरण आणि हार्वे नरीमन प्रकरण, वगैरे प्रकरणे गाजली परंतू बहुजन समाज व ब्राह्मण समाज हे एकमेकाच्या विरोधात प्रथमच कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणाच्या निमित्ताने उभे टाकले त्यामुळे या प्रकरणाला महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासात अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

वेद हे हिंदू समाजाचे धार्मिक ग्रंथ, परंतू विद्येची मक्तेदारी ब्राह्मण समाजाकडे आल्यामुळे पूर्वी वेदाध्ययनाचा अधिकार क्षत्रिय वैश्यांना होता. तो अधिकार ब्राह्मण समाजाने काढून घेतला. वेदाध्यायन करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण समाजाचा खास अधिकार म्हणून वापर होऊ लागला. बहुजन समाजाला वेदाध्ययन करणं अशक्य झालं.

क्षत्रिय, वैश्यांचे धार्मिक विधी हे पूर्वी वेदोक्त पद्धतीने होत असत. परंतू ब्राह्मणांनी मखलाषी करून नंदांतानि-क्षत्रियकुलानि नंदांच्या नंतर कलियुगात क्षत्रिय कोणी उरलेच नाहीत. ब्राह्मणाशिवाय सगळे शूद्र म्हणून त्यांना वेदोक्ताचा अधिकार नाही. तस पाहू गेल्यास नंदांच्या नंतर हिंदुस्थानात मौर्य, शातवाहन, शिलाहार, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव वगैरे क्षत्रिय घराणी होऊन गेली. त्यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रदेशावर शतकानुशतके राज्ये केली. परंतू ब्राह्मण समाज अशा क्षत्रियांनासुद्धा क्षत्रिय मानायला तयार नव्हता. उलटपक्षी कलीयुगात दोनच वर्ण आहेत. एक ब्राह्मण व दुसरा शूद्र असे म्हणून ब्राह्मणांनी क्षत्रियांना व वैश्यांना शूद्र वर्णात ढकलून दिले पण हा प्रश्न छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळेला धसाला लागला. हिंदवी स्वराज्याची संस्थापना करून हिंदूपदपादशहा म्हणून मोंगलांच्या बरोबरीचे आपले स्थान

आहे हे दर्शविण्यासाठी स्वत:ला राज्याभिषेक करून घेणेचे छ. शिवाजी महाराजांनी ठरविले. त्या वेळी महाराष्ट्रातील ब्राह्मण मंडळींनी शिवाजी महाराज हे क्षत्रिय नाहीत म्हणून वेदोक्त पद्धतीने त्यांचा राज्याभिषेक करण्याचे नाकारले. मुसलमानी हल्लयांपासून महाराजांनी ज्यांचे संरक्षण केले तीच मंडळी अशारीतीने महाराजांच्या विरोधात गेली. महाराजही चाणाक्ष आणि विचाराचे पक्के असल्यामुळे त्यांनी काशीहून गागाभट्टाला महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या नाकावर टिच्चून मुद्दाम पाचारण करून आणले व वेदोक्त पद्धतीने त्यांचेकडून स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. त्यावेळे पासून महाराष्ट्रातील ब्राह्मण मंडळींनी काहीसे नमते घेऊन छत्रपती घराण्याचे धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचे मान्य केले. व त्या प्रमाणे ते करू लागले. छ. संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराबाई साहेबांचा मुलगा शिवाजी व संभाजीचा मुलगा शाहू यांच्या मुंजी लग्ने व राज्याभिषेक समारंभ हे वेदोक्त पद्धतीनेच झाले. परंतू पेशव्यांच्या अमदानीत साताऱ्च्या शाहूच्या मृत्युनंतर पेशवे छत्रपतींना डोईजड होऊन बसले त्या वेळेपासून ब्राह्मणांचा दुरअभिमान पुन्हा बळावल्यामुळे छत्रपतींना शूद्र लेखण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला. साताऱ्च्या गादीवरील दुसरा शाहू यांची मुंज नाना फडणीसाच्या खास सूचनेवरून पुराणोक्त पद्धतीप्रमाणे करण्यांत आली. ती केल्याची बातमी नाना फडणीसाला कळताच छत्रपती हे शूद्र आहेत व त्यांना शूद्र लेखण्यात आपण यशस्वी झालो या बद्दल त्याला परमावधीचा आनंद झाला.

पेशवाई नष्ट झाल्यानंतर सुद्धा ब्राह्मणांचा छत्रपतींच्याकडे क्षत्रिय या नात्याने पाहण्याच्या दृष्टिकोनात काही फरक पडला नाही. साताऱ्च्या गादीवरील शेवटचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या काळीही ब्राह्मण समाजाने छत्रपती व मराठा समाज हे

क्षत्रिय नाहीत व त्यांची धर्म कृत्यें वेदोक्त पद्धतीने न करता पुराणोक्त पद्धतीनेच करावयाची असा निश्चय केला. तेव्हा मराठे हे क्षत्रिय आहेत की नाहीत याचा अखेरचा सोक्ष मोक्ष लावण्यासाठी प्रतापसिंह महाराजांनी १८३० साली अखिल भारतीय शास्त्री पंडितांची एक महासभा या वादग्रस्त मुद्याचा अखेर जाहीर निर्णय देण्यासाठी बोलावली. महाराष्ट्रातील व इतर प्रांतातील ब्रह्मवृंद फार मोठ्या प्रमाणांत सातार्‍याला जमला होता. प्रभू समाजातील आबा पारसनवीस यांच्या नेतृत्त्वाखालील मंडळींनी मराठे हे क्षत्रिय आहेत असा पूर्वपक्ष मांडला तर राघवाचार्य गजेंद्रगडकर यांच्या नेतृत्त्वाखाली काम करणार्‍या शास्त्री मंडळींनी मराठे हे क्षत्रिय नाहीत. असा उत्तरपक्ष मांडला. निवाडा जाहीर करताना कोणत्याही प्रकारचा दंगाधोपा होऊ नये म्हणून खुद्द प्रतापसिंह महाराज नंग्या तलवारी-निशी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पहारा करीत होते. अखेर मराठे हे क्षत्रिय आहेत असा पंचांचा निर्णय बाहेर आला. व त्यामुळे ब्राह्मणसमाजाची पुन्हा एकवार घोर निराशा झाली.

त्यानंतर १८९६ साली बडोद्याला सयाजीराव महाराजांचेवेळी पुन्हा एकवार हे वेदोक्त प्रकरण उद्‌भवले. शिवदत्त शर्मा या नावाचे जोधपूरचे वेदशास्त्रसंपन्न शास्त्री बडोद्याला महाराजांचे भेटीस आले असता त्यांना राजघराण्यांतील धार्मिक विधी हे पुराणोक्त पद्धतीने होतात ही गोष्ट दिसून आली. त्यांनी महाराजांना आपण क्षत्रिय असता आपले धार्मिक विधी हे पुराणोक्त पद्धतीने कसे होतात असा प्रश्न केला. राजपुतान्यातील रजपूत संस्थानिकांचे धार्मिक विधी हे वेदोक्त पद्धतीनेच होतात अशीही माहिती पुरविली. यावर सयाजीराव महाराजांनी आपल्या राजघराण्यांतील धार्मिक विधी हे वेदोक्त पद्धतीनेच झाले पाहिजेत असा हुकूम काढला. तेथील ब्राह्मणांनीही फारशी

खळखळ न करता राजघराण्याचे धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनें करावयास सुरवात केली.

त्या नंतर चारच वर्षांनी इ. १९०० साली कोल्हापूरचे वेदोक्त प्रकरण उद्भवले. कार्तिक महिन्यात महाराज नित्याप्रमाणे प्रातःकाली पंचगंगा नदीवर स्नानास गेले होते. त्या वेळी महाराजांचे बरोबर सुप्रसिद्ध पुरोगामी विचारवंत आणि वेदशास्त्र संपन्न पंडित राजारामशास्त्री भागवत हे होते. महाराज स्नान करीत असता स्नानाला पावित्र्य येण्यासाठी त्यांच्या बरोबर असलेल्या पुरोहिताने मंत्र म्हणण्याचा प्रघात होता पण हा पुरोहित मंत्र म्हणण्यापूर्वी स्वतः मात्र कधीच स्नान करीत नसे. त्या दिवशी महाराज स्नान करीत असता तो पुरोहित जे मंत्र म्हणत होता ते मंत्र ऐकूण राजारामशास्त्री भागवत यांना आश्चर्य वाटले. त्यांनी महाराजांना सांगितले की महाराज आपण क्षत्रिय असता या पुरोहिताने वेदोक्तमंत्र न म्हणता पुराणोक्तमंत्र म्हटले. महाराजांनी त्या पुरोहिताला जाब विचारला. त्याने स्पष्ट सांगितले की आपण छत्रपती असला तरी शूद्र आहात. वेदमंत्र म्हणण्याची व मंत्र म्हणण्यापूर्वी स्नान करण्याची मला जरूरी वाटत नाही. महाराजांनी त्याला सांगितले की मी क्षत्रिय घराण्यातील आहे आणि मी स्नान करीत असताना वेदमंत्राचाच घोष झाला पाहिजे. त्यावर त्या पुरोहिताने उत्तर दिले की कोल्हापूरचा ब्रह्मवृंद तुम्हाला क्षत्रिय मानत नाही तोपर्यंत मी पुराणोक्त मंत्रच म्हणणार. त्या पुरोहिताच्या तोंडचे हे वाक्य ऐकून महाराजांना धक्का बसला आणि एका नव्या संघर्षाची ठिणगी यामुळे पडली. या पुढची पाच वर्षें महाराजांना नुसत्या कोल्हापूरच्याच नव्हे तर अखिल महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाशी एक प्रकारचे धर्मयुद्ध पुकारावे लागले.

महाराजांनी राजोपाध्ये यांना आपल्या राजघराण्यांतील धार्मिक

विधी वेदोक्त पद्धतीने करण्याची आज्ञा केली. वेदोक्त पद्धतीने धार्मिककृत्ये करण्यासाठी तीसहजार रुपये उत्पन्नाच्या इनाम जमीनी कोल्हापूर दरबारकडून राजोपाध्यांच्याकडे वंशपरंपरेने चालू होत्या. राजोपाध्ये हे सुशिक्षित गृहस्थ होते. परंतू महाराजांनी कोल्हापूरमध्ये ज्या सामाजिक सुधारणा चालविल्या होत्या त्यामुळे समस्त ब्रह्मवृंद महाराजांच्यावर नाखुष होता. इथल्या ब्राह्मण समाजातील प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर हे राजाराम कॉलेज-मध्ये प्रोफेसर होते त्या मुळे ते महाराजांचे नोकर होते. ते आपल्या 'समर्थ' वर्तमानपत्रातून चिथावणी देत असत. इचलकरंजीचे जहागिरदार, पुण्याहून लो. टिळक, इतिहासाचार्य राजवाडे प्रभृती मंडळींची वेदोक्त प्रकरणात महाराजांना हार जावयाचे नाही अशी राजोपाध्यांना उघड उघड चिथावणी होती.

प्रो. विजापूरकर यानी आपल्या समर्थ पत्रात महाराजांना ते शिवाजी महाराजांचे वंशज असले तरीसुद्धा वेदोक्ताचा तिळमात्र अधिकार नाही असे स्पष्टपणाने लिहिण्यास सुरवात केली. विजापूरकरांचे मते गागाभट्टाने वेदोक्त पद्धतीने शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक केला यामुळे गागाभट्टाला शौचकूपात मरण आले आणि शिवाजी महाराज व त्यांचा मुलगा संभाजी यांचा वेदोक्त पद्धतीने राज्याभिषेक झाल्यामुळे अकाली अंत झाला.

राजोपाध्यांचे मते महाराज हे घाटगे घराण्यातून दत्तक आल्यामुळे आणि घाटगे घराणे हे शूद्र घराणे असल्यामुळे शाहू महाराज हे दत्तक विधानाने जरी ते छत्रपती झाले तरी त्यांना वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्याचा हक्क पोहोचत नाही.

लो. टिळकांनी केसरी वर्तमानपत्रातून वेदोक्त प्रकरणात महाराजांचे विरोधी भूमिका घेतली. त्यांच्या मते गादीवर बसलेल्या छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार आहे. म्हणजे त्यांच्या म्हणण्याचा

आशय असा की गादीवर बसलेल्या राजाला जर दोन मुले असतील तर त्यातील वडिल मुलगा गादीवर जो बसणार असेल तो क्षत्रिय व त्याला फक्त वेदोक्ताचा अधिकार आहे. आणि दुसरा मुलगा शूद्र, त्याला वेदोक्ताचा अधिकार नाही.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी शाहू महाराजांना वेदोक्ताचा अधिकार आहे की नाही. याबद्दल निवाडा देण्यासाठी एक लवाद मंडळ नेमावे व त्याच्यामध्ये एक युरोपियन संस्कृत पंडित असावा असे आपले मत व्यक्त केले होते.

प्रो. विजापूरकर हे राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जातात. लो. टिळक हे देशाचे नेते म्हणून विख्यात आहेत. राजवाडे हे इतिहासाचार्य म्हणून प्रसिद्ध आहेत. या तिघांनी वेदोक्त प्रकरणामध्ये जी भूमिका घेतली ती राष्ट्रीय शिक्षणाच्या पुरस्कर्त्याला, देशाच्या नेत्याला व इतिहास संशोधकाला साजेशोभेशी नव्हती. केवळ सनातनी ब्राह्मण समाजाच्या पुढाऱ्याला शोभेल अशीच ही तर्कदुष्ट भूमिका होती असे त्यांच्या बद्दलचा रास्त आदरभाव बाळगूनही मोठ्या खेदाने म्हणावे लागते. गागाभट्टाच्या नंतर जवळ जवळ दोनशे वर्षांनी ही मंडळी महाराष्ट्रात जन्माला आली तरी ती गागाभट्टाने जी कृती केली त्या पुढे जाऊ शकली नाहीतच परंतू त्याच्याही पाठीमागे राहिली.

महाराजांनीही या मोठमोठ्या मंडळींच्या संघटित विरोधाला भीक न घालता आपला हक्क बजावण्याचा निर्धार केला. आपण क्षत्रिय असता व छत्रपती घराण्यात शिवाजी महाराजांचे पासून वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्याची प्रथा असता महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांनी आपली जाणून बुजून मानहानी करण्याचा जो प्रयत्न चालविलेला आहे तो सर्व शक्तींनिशी मोडून काढण्याचा महाराजांनी निश्चय केला.

महाराजांनी राजोपाध्यांना राजघराण्यातील धार्मिक कृत्ये वेदोक्त पद्धतीने करावीत म्हणून लेखी व तोंडी कळविले. महाराजांनी राजोपाध्यांवर एकदम कारवाई न करता त्यांनी गोखले, पंडित व खुद्द राजोपाध्ये यांची कमेटी नेमून वेदोक्त पद्धतीने विधी करण्याबाबत वस्तुस्थिती काय आहे या संबंधीचा अहवाल सादर करण्यास सांगितले. राजोपाध्यांनी या कमेटीशी असहकार केला. कमेटीच्या राहिलेल्या दोन सभासदानी शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापासून सर्व कागदपत्रे पाहिली. आणि त्यांत त्याना आढळून आले की १८६० सालापर्यंत कोल्हापूरच्या राज घराण्यांतील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने होत असत. परंतू बाबासाहेब महाराज गादीवर असताना १८६० सालच्या सुमारास रघुनाथशास्त्री पर्वते या नावाच्या एका शास्त्र्याने महाराजांच्या मनात भरवून दिले की महाराजांना पुत्रसंतती होत नाही याचे कारण राजघराण्यांत वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी केले जातात हेच होय ! त्या भोळ्याभाबड्या राजाने त्यावेळे पासून या शास्त्र्याच्या बद सल्यानुसार राजघराण्यातील धार्मिक विधी पुराणोक्त पद्धतीने करण्यास सुरवात केली. लवकरच बाबासाहेब महाराजांचे १८६६ साली निधन झाले. त्यांनी मृत्युच्या आदलेच दिवशी आपल्या बहिणीच्या मुलाला दत्तक घेतले व त्याचे नाव राजाराम असे ठेवले. राजाराम महाराजही वयाच्या विसाव्या वर्षी इटलीत मरण पावले. त्यांच्या पत्नीने चौथ्या शिवाजी महाराजांना दत्तक घेतले. परंतू हातात राज्यसूत्रे येण्यापूर्वीच त्यांचाही अहमदनगरच्या किल्यात ब्रिटीश रखवालदारानी निर्घृणरित्या खून केला. या दोन अल्पवयस्क कारकिर्दीत वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही. म्हणजे १८६० सालापासून ते १९०० सालापर्यंत या ४० वर्षाच्या कालावधीत कोल्हापूरच्या राजघराण्यातील धार्मिक विधी पुराणोक्त पद्धतीने होऊ लागले होते.

त्याचवेळी महाराजांनी सातारा, नागपूर, बडोदा व उत्तरेतील राजपूत संस्थानिक यांच्या घराण्यांत धार्मिकविधी कोणत्या पद्धतीने चालतात या बद्दल माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. त्याना आढळून आले की या सर्व संस्थानातील धार्मिकविधी वेदोक्तपद्धतीनेच चालतात. लवाद कमेटीचा अहवाल व हा पुरावा हाती आल्यानंतर महाराजांनी राजोपाध्यांच्या बाबतीत निर्वाणीची कारवाई करण्याचा आपल्या मनाशी निर्णय घेतला. तरी सुद्धा राजोपाध्यांनी सामोपचारानी आपल्या राज घराण्यातील धार्मिक-विधी वेदोक्त पद्धतीने करावेत असे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सुचविण्याचा प्रयत्न केला. याचा अर्थ राजोपाध्ये आणि त्यांचे पाठीराखे यांनी महाराज हे राजोपाध्यावर काही कारवाई करू शकणार नाहीत असा सोईस्करपणे केला. तो महाराजांचा दुबळेपणा आहे असे मानण्यापर्यंत त्यांची मजल गेली. पण महाराजांनी काल न दवडता व त्याना इंग्लंड येथे एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहण समारंभाला लवकरच जाण्याचे असल्या कारणाने राजोपाध्यांनी अखेरपक्षी जर राज घराण्यातील धार्मिक कृत्ये वेदोक्त पद्धतीने केली नाहीत तर त्याबद्दल सक्त विचार केला जाईल. अशी महाराजांनी निर्वाणीची १९०२ च्या मे महिन्यात नोटीस दिली. परंतू राजोपाध्यांनी दाद दिली नाही. त्या मुळे महाराजांना त्यांचे सुमारे तीस हजार रुपयाचे उत्पन्न जप्तीत आणणे भाग पडले. जप्तीचा हुकूम करून महाराज एडवर्ड बादशहाचे राज्यारोहणासाठी इंग्लंडला निघून गेले. राजोपाध्यांनी अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कौन्सिलकडे या हुकमाचा फेरविचार व्हावा म्हणून रेव्हयू अॅप्लिकेशन केला. कौन्सिलने तो फेटाळला. त्यानंतर राजोपाध्यांनी कर्नल फेरीस हे कोल्हापूरचे पोलिटीकल एजंट असता त्यांच्याकडे अपील केले. कर्नल फेरीस यांनी राजोपाध्ये हे महाराजांचे नोकर असल्यामुळे त्यांनी राजवाडयावरील धार्मिक कृत्ये वेदोक्त पद्धतीने करण्यास म्हणजेच आपले कर्तव्य व नोकरी करण्यास

नकार दिल्यामुळे महाराजांनी त्यांचे वतन जप्त केले आहे. ती संपूर्णपणे महाराजांच्या अखत्यारीतील गोष्ट आहे. अशा प्रकारचा निर्णय देऊन राजोपाध्यांचे अपील फेटाळले. पोलिटीकल एजंटाचे या ठरावावर राजोपाध्ये यांनी मुंइईच्या गव्हर्नरकडे दाद मागितली. तेथेही पोलिटीकल एजंटाचा ठराव कायम झाला. त्या नंतर त्यांनी व्हॉयसरॉयकडे अपील केले. व्हॉयसरॉयने दोन्ही बाजू समजावून घेऊन कोल्हापूर दरबारचे, मुंबई सरकारचे व पोलिटीकल एजंटचें मत मागवून राजोपाध्ये यांचे अपील फेटाळलें. अशा रीतीने हा प्रश्न कायमचा निकालात निघाला.

दरम्यानच्या काळात महाराजांनी कोल्हापूर संस्थानांत दरबारची जेथे जेथे देवस्थाने आहेत तेथील जोशी, ग्रामोपाध्ये वगैरे लोकांनी स्थानिक देवस्थानची धार्मिक कृत्ये वेदोक्त पद्धतीने करण्याचे नाकारल्यामुळे त्यांच्याही वतनी जमिनी जप्तीत आणल्या. या लोकांनी कोल्हापूरच्या करवीर पीठाचे शंकराचार्यांचेकडे धाव घेतली व त्यांना महाराज हे क्षत्रिय आहेत की शूद्र आहेत या संबंधीचा निर्णय देण्यास विनंती केली. करवीर पीठाचे शंकराचार्य त्यावेळी भिलवडीकर स्वामी होते. भिलवडीकर स्वामींच्या कारकीर्दीत शंकराचार्यांच्या पीठाला संन्यास्थाश्रमा ऐवजी गृहस्थाश्रमाचे स्वरूप प्राप्त झाले होते. भिलवडीकर स्वामींच्या पूर्वाश्रमीची बायको, मुले, मुली, जावई, सुना, नातवंडे इत्यादि मठातच रहात. या सर्वांच्या खर्चासाठी मठाच्या पैशाची उधळपट्टी मुक्त हस्ताने चाललेली होती. भिलवडीकर स्वामींनाही महाराजांचे क्षत्रियत्व मान्य नव्हते. भिलवडीकर स्वामींनी आपल्या मठातील संपत्तीची चालविलेली उधळपट्टी पाहून महाराजांनी भिलवडीकर स्वामींना मठाचे विश्वस्त या नात्याने चोख कारभार ठेवावा अशा सूचनाही दिलेल्या होत्या. परंतू मठाच्या अंतर्गत व्यवस्थेत महाराजांना हस्तक्षेप करता येणार नाही असे भिलवडीकर

स्वामींनी उत्तर दिले. महाराज संधीची वाट पहात होते. तशी संधी त्यांना १९०३ साली मिळाली. भिलवडीकर स्वामी वृद्ध झालेले होते म्हणून आपल्या पश्च्यात करवीर पीठाचे शंकराचार्य म्हणून ब्रह्मनाळकर स्वामींची शिष्य म्हणून नियुक्ती केली. ब्रह्मनाळकर स्वामी हे मूळचे पुण्याचे ते कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध होते. आणि विशेष म्हणजे वेदोक्त प्रकरणात शाहू महाराजांचे क्षत्रियत्वाला ते तीव्र विरोध करणारे होते किंबहुना शिष्य म्हणून त्यांचा निवड करायला पुण्यातील राजकीय क्षेत्रातील मंडळींनी हातभार लावला. त्याचे कारण महाराजांचे बद्दलचा द्वेश हे होय.

पूर्वी बाबासाहेब महाराजांचे कारकीर्दीत (१८६२-६३ चे सुमारास) पोलिटीकल एजंटाने शंकराचार्य पीठासंबंधी एक वटहुकूम काढलेला होता. त्या वटहुकूमात करवीर पीठाचे शंकराचार्य यांनी कोल्हापूर च्या महाराजांचे पूर्व परवानगीशिवाय शिष्य करू नये असे स्पष्ट म्हटले होते. भिलवडीकर स्वामींनी ब्रह्मनाळकर स्वामींना शिष्य केले त्यावेळी महाराजांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते. परंतू त्यांनी जाणून बुजून महाराजांची परवानगी घेतली नाही. या वटहुकूमाचा आधार घेऊन महाराजांनी शंकराचार्यांच्या करवीर पीठाचे सुमारे ५० हजार रु. उत्पन्न जप्तेत ठेवले. भिलवडीकर स्वामींनी संकेश्वरला प्रयाण केले. व ब्रह्मनाळकर स्वामी कोल्हापूरात येऊही शकले नाहीत. ब्रह्मनाळकर स्वामींनी महाराष्ट्रात सर्वत्र दौरा सुरू केला. आणि दिवसा मशाली लावून पालखीत बसून मिरवायला व पाद्यपूजा घेण्याला सुरवात केली. दक्षिणेच्या रूपाने लोकांच्याकडून पैसा उकळायला सुरवात केली. हे शिष्य स्वामी पुण्याला गेले असता पुण्याच्या ब्राह्मण मंडळींनी त्यांची मिरवणूक काढली. लो. टिळक प्रभृती राष्ट्रीय नेत्यांनी त्यांच्या पालखीला खांदा दिला. आणि त्यांना आठ हजार रुपयांची थैली अर्पण केली.

शिष्य बाहेर दौरा करून पैसा मिळवत आहे हे पाहून गुरु स्वामींना वाईट वाटले. व त्यांनी त्याचेकडे पैशाची मागणी केली. शिष्य स्वामींनी गुरुस्वामींना पैसा द्यायला नकार दिला. त्या मुळे गुरु आणि शिष्य या दोघांचे मध्ये वितुष्ट आले.

गुरुस्वामींच्याकडे ज्या ग्रामोपाध्ये, जोशी, पुरोहित वगैरे लोकांनी महाराज हे क्षत्रिय आहेत का शूद्र आहेत या बाबतीत निर्णय देण्यासंबंधी अर्ज केले होते. ते अर्ज गुरुस्वामींनी शिष्य स्वामीकडे अखेर निर्णयासाठी पाठवून दिले. परंतू या गुरु शिष्याच्या भांडणात ते अर्ज तसेच अनिर्णीतच ठेवले. त्या मुळे अर्ज करणाऱ्या वतनदारांची कुचंबणा झाली. वतन ही नाही व वेतन ही नाही अशी मोठी केविलवाणी त्यांची परिस्थिती झाली.

१९०५ साली राजोपाध्यांच्या अपीलाचा व्हॉयसरॉयकडून अखेरपक्षी निकाल लागल्या नंतर महाराजांचे क्षत्रियत्त्व सिद्ध झाले. त्या मुळे आपण आता जास्त खळखळ करण्यात अर्थ नाही असे गुरुस्वामींना वाटले. व त्यांनी कोल्हापूर जवळील कळंबे या गावी येऊन महाराजांचे भेटीची इच्छा प्रदर्शीत केली. महाराजांना त्यांनी पोषाख पाठवून देऊन आपण क्षत्रिय कुलोत्पन्न असल्या कारणाने वेदांचा आपल्याला अधिकार आहे असे म्हणून वेदोक्त पद्धतीने आशिर्वाद दिला. पण त्याचवेळी मठाचे जप्त झालेले तीन वर्षांचे उत्पन्न सुमारे दीड लाख आपल्याला मिळावे अशी मागणी केली. गुरुस्वामींच्या या हालचालीचे वृत्त शिष्य स्वामींना कळताच ते ही शिरोळ तालुक्यातील उदगाव या गावी आले. व क्षत्रिय कुलोत्पन्न म्हणून महाराजांना वेदोक्त पद्धतीने आशिर्वाद दिला व आपल्यास शिष्य करताना गुरु स्वामीनी परवानगी घेतली नव्हती. त्याबद्दल महाराजांची माफी मागितली. अशा रीतीने राजोपाध्ये, करवीर पीठाचे शंकराचार्य

भिलवडीकर त्यांचे शिष्य ब्रह्मनाळकर आणि त्यांना पाठिंबा देणारी समस्त ब्राह्मण मंडळी व प्रो. विजापूरकर, लो. टिळक, इतिहासाचार्य राजवाडे, इचलकरंजीचे जहागिरदार या सगळ्यां-च्यावर पाच वर्षे चाललेल्या या धर्मयुद्धामध्ये महाराजांनी प्रचंड विजय मिळविला.

यावेळी महाराजांचे बाजूने कांही उदार ब्राह्मण मंडळी उभी राहिली होती त्यांचाही गौरवपूर्वक उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. राजारामशास्त्री भागवत, नारायणभट्ट सेवेकरी, कुरुंदवाड ज्युनि-अर जहागिरीचे अधिपती बापूसो पटवर्धन, न्या. पंडित, न्या. गोखले व जोशीराव वगैरे मंडळी ब्राह्मण समाजाच्या धमकावणीला न भिता महाराज हे क्षत्रिय आहेत; मराठा समाज हा क्षत्रिय आहे व त्यांना वेदोक्ताचे अधिकार आहेत असे आग्रहाने प्रतिपादन करीत होती यापैकी सेवेकरी व जोशीराव यांना कोल्हापूरच्या समस्त ब्राह्मण मंडळींनी वाळीत टाकले होते. वेदोक्त प्रकरणात महाराजांना जे भलेबुरे अनुभव आले आणि पांचवर्षे धर्मसंगर करावा लागला यातून प्रेरणा घेऊन महाराजांनी पुढे क्षत्रिय वैदिक विद्यालय काढून ब्राह्मणेत्तर समाजातील पुरोहित निर्माण केले.

महाराजांच्या या कृत्याबद्दल महाराष्ट्रातील काही विचारवंताच्या कडून त्यांना दोष दिला जातो त्यांच्या म्हणण्याचा आशय असा असतो की महाराजांनी शेंडीवाला भटजी काढून शेमलेवाला भटजी नेमला. महाराजांनी ही एक क्रांतिकारक सुधारणा केली होती. ही गोष्ट ही विचारवंत मंडळी सोईस्करपणे विसरतात. पिढ्यानुपिढ्या आणि शतकानुशतके पुरोहिताच्या धंद्याची ब्राह्मणसमाजापुरती मक्तेदारी निर्माण झालेली होती. अन्य कोण-त्याही जातिला या व्यवसायात मज्जाव असे. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे १९३६ साली केलेल्या

खालील विधानावरून महाराजांनी उचललेले पाऊल किती दूरदृष्टीचे, समर्पक आणि योग्य होते याची प्रचिती आल्याशिवाय रहाणार नाही. डॉ. आंबेडकर म्हणतात. "जन्मजात पुरोहितगिरीची पद्धत बंद करून पूरोहितांचा धंदा सर्व हिंदूंना खुला केला पाहिजे. जो हिंदू उपाध्यायाची परीक्षा उत्तीर्ण होईल त्याला पुरोहिताची सनद दिली पहिजे. पुरोहितांची संख्याही कमी केली पाहिजे. यामुळे ब्राह्मणी धर्माचा शेवट होऊन हिंदू धर्म तरेल" शंकराचार्य पीठ हे संबंध हिंदूधर्माचे नसून केवळ ब्राह्मणांचेच आहे हे शंकराचार्यांच्या वागणूकीवरूनच सिद्ध झाल्यामुळे महाराजांनी शंकराचार्यांच्या पीठाला समांतर असे बहुजन समाजासाठी क्षात्र जगद्गुरूपीठाची स्थापना करून ब्राह्मणांच्या धार्मिक मक्तेदारीला सुरूंग लावला.

महाराजांनी सामाजिक क्रांतीच्या दिशेने आपल्या हयातीत ज्या गोष्टी केलेल्या होत्या त्यांपैकी बहुजनसमाजात शिक्षणाचा प्रसार, अस्पृश्यता निवारण, वेदोक्त प्रकरणामुळे धर्ममार्तंडाच्या विरुद्ध पुकारलेले बंड आणि त्यात मिळविलेले यश, बहुजन समाजाला मुंबईच्या कायदेमंडळात सात राखीव जागा मिळविण्यात आलेले यश या सर्वांचा उहापोह वर केलेला आहे. याशिवाय त्यांनी केलेल्या इतर अनेक गोष्टीसंबंधी आपल्याला माहिती पुरविण्याची इच्छा असूनसुद्धा वेळेच्या अभावी तसे करणे शक्य होत नाही. याबद्दल मला दिलगिरी वाटते. परंतु वर सांगितलेल्या गोष्टीवरून महाराजांची पावले सामाजिक क्रांतीच्या दिशेने कशी कशी पडत होती हे एवढ्यावरूनही कळून येण्यासारखे आहे.

६ मे १९२२ रोजी महाराजांचा अकाली अंत झाला. आपल्या मृत्युनंतर सामाजिक क्रांतीचे नेतृत्व कोणी करावे याबद्दल महाराजांनी माणगावच्या अस्पृश्य परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांना

पुढे आणण्याचे प्रयत्न केले होते. 'मूकनायक' या डॉ. आंबेडकरांच्या वर्तमानपत्राला व खुद्द डॉ. आंबेडकरांनी कायदेपंडित होऊन सामाजिक कार्याला वाहून घ्यावे म्हणून महाराजांनी सढळ हाताने मदत केली होती.

डॉ. आंबेडकर हे १९२३ सालीं इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांच्यावर सामाजिक क्रांतीची नवीन जबाबदारी येऊन पडली. महाराजांनी म्हटल्याप्रमाणे ही जबाबदारी पेलण्यास डॉ. आंबेडकर सर्वथैव समर्थ होते. त्यांचे अमेरिका, इंग्लंड व जर्मनी या तीन देशांतील तीन विद्यापीठांत शिक्षण झाले होते. भरपूर अनुभव पाठीशी होता. या देशात आणि हिंदुसमाजात अस्पृश्यांचे हाल कसे होतात याचा लहानपणापासून त्यांना कटू अनुभव होता. म्हणून आपल्या समाजाचा विकास व्हायचा असेल तर आपण शिक्षणात पुढे सरसावले पाहिजे असे त्यांचे मत होते. पोटाला चिमटा घेऊन त्यांनी आपला विद्याव्यासंग अखंडपणे चालू ठेवला. ते अभ्यासात इतके गढलेले असत आणि दारिद्र्याने इतके पिचलेले असत की ते कधी कधी आपल्या मित्रांना म्हणत असत की मला जेवणाला पैसा नाही आणि झोपायला वेळ नाही. अशा अवस्थेत डॉ. आंबेडकरांनी समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, राजकारण, कायदा, अर्थकारण इ. विषयांचा सखोल अभ्यास करून 'Ancient Indian Commerce' ('प्राचीन भारतातील व्यापार') 'Casts in India; their mechanism, Genesis and development' ('भारतातील जातीसंस्था : तिची उत्पती आणि वाढ') 'Evaluation of Provincial finance in British India' ('ब्रिटिश भारतातील प्रांतिक, भौतिक उत्क्रांति') 'Small Holdings in India and their Remedies' ('भारतातील लहान जमिनी आणि तद्विषयक उपाययोजना') आणि 'The Problem of the Rupee' ('चलनाचा प्रश्न') अशा प्रकारचे प्रबंध लिहून आपल्या गुरुजींना

व त्या त्या विषयातील तज्ञांना आश्चर्य चकित करून टाकले. प्रतिभा आणि ज्ञान असलेला एक प्रकांडपंडित, एक स्वाभिमानी आणि बाणेदार व्यक्ती, कर्तव्य आणि नेतृत्व हे गुण असलेला एक तरुण या नात्याने त्यांनी सामाजिक क्रांतीची सूत्रे हाती घेतली.

डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यांचा उद्धार करण्यासाठी १९२४ साली 'बहिष्कृत हितकारणी सभा' या नावाची संस्था स्थापन केली या संस्थेतर्फे महाराष्ट्रातील अस्पृश्यांना संगठित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. १९२७ च्या ऑगस्ट महिन्यात महाड येथे कुलाबा जिल्हा अस्पृश्य परिषद भरविली. या परिषदेला सुमारे पाच हजार लोक हजर होते. या वेळेपर्यंत डॉ. आंबेडकर स्वत:ला हिंदूच समजत होते. आणि एक हिंदू म्हणून समाजातील इतर घटकांप्रमाणे आपल्याला हक्क मिळाले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. १९२३ साली रावबहादूर सी के. बोले यांनी मुंबई कायदेमंडळात अस्पृश्यांना सार्वजनिक तळे, विहिरी, दवाखाने, विश्रांतिगृहे वगैरे खुली आहेत. असा ठराव मंजूर करून घेतला. परंतु या ठरावाची अंमलबजावणी करण्याचे धाडस कुलाब्याची परिषद होईपर्यंत भीतीच्यापोटी अस्पृश्यांनी दाखविले नव्हते. महाड गावाला पिण्याच्या पाण्याचे एक तळे आहे. त्याचे नाव चवदार तळे. या तळ्यात सवर्ण हिंदू पाणी भरत असत. तसेच मुसलमान, ख्रिश्चन परधर्मीय मंडळी पाणी भरत असत. पशु पक्षी सुद्धा पाणी पीत असत. परंतु अस्पृश्यांना मात्र या तळ्यातील पाणी भरण्यास मज्जाव होता. रावबहादूर बोल्यांच्या ठरावाचा आधार घेऊन डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांनीशी या तळ्यात पाणी पिण्याचा निश्चय केला. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चाराचारांच्या रांगेने अस्पृश्यमंडळी तळ्याच्या दिशेने निघाली. डॉ. आंबेडकर तळ्यात उतरले. ओंजळ भरून पाणी प्याले.

त्यांच्या अनुयायांनी त्यांचे अनुकरण केले आणि अशा रीतीने हिंदू म्हणून पाणी पिण्याचा हक्क त्यांनी बजावला. ही सर्व मंडळी सभेच्या मंडपात परत फिरली. अस्पृश्यांनी तळ्यात जाऊन पाणी प्याल्याची बातमी हा हा म्हणता गावभर पसरली. सवर्ण हिंदू खवळून उठले. लाठ्या काठ्या घेऊन त्यांनी मंडपाकडे चाल केली व तिथे जमलेल्या अस्पृश्य मंडळींना बेदम झोडपून काढले. याबद्दल पुढे कोर्टात फौजदारी कज्जे चालून बऱ्याच सवर्ण लोकांना या प्रकरणात शिक्षा झाल्या.

अस्पृश्यांच्या पाणी पिण्यामुळे सनातनीवाद्यांनी ' तळे बाटले ' असा एकच हलकल्लोळ केला. आणि मग तळे शुद्ध करण्यासाठी धर्ममार्तंडानी एक युक्ती योजिली. त्यांनी एकशे आठ घागरी तळ्यातील पाण्याने भरून बाहेर काढल्या. त्या सर्व घागरीत गोमूत्र व गोमय मिसळले आणि वेदमंत्राच्या घोषात त्या सर्व घागरीतील पाणी पुन्हा तळ्यात ओतून तळे शुद्ध झाल्याचा गवगवा केला. डॉ. आंबेडकरांच्या हस्तस्पर्शाने पावन झालेल्या त्या तळ्यात पशुचे शेण व मूत्र मिसळून अशुद्ध झालेल्या तळ्यास त्यांनी शुद्ध म्हणण्यास सुरवात केली.

त्यानंतर त्याच वर्षाच्या १९२७ चे डिसेंबर महिन्यामध्ये पुन्हा डॉ. आंबेडकरांनी पाणी पिण्याचा चवदार तळ्यातील सत्याग्रह करण्याचे ठरविले. कारण महाड नगरपालिकेने व स्थानिक जनतेने हरिजनांना चवदार तळ्यातील पाणी घेण्यास मनाई केली होती. डॉ. आंबेडकर आपल्या अनुयायांशी महाडला गेले पण त्यांनी सभा घेऊ नये अगर पाणी भरू नये म्हणून सवर्ण हिंदूनी केलेल्या दाव्यात कोर्टाकडून त्यास मनाई लावली. आंबेड-करांनी मनाई हुकूम मानला परंतू त्या दिवशी त्यांनी मनुस्मृतीचे दहन करून सनातन्यांना पुन्हा एक धक्का दिला. त्यामुळे आसेतू-

हिमाचल सगळ्या भागातील मनुस्मृती जाळल्याबद्दल सनातनी ब्राह्मणांत खळबळ उडाली व चौहोंकडून डॉ. आंबेडकरांचा निषेध होऊ लागला.

१९२८-२९ साली हिंदुस्थानला काही नवीन राजकीय हक्क देण्याच्या इराद्याने ब्रिटिश सरकारने सायमन कमिशन पाठविले. त्यांनी हिंदुस्थानातील निरनिराळ्या पक्षांच्या, पंथांच्या, धर्मांच्या, जातींच्या साक्षी घेऊन ब्रिटिश पार्लमेंटला आपला रिपोर्ट सादर करावयाचा होता. काँग्रेसने सायमन कमिशनवर बहिष्कार घातलेला होता. लाहोर काँग्रेसच्या अधिवेशनात पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव झालेला होता. तेव्हा संपूर्ण स्वातंत्र्याखेरीज आपले कशानेही समाधान होणार नाही असे काँग्रेसचे म्हणणे होते. म्हणून काँग्रेसने सायमन कमिशनच्या कामात भाग घेतला नाही. उलटपक्षी सायमन कमिशन जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांना काळे झेंडे दाखवून 'सायमन परत जा' अशा निषेधाच्या घोषणा काँग्रेसकडून होत होत्या. डॉ. आंबेडकरांना सायमन कमिशनवर बहिष्कार घालणे परवडणारे नव्हते. कारण नव्या सुधारणा ज्या जाहीर होणार त्यामध्ये हरिजनांना जास्तीत जास्त जागा मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. म्हणून प्रत्येक प्रांतामध्ये सायमन कमिशनला सहाय्य करण्यासाठी त्या त्या प्रांतामध्ये एक मंडळ नेमले होते. त्या मंडळावर सरकारने डॉ. आंबेडकरांची नियुक्ती केली होती. डॉ. आंबेडकरांनी या नियुक्तेला मान्यता देऊन सायमन कमिशनपुढे अस्पृश्यांच्या मागण्याची कैफियत सादर केली. तोंडी साक्षही दिली. सायमन कमिशनचा रिपोर्ट गेल्यानंतर ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नांचा बिचार करण्यासाठी इग्लंडमध्ये 'गोलमेज परिषद' भरविली काँग्रेसने या परिषदेवर बहिष्कार घातलेला होता. अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकर व श्रीवास्तव

यांची निवड झाली होती. डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेपुढे अस्पृश्यांना काय हक्क हवेत यासंबंधी मांडणी केली. सायमन कमिशनपुढे साक्ष देताना डॉ. आंबेडकरांनी मुसलमान, ख्रिश्चन आणि अस्पृश्य यांना संयुक्त मतदार संघात राखीव जागा द्याव्यात अशी मागणी केली होती. पण गोलमेज परिषदेपुढे मात्र त्यांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.

त्यानंतर दुसरी गोलमेज परिषद भरविण्यात आली. त्या परिषदेमध्ये कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधींनी भाग घेतला होता. या परिषदेत अस्पृश्यांच्या नेतृत्वासंबंधी व हक्कासंबंधी गांधी आणि आंबेडकर यांच्यात कडाक्याचा वाद झाला. गांधींचे म्हणणे असे होते की आपणच अस्पृश्यांचे पुढारी आहोत आणि हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ अगर संयुक्त मतदारसंघात राखीव जागा देऊ नयेत परंतू डॉ. आंबेडकरांनी गांधींच्या म्हणण्याला कसून विरोध केला व स्वतंत्र मतदार संघाची मागणी जोरदार रीतीने केली. शेवटी त्यावेळचे इंग्लंडचे पंतप्रधान रॅमसे मॅक्नोडॉल्ट यांनी जातीय निवाडयासंबंधी त्यांना योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा म्हणून गोलमेज परिषदेला जमलेल्या सर्व प्रतिनिधींनी आपल्या सह्यांनिशी कळविलें. म. गांधींनीसुद्धा त्यावर सही केली होती परंतू आपण सही केली तर आपली फसगत होईल आणि मग भांडावयास जागा रहाणार नाही. म्हणून डॉ. आंबेडकरांनी चाणाक्षपणाने त्या अर्जावर सही करण्याचे टाळले. दुसऱ्या गोलमेज परिषदेहून ही सगळी मंडळी परत आल्यानंतर जातीय निवाडा प्रसिद्ध झाला. या जातीय निवाडयाप्रमाणे हरिजनांना सबंध हिंदुस्थानात ७१ राखीव जागा मिळाल्या होत्या. स्वतंत्र मतदार संघ मिळाला होता. सवर्ण हिंदूंच्या निवडणुकीत मतदान करण्याचा हक्कही मिळाला होता. हा निवाडा प्रसिद्ध झाला त्यावेळी म. गांधी येरवडा तुरुंगात होते. हरिजनांना मिळालेल्या

सवलती पाहून म. गांधींनी प्राणांतिक उपोषण केले. त्यामुळे हिंदू समाजात खळबळ उडाली व काहीही करून म. गांधींचे प्राण वाचविले पाहिजेत व हे प्राण वाचवावयाचे झाले तर आंबेडकरांनी नमते घेतले पाहिजे. म्हणून आंबेडकरांच्यावर सर्व देशातून व देशातील सर्व पक्षीय पुढाऱ्यांचेकडून मोठ्या प्रमाणात दबाव आणि दडपण येऊ लागले. आंबेडकरांनीही दबाव आणणाऱ्या लोकांना निक्षून सांगितले की गांधींच्या प्राणापेक्षा मला माझ्या अस्पृश्यांचे हक्क फार महत्त्वाचे वाटतात. वाटाघाटीत बरेच दिवस गेले. गांधींची प्रकृती क्षीण होऊ लागली. आणि शेवटी डॉ. आंबेडकरांची व महात्मा गांधींची तडजोड झाली ती. 'पुणे करार' या नावाने प्रसिद्ध झाली आहे. पुणे कराराप्रमाणे हरिजनांना संयुक्त मतदार संघात राखीव जागा देण्याचे ठरले. पण या जागांची संख्या मात्र ७१ च्या ऐवजी १४८ झाली. जास्त जागा हरिजनांच्या पदरात पडल्या परंतू स्वतंत्र मतदार संघाचा हक्क त्यांना गमवावा लागला. त्यामुळे काही कमावले आणि बरेचसे गमावले अशी हरिजनांची अवस्था झाली. त्यानंतर पुणे कराराला अनुसरून व आवश्यक त्या दुरुस्त्या करून १९३५ चा घटना कायदा अंमलात आला आणि या कायद्याप्रमाणे १९३७ साली प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका प्रथमच झाल्या. दरम्यान डॉ. आंबेडकरांनी हिंदू समाजाला धक्का देणारा आणखी एक कार्यक्रम हाती घेतला. तो म्हणजे 'काळाराम मंदिर सत्याग्रह' नाशिक येथे काळारामाचे एक पुरातन कालापासूनचे पवित्र मंदिर आहे. या मंदिरात सर्व सवर्ण हिंदूंना प्रवेश करण्याचा हक्क आहे. परंतू अस्पृश्यांना मात्र तेथे कायमचाच मज्जाव होता.

आपल्या समाजाला काळाराम मंदिरात प्रवेश मिळाल्यामुळे आपला इहलोकी अगर परलोकी काही फायदा होणार आहे. असे आंबेडकरांना वाटत नव्हते. आंबेडकर स्वतःला बुरसटलेल्या हिंदू

धर्मात सुधारणा व्हावी व हिंदूधर्मातील सगळे लोक समतेच्या पातळीवर यावेत असे त्यांना मनापासून वाटत होते. म्हणून ते स्वत:ला प्रॉटिस्टंट हिंदू म्हणवून घेत होते व हिंदू म्हणून काळाराम मंदिराच्या देवालयात प्रवेश करण्याचा स्पृश्य हिंदूइतकाच आपल्याला हक्क आहे तो हक्क बजावण्यासाठी म्हणून आंबेडकरांनी हा मंदिर प्रवेशाचा कार्यक्रम हाती घेतला. त्यासाठी जवळ जवळ पंधरा हजार अस्पृश्य मंडळी जमा झाली होती. सरळ प्रवेश मिळाला तर ठीक नाहीतर सत्याग्रह करून देवळात जाण्याचा हक्क ही मंडळी बजावणार होती. परंतु काळाराम मंदिराच्या सनातनी विश्वस्तांनी मंदिरालाच कुलूप घालून देवालाच बंदिस्त करून टाकले. त्याठिकाणी जमलेल्या स्पृश्य हिंदूनी अस्पृश्यांच्यावर दगड-विटांचा मारा करून त्यांना जखमी केले. हा सत्याग्रह आणि सवर्णांचे अत्याचार बरेच दिवस चालले होते. अखेरपक्षी डॉ. आंबेडकरांनी सनातन्यांच्या अंत:करणाला पाझर फुटत नाही ही गोष्ट जाणून सत्याग्रह मागे घेतला.

डॉ. आंबेडकरांना चवदार तळयाच्या बाबतीत, पुणे कराराच्या बाबतीत व काळाराम सत्याग्रहाचे बाबतीत जे नाना प्रकारचे कटू अनुभव आले. त्या अनुभवाच्या पोटीच त्यांनी नाशिक जिल्ह्यातील येवले या गावी भरलेल्या अस्पृश्य परिषदेत धर्मांतराची घोषणा केली. आपण हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही असे निश्चयाचे उद्‌गार डॉ. आंबेडकरांनी या परिषदेत काढले. त्यामुळे हिंदू समाजाला आणखी एक धक्का बसला. डॉ. आंबेडकर धर्मांतर करणार म्हणून अनेक धर्माचे लोक त्यांचेभोवती घिरट्या घालू लागले. ख्रिश्चनांनी त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न केला, मुसलमान समाज डॉ. आंबेडकर आपल्या अनुयायासह मुसलमान झाले तर त्यांचे भव्य स्वागत करायला तयार होते. शीख समाजातील मंडळी त्यांचेकडे आली. आपल्या धर्मांतरामुळे इतके

कटू अनुभव आले असतांनासुद्धा हिंदू संस्कृतीचे व भारताचे काही नुकसान होऊ नये म्हणून डॉ. आंबेडकरांनी समंजसपणाची व उदारमतवादी भूमिका घेतली त्यामुळे ख्रिश्चन व मुसलान धर्मांत जावयाचे नाही याचा त्यांनी आपल्या मनाशी पक्का निर्णय घेतला. मुसलमानांच्या अगर ख्रिश्चनांच्या बाबतीत बहुतांशी मुसलमानांना अगर ख्रिश्चनांना भारताबद्दल निष्ठा अगर प्रेम फारसे वाटत नाही. त्यांच्या निष्ठा हिंदुस्थानबाहेरील मुसलमान अगर ख्रिश्चन राष्ट्राकडेच असतात. ही गोष्ट डॉ. आंबेडकरांच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नव्हती. म्हणून त्यांचा ओढा जरी शीख धर्माकडे होता तरीसुधा निरखून, पारखून संपूर्णपणे विचार करून शीख धर्मात जावयाचे की बौद्ध धर्माचा स्वीकार करावयाचा याबद्दल त्यांचा विचार चालू होता. त्यांनी शीख धर्माचा तसाच बुद्ध धर्माचा गाढ व्यासंग चालविला व त्यामुळे धर्मांतराचा प्रश्न हा लांबणीवर पडला.

यानंतर डॉ. आंबेडकरांचे लक्ष राजकारणाकडे ओढले गेले. अस्पृश्यांचे हितसंबंध योग्य रीतीने रक्षण करावयाचे झाले तर राजकारणाशिवाय तरणोपाय नाही. याबद्दल त्यांची बालंबाल खात्री झाली होती.

१९३५ च्या घटना कायद्याप्रमाणे १९३७ साली जातिविरहित अशा मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका जाहीर झाल्या. डॉ. आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर' पक्षाची स्थापना केली. या पक्षातर्फे यांनी सर्वसामान्य जागा व अस्पृश्यांच्यासाठी असलेल्या राखीव जागा यासाठी उमेदवार उभे केले. एकूण उभे केलेल्या उमेदवारांची संख्या १८ होती. त्या पैकी १४ उमेदवार निवडून आले. डॉ. आंबेडकरांनी पक्षातर्फे काढलेल्या जाहीरनाम्यामध्ये हरिजन, शेतकरी, शेतमजूर, कामगार अशा दीन दलित लोकांचे प्रश्न आपण सोडविण्याचा प्रयत्न करू अशी

लोकांना हमी दिली होती. त्या हमीप्रमाणे त्यांनी वागायला सुरुवात केली. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर होते व गृहमंत्री कन्हैयालाल मुन्शी होते. काँग्रेस सरकारने असेंब्लीमध्ये औद्योगिक कलह विधेयक मांडले होते. या विधेयकामध्ये कामगारांचा संप करण्याचा हक्क काढून घेतला होता. संप करण्याचा हक्क हा कामगारांचा मूलभूत हक्क असल्याने मुंबई प्रांतातील कामगारवर्ग या बिलाच्या विरोधात खवळून उठला होता. भिन्न भिन्न पक्षाचे कामगार पुढारी डॉ. आंबेडकरांच्या प्रभावी नेतृत्वाखाली एकत्र आले होते. त्यांनी या कायद्याचा निषेध करण्यासाठी म्हणून काळादिन पाळण्याचे ठरविले. हरताळ पाळला, भव्य मोर्चा काढला आणि अशाप्रकारे कामगार मग तो कामगार कुठल्याही क्षेत्रातील व कोणत्याही संघटनेचा असो. सरकारला विरोध करण्यासाठी आपले प्राण पणाला लावून झगडत राहिला पाहिजे. सरकारने आपल्या पाशवी सामर्थ्याचे प्रदर्शन करायला कमी केले नाही. खुद्द गृहमंत्री कन्हैयालाल मुन्शी हे विमानात बसून कामगारांचे विराटदर्शन पहात होते. अखेर सरकारला नमते घ्यावे लागले व कामगारांना संपाचा हक्क देण्यात आला.

१९३९ साली महायुद्ध सुरू झाले. एकीकडे लोकशाहीवादी दोस्त राष्ट्रे व दुसरीकडे फॅसिस्ट राष्ट्रे यांच्यामधील झगडा विकोपाला गेला. काँग्रेसने म. गांधींच्या नेतृत्वाखाली असहकार पुकारला व वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. सरकारला सल्ला देण्यासाठी व्हॉयसरॉय यांनी एक सल्लागार मंडळ नियुक्त केले. त्या सल्लागार मंडळामध्ये डॉ. आंबेडकरांना घेण्यात आले. या सल्लागार मंडळात गेल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी हरिजन व दुर्बल घटक यांच्यासाठी जेवढे काम करता येईल तेवढे केले.

१९४२ च्या सुमारास ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानची भावी राज्यघटना कशी असावी याचा अंदाज घेण्यासाठी क्रिप्स कमिशन

पाठविले. क्रिप्स कमिशनची योजना डॉ. आंबेडकरांनी फेटाळून लावली काँग्रेसने तर बहिष्कारच टाकला होता. क्रिप्स योजनेला हिंदुस्थानातील इतर पक्षांनी फारशी साथ दिली नाही. डॉ. आंबेडकर हे व्हॉयसरॉयच्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिलमध्ये गेले व तेथे मजूरमंत्री म्हणून काम पाहू लागले. मजूरमंत्री म्हणून असताना त्यांनी मागासलेल्या वर्गाची व कामगारवर्गाच्या हिताची जपणूक करण्याचा अटोकाट प्रयत्न केला.

१९४५ साली दुसरे महायुद्ध संपले. इंग्लंडमध्ये निवडणुका लागल्या. चर्चिलच्या हुजूर पक्षाचा पाडाव झाला व ॲटलीचे मजूर सरकार इंग्लंडमध्ये अधिकारावर आले. चर्चिल पंतप्रधान असताना ज्यावेळी हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचा प्रश्न निघत असे त्यावेळो तो मोठ्या आढ्यतेने म्हणे की साम्राज्याचे दिवाळे वाजविण्यासाठी मी पंतप्रधान झालेलो नाही आणि हिंदुस्थानला मी पंतप्रधान असेतोपर्यंत कधीच स्वातंत्र्य देणार नाही. इंग्लंडचे लोक हे खरे लोकशाहीप्रेमी आणि जगातील लोकशाहीमध्ये इंग्लंडची लोकशाही ही परिपक्व लोकशाही आहे. युद्धकाळामध्ये चर्चिलसारखा माणूस प्रंतप्रधान पाहिजे म्हणून त्यांनी हुजूर पक्षाला निवडून दिले. आणि शांततेच्या काळात ॲटलीच्या मजूर पक्षाला निवडून दिले. मजूर पक्ष अधिकारावर आल्यानंतर पंतप्रधान ॲटलीने हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली ही घोषणा केल्यानंतर पुन्हा निरनिराळी कमिशन्स पाठविली. चर्चा, विचार, विनिमय सुरू झाले. व्हॉयसरॉय मुस्लिमलीग, काँग्रेस इतर छोटे मोठे पक्ष यांच्यात चर्चा सुरू झाल्या. हिंदुस्थानची भावी घटना कशी असावी व ती कोणी करावी याबाबतीत निश्चित निर्णय झाला. १९४६ च्या निवडणुका झाल्यानंतर प्रांतिक कायदेमंडळे अस्तित्वात आली होती. त्यातून निवडलेल्या प्रतिनिधींची घटना परिषद बनविण्यात आली. व या घटना

हिंदुस्थानची भावी घटना तयार करावी असे ठरले.

या घटनापरिषदेमध्ये आंबेडकरांना बंगालच्या विधानसभेतून निवडून यावे लागले. त्यावेळच्या मुस्लिमलीगने त्यांना पाठिंबा दिला आणि ते निवडून आले. घटना परिषदेची घटनेचा मसुदा तयार करण्याची एक कमेटी होती त्या कमेटीवर डॉ. आंबेडकरांची निवड झाली. बॅ. जीनानी घटना परिषदेशी असहकार केला. आणि त्यांनी मुसलमान बहुसंख्य असलेल्या पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली. कॉंग्रेसचा पाकिस्तानला विरोध होता. पाकिस्तान आणि हिंदुस्थान असे हिंदुस्थानची दोन छकले करण्याची कल्पना मुस्लिमलीगशिवाय कोणालाही पसंत नव्हती. म. गांधींनी तर त्राग्याने असे उद्गार काढले होते की 'Viviseet me before viviseating India.' 'हिंदुस्थानचे तुकडे करण्यापूर्वी प्रथम माझे तुकडे करा' हिंदू व मुसलमान या जमातींतील प्रक्षोभ वाढू लागला शेवटी कॉंग्रेसने व तिचे पं. नेहरू, पटेल प्रभृती पुढाऱ्यांनी आणि शेवटी गांधींनी पाकिस्तानास मान्यता दिली. डॉ. आंबेडकरांनी १९३८ सालीच Thoughts on Pakistan हा ग्रंथ लिहिला होता व त्या ग्रंथात पाकिस्तानच्या निर्मितीला त्यांनी मान्यता द्यावी असे सुचविले होते. मात्र असे करतांना कोणत्याही प्रकारचा दंगा-धोपा होऊ नये यासाठी लोकांची व मालमत्तेची व्यवस्थितरीतीने व शांतरीतीने अदलाबदल करावी परंतू हा व्यवहारी मार्ग कोणास रुचलाही नाही आणि पचलाही नाही. व शेवटी द्विराष्ट्र निर्मिती झाल्यानंतर सरहद्दीवरील प्रांतात फार मोठ्या प्रमाणात हत्याकांड झाले. रक्ताचा थेंबही न सांडता आपण देश स्वतंत्र केला अशी म्हणणारी माणसं आपल्याच देशबांधवांनी एकमेकांचे मुडदे कसे पाडले हे सोईस्कर विसरून जातात.

डॉ. आंबेडकर हे बंगालमधून घटना परिषदेवर निवडून आल्यामुळे

पाकिस्तान राष्ट्राची निर्मिती झाल्याबरोबर त्यांचे सभासदत्व आपोआपच रद्द झाले. परंतू सुदैवाने डॉ मुकुंदराव जयकर हे मुंबई असेंब्लीतून घटना परिषदेवर निवडून गेले होते. त्यांनी आपल्या जागेचा राजिनामा दिल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी व्हॉयसरॉयचे सल्लागार मंडळ, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल यामध्ये सल्लागार व मंत्री म्हणून जो कर्तबगारी दाखविली होती त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरूंनी मुंबई विधानसभेत डॉ. आंबेडकांची निवड केली. व डॉ. आंबेडकर पुनःश्च घटना परिषदेचे सभासद म्हणून निवडून आले. त्यानंतर विद्यमान भारतीय घटना तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडली. डॉ. आंबेडकरांनी जगातील लोकशाहीवादी राष्ट्रांच्या घटनांचा कसून अभ्यास केला. हिंदुस्थानातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, वर्गभेद, वर्णभेद यांचा बारकाईने अभ्यास केला. आणि घटनेचा मसुदा तयार केला. त्यावर वर्षभर चर्चा होऊन जरूर त्या दुरुस्त्या करून हिंदुस्थानची घटना तयार झाली. आणि डॉ. आंबेडकर त्या घटनेचे शिल्पकार ठरले.

डॉ. आंबेडकरांची एक फार मोठी मनीषा होती की आपण विधिमंत्री आहोत तो पर्यंत हिंदूकोड बिल पास करून घ्यावे म्हणून त्यांनी हिंदू कोडाचा नव्याने मसुदा तयार केला. हिंदूकोडामध्ये जे नाना प्रकारचे भेद होते ते काढून सबंध हिंदूंना जात, पात, पथ विरहित एकच कायदा करावा हा त्यांचा मानस होता. पं. जवाहरलाल नेहरूंनी हिंदूकोडबिल लवकरात लवकर पास व्हावे म्हणून आपली इच्छा प्रदर्शित केली होती. आणि हिंदू कोडबिल पास झाले नाहीतर आपण पंतप्रधानकीचा राजिनामा देऊ असे आश्वासन दिले होते. परंतु दुर्दैवाने ही गोष्ट घडली नाही. फक्त हिंदू कोडातील विवाह व घटस्फोट हे बिल विचारासाठी पार्लमेंटपुढे आले त्याची जेमतेम ४ कलमे पास झाली आणि ते बील

गाढून टाकण्यात आले. हे बिल गाढल्यानंतर त्यांच्याबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात कोणी अश्रूही ढाळले नाहीत व कोणाला वाईटही वाटले नाही' याची खंत डॉ. आंबेडकरांना एकसारखी वाटत होती.

स्पृश्य समाजाने डॉ. आंबेडकरांनी ज्या ज्या चळवळी केल्या त्या चळवळींना पाठिंबा दिला असता तर आंबेडकरांनी कदाचित धर्मांतर केलेही नसते. चवदार तळ्याचा सत्याग्रह, अस्पृश्यांना राखीव जागा, काळाराम मंदिर प्रवेश, हिंदूकोड बिल या सगळ्यांना स्पृश्य समाजाने हुडसून खडसून विरोध केला आणि, डॉ. आंबेडकरांचे स्वप्न भंग पावले.

घटना कायदा १९५० साली अमलात आल्यानंतर आणि हिंदु बिलाची वासलात लागल्यानंतर डॉ. आंबेडकर मंत्रिमंडळातून बाहेर पडले आणि त्यांनी पार्लमेंटच्या अगर राज्यसभेच्या निवडणुका लढविण्याचा प्रयत्न केला परंतु संयुक्त मतदार संघ प्रत्येक ठिकाणी आड आल्यामुळे डॉ. आंबेडकरांपेक्षा कमी कुवतीची माणसं निवडून आली आणि डॉक्टरांना पराभवावर पराभव पत्करावे लागले.

डॉ. आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार म्हणून आपण त्यांचा गौरव करतो. आधुनिक मनू म्हणून त्यांना वंदन करतो. परंतु डॉ. आंबेडकरांची बुद्धिमत्ता त्यांचं पांडित्य, त्याचे व्यक्तिमत्व, त्यांच कर्तृत्व हे निवडणुकीच्या राजकारणात माती-मोल ठरलं ही भारताच्या राजकारणातील एक शोकांतिका आहे.

१९३५ साली येवले येथे धर्मांतराची घोषणा केल्यानंतर मधला काळ त्यांचा राजकीय उलाढालीत गेला. १९५० सालापासून पुढे त्यांना बोद्ध धर्माचा सखोल अभ्यास केला. हिंदू समाजाच्या मनो

वृत्तीमध्ये काही फरक पडत नसल्यामुळे त्यांनी धर्मांतराची केलेली घोषणा अंमलात आणण्याचे ठरविले ' बुद्ध आणि त्याचा धम्म ' हा ग्रंथ लिहून त्यांनी १२०० वर्षांपूर्वी परागंदा झालेला बौद्ध धर्म परत हिंदुस्थानात आणला आणि १९५६ च्या ऑक्टोबरमध्ये आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. बौद्ध धर्मामध्ये समता, स्वातंत्र्य आणि बंधूता या तीन गोष्टी प्रामुख्याने त्यांना आढळून आल्या.

अपरिमित स्वातंत्र्याला समतेमुळे बाध येतो आणि सदासर्वकाळ समता पहात गेलो तर स्वातंत्र्याला बाध येतो म्हणून दोन्हींवर अंकुश ठेवण्यासाठी बंधुभावाची आत्यंतिक जरूरी आहे. हा बंधुभाव म्हणजे मानवता अशी डॉ. आंबेडकरांची श्रद्धा होती. ज्या धर्मामध्ये मानवतेला स्थान आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आहे. संघटना स्वातंत्र्य आहे परंतू अंध:श्रद्धा नाही. अशाप्रकारचा बौद्ध धर्म हा एकमेव धर्म असून हिंदू संस्कृतीशी जुळता-मिळता आहे. बुद्ध धर्म चायना, जपान, लाओस, कंबोडिया, व्हिएतनाम, ब्रह्मदेश, तिबेट, सिलोन या देशांमध्ये गेलेला होता. त्याचा हिंदुस्थानमध्ये शंकराचार्यांच्या आक्रमणामुळे मागमूसही राहिलेला नव्हता. अशा प्रकारचा हा थोर धर्म मी परत हिंदुस्थानात आणला आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे.

डॉ. आंबेडकर यांनी येवल्याच्या सभेत भाषण केले होते की मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. आणि हे शब्द त्यांनी अखेरपक्षी खरे करून दाखविले. कारण बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांतच त्यांचं महानिर्वाण झालं आणि अस्पृष्य समाज एका थोर नेत्याला व भारत आपल्या सुपुत्राला मुकला.

आंबेडकरांच्या कालातच सामाजिक क्रांतीसंबंधी आणखी दोन

प्रयत्न झाले होते. त्याचाही उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर रत्नागिरीस नजरकैदेत असताना त्यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या दृष्टीने धडाडीने काम केले होते. पण त्यांचा हेतू काहीसा राजकीय होता. मोर्ले मिंटो सुधारणांपासून ते १९३५ च्या घटना कायद्यापर्यंत राजकीय हक्कांबाबत लोक-संख्येचे प्रमाण हे महत्वाचे ठरले होते. म्हणून हिंदूंची संख्या जेवढी ज्यास्त त्या प्रमाणात राजकीय हक्क प्राप्त होणार होते. म्हणून मानवतावादी दृष्टीपेक्षा राजकीय दृष्टीनेच सावरकरांनी हे प्रयत्न चालविले होते. असे त्यांच्या बाबतीत म्हणता येईल.

महाराष्ट्रातल्या सामाजिक क्रांतीच्या चळवळीचा विचार करता अस्पृश्यांच्या शिवाय आदिवासींची एक जात ठाणे, नाशिक, पुणे, कुलाबा वगैरे ठिकाणी आहे. सावकारीखाली पिचलेली कुटुंबाची कुटुंबे या जातीत आहेत. त्यांच्या जमिनी सावकारांनी गिळंकृत केलेल्या आहेत. त्यांना घरगडी म्हणून अर्धपोटी जन्मभर साव-कारांच्यात काम करावे लागते. या मृतवत झालेल्या समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करण्याची कामगिरी कै शामराव परुळेकर, गोदावरी परुळेकर व कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते यांनी केली. आणि वारल्यांनी जो सावकारांच्या, जमीनदारांच्या विरुद्ध जो उठाव केला त्याला सामाजिक चळवळीच्या इतिहासात 'वारल्यांचे बंड' या अर्थाने संबोधले जाते.

डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर काही वर्षांनी मुल्ला आणि मौलवी यांच्या कब्ज्यात असलेल्या मुसलमान समाजाला सुधार-णेचे वारे लागावे, त्यांच्यात असलेली तलाक पद्धत नाहीशी व्हावी, त्यांना सवतबंदी कायदा लागू करावा या दृष्टीने आणि मुसलमानातील अंधश्रद्धा नाहीशी होऊन भारतनिष्ठा त्यांच्या-मध्ये बिंबावी व पाकिस्तानचा ओढा कमी व्हावा या दृष्टीने

पै. हमिद दलवाई आणि त्यांचे मोजकेच साथीदार यांनी जे प्रयत्न केले ते गौरवास्पद आहेत.

त्याचप्रमाणे डॉ. बाबा आढाव त्यांच्या म. फुले प्रतिष्ठान या संस्थेतर्फे व दलित पँथरचे सामाजिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने चाललेले प्रयत्न यांच्यासंबंधी विस्तारपूर्वक बोलण्याची इच्छा असूनही त्यांचा गौरवपूर्वक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही.

गेले दोन दिवस आपण महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे या विषयावर माझी दोन व्याख्याने ऐकली. गेल्या दीडशेवर्षांमध्ये पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे पाश्चात्य संस्कृतीशी आपला घनिष्ट संबंध आला. पाश्चात्य संस्कृतीबरोबर नवे विचार, नवे आचार आले. आपला धर्म, आपल्या चालीरीती, आपल्यातील जातिप्रधान व्यवस्था, त्यात असलेले दोष, बाल विधवा, जरठ-कुमारी विवाह, विधवा विवाहाचा निषेध, स्त्री शिक्षण वगैरे नवे विचार नव्या शिक्षणाबरोबर आले. सामाजिक समता प्रस्थापित व्हावी, बंधुभाव निर्माण व्हावा, स्त्रियांना शिक्षण मिळावं, अस्पृश्यांचा उद्धार व्हावा, उच्चनीचपणा नाहीसा व्हावा, माणसा-माणसात कोणताही भेद असू नये. या बाबतीत महाराष्ट्रातील आंग्लविद्याविभूषित पुरोगामी विचारवंत आणि कर्ते सुधारक यांनी चळवळी सुरू केल्या. काल व्याख्यानाचा समारोप करतांना सामाजिक क्रांतीच्या पहिल्या टप्प्याला मी ' झुळूक ' व दुसऱ्या टप्प्याला ' झंझावात ' असे नाव दिले. आजच्या व्याख्यानात तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्याबद्दलची माहिती मी सांगितली आहे. महात्म फुल्यांच्या निधनानंतर सामाजिक क्रांतीची मशाल छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या हाती घेतली. आणि सतत २८ वर्षे प्रतिगामी शक्ती व सनातनी व्यक्ती यांच्याशी अखंडपणे

झगडा करीत ती तेवत ठेवली. महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, धार्मिक वर्चस्वातून त्यांची मुक्तता व्हावी, अस्पृश्यता निवारण व्हावे यासाठी हे कार्य करीत असतांना महाराजांच्यावर वृत्तपत्रांतून व सभासंमेलनांतून शिविगाळ करण्याचे, तंबी देण्याचे प्रयत्न झाले. एवढेच नव्हेतर त्यांच्यावर बाँब फेकून ठार मारण्याच्या योजनाही आखल्या होत्या. स्वतःला देशाचे पुढारी म्हणवणारी मंडळी या कटात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या भाग घेत होती. म्हणून या काळाला मी 'वादळ' असे नांव देतो.

महाराजांच्या मृत्यूनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे सामाजिक क्रांतीचे नेतृत्व गेले. त्यांनी हिंदुसमाजाला जागे करण्याचे अनेकवार प्रयत्न केले. परंतु हिंदुसमाजाला डॉ. आंबेडकरांचे महत्त्व अजिबात पटले नाही. डॉ. आंबेडकरांच्याकडे नेतृत्व गेल्यानंतर अस्पृश्य समाज एका बाजूला व स्पृश्य समाज दुसऱ्या बाजूला असा झगडा १९२४ सालापासून ते १९५६ सालअखेर तीव्रतेने चालू होता. सामाजिक समतेची चळवळ करीत असता. डॉ. आंबेडकरांना व त्यांच्या अनुयायांना लाठ्यांचा, काठ्यांचा व दगडांचा मार अनेकवेळा खावा लागला. एवढेच नव्हे तर त्यांना जहरी टीकेच्या अग्निदिव्यातून जावे लागले. अखेरपक्षी भारतीय घटनेचा शिल्पकार म्हणून त्यांचा गौरव झाला असला तरी सुद्धा म. गांधी सारखे थोर पुढारी त्यांचे विरोधात उभे राहिली म्हणून त्यांनी दिलेल्या लढ्याचे वर्णन करावयाचे झाल्यास त्याला 'तुफान' हीच संज्ञा योग्य ठरेल.

[illegible]ल्या दोन व्याख्यानांचा आढावा घेता १८१८ ते १८४८ हा [illegible]क कालखंड, बाळशास्त्री जांभेकर त्याचे प्रतिनिधी, आणि [illegible]ाच्याचे नाव 'झुळूक.' दुसरा कालखंड १८४८ ते १८९४ या कालखंडाचे प्रतिनिधी म. जोतिबा फुले. फुल्यानी हाती घेतलेले

कार्य पहाता त्याला ' झंझावात ' ही संज्ञा योग्य ठरेल. वर नमूद केल्याप्रमाणे तिसऱ्या व चौथ्या कालखंडाचे प्रतिनिधित्व अनुक्रमे छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले असल्यामुळे या दोघांही थोर पुरुषांना ज्या प्रतिकूल परिस्थितीतून जावे लागले. ते पाहिले तर या दोन कालखंडाना अनुक्रमे ' वादळ ' आणि ' तुफान ' यांच संज्ञा सर्वस्वी उचित ठरतील.

उद्या यशवंतरावजी चव्हाण यांचा वाढदिवस आहे. या शुभमंगल प्रसंगी माझी ही दोन व्याख्याने मी त्यांना अर्पण करतो आणि गेले दोन दिवस माझी व्याख्याने तुम्ही शांतपणाने ऐकली याबद्दल आपणा सर्वांचे व मला व्याख्यानासाठी निमंत्रण दिले याबद्दल नगराध्यक्षांचे आभार मानून मी आपली रजा घेतो.

पांडुरंग बापूजी साळुंखे



# 'भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन !'

डॉ. सत्यरंजन साठे

आपल्या देशाची राज्यघटना उधारउसनवारीवर आधारलेली नसून तिच्यामागे इतिहास आहे. राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबरच भारतात सामाजिक परिवर्तनही घडत होते. व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षता ही मूल्ये म्हणजे सामाजिक परिवर्तनाचा आधार होत. आपली राज्यघटनाही भारतीय जनतेच्या आशा-आकांक्षा आणि अपेक्षा यांतूनच आकाराला आलेली आहे. ही मूलभूत तत्त्वे कायम ठेवून मग घटनेत कितीही दुरुस्त्या झाल्या तरी बिचकण्याचे कारण नाही.

भारताने तांत्रिक औद्योगिक प्रगती साधली असली तरी त्याला अभिप्रेत सामाजिक, आर्थिक क्रांती झाली नाही. राजकारणात संधिसाधुपणा, पक्षांतर, जातिभेद यांचे वर्चस्व वाढले, लोकशाही मूल्यांविषयी निष्ठा कमी झाली, भ्रष्टाचार वाढला, आर्थिक विषमता वाढली. अंध:श्रद्धा फोफावल्या, दैववाद बळावला. आचारात आधुनिकता आली पण विचार मागासलेलेच राहिले. कायद्यांचे नियोजन नसल्याने ते कागदावरच राहिले.

न्यायालये, संसद, वृत्तपत्रे या संस्था प्रभावीपणे कार्यान्वित व्हावयाच्या असतील तर त्यांच्यावर लोकमताचा अंकूश हवा. याकरिता लोकशाहीचा खरा आधार म्हणजे सामान्य नागरीक त्याला राज्यघटनेतील मूल्यांबाबत जिव्हाळा वाटला पाहिजे. त्याला जागृत करण्यासाठी लोकशिक्षणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे.

**डॉ. सत्यरंजन साठे**

प्राचार्य, लॉ कॉलेज, पुणे.

शिक्षण : बी. ए. एल्. एल्. बी व एल्. एल्. एम्. (पुणे विद्यापीठ)

१९६४ मध्ये रेमंड इंटरनॅशनल फेलोशिप मिळाली व अमेरिकेतील नॉर्थ वेस्टर्न विद्यापीठात शिकागो येथे अध्ययन. कायद्यातील सर्वोच्च पदवी एस्. जे. डी – डॉक्टर इन् ज्युरिडिकल सायन्स – संपादन केली. ( तौलनिक घटनात्मक कायद्यांवरील प्रबंध )

देशी व परदेशी कायदेविषयक व इतर नियतकालिकांमधून जवळ जवळ तीस संशोधन लेख प्रसिद्ध. दोन ग्रंथही प्रसिद्ध. त्यापैकी एकाची ' Administrative Law ' तिसरी आवृत्ती प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

बनारस हिंदू विश्वविद्यालयात एक वर्ष अध्यापन. इंडियन लॉ इन्स्टिटयूट, नवी दिल्ली येथे, २ वर्षे संशोधन अधिकारी म्हणून अनुभव.

१९६० मध्ये मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर विभागात व्याख्याता म्हणून नेमणूक. १९६६ मध्ये त्याच विद्यापीठात प्रपाठक (Reader) ह्या जागेवर नेमणूक. १९७६ मध्ये इंडियन लॉ सोसायटीच्या पुण्याच्या लॉ कॉलेजचे प्राचार्य म्हणून नेमणूक. गेल्या १८ वर्षात ८ पीएच्. डी. प्रबंधांचे यशस्वीरित्या मार्गदर्शन.

मराठीतून ' समाज प्रबोधन पत्रिका, ' महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, केसरी यांतून लेखन. सध्या वाई येथील मराठी विश्वकोश मंडळात कायदेशास्त्रातले एक अभ्यागत संपादक व इंडियन इन्स्टिटयूट ऑफ् एज्युकेशनमधील मानद प्राध्यापक (Honorary Professor).

सत्यरंजन साठे

पत्ता :

प्राचार्य निवास

लॉ कॉलेज आवार, एरंडवणा, पुणे–४११००४

अध्यक्ष महाराज, कऱ्हाडचे मित्र, नगरपालिकेचे इतर सभासद! यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेकरता मला ज्या वेळेला श्री. विठ्ठल पाटील आमंत्रण द्यायला आले; त्या वेळी त्या आमंत्रणाचा स्वीकार करताना, ज्या कऱ्हाड गावात या महाराष्ट्र राज्याचा शिल्पकार जन्मला ते कऱ्हाड गाव पाहण्याची उत्सुकता होती. मी यशवंतरावांना महाराष्ट्र राज्याचा शिल्पकार म्हणालो याचं कारण ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होत. आणि या महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात ज्या अनेकांचा हात लागला त्यांच्यात त्यांचा हात अतिशय समर्थपणे लागलेला आहे हे काही नाकारण्यात अर्थ नाही. पण याच्या पेक्षा महत्त्वाचं असं की यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना वैचारिक क्रांतीलाही चालना दिली. महाराष्ट्रातील वैचारिक क्रांतीचे ते प्रवर्तक आहेत असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. आणि प्रश्न आला की मी विषय कोणता निवडावा ? यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाबाबत बोलायचा मला अधिकार नाही. कारण तो माझा विषय नाही. राजकारणात अनेक गोष्टी होतात. यश मिळतं अपयश मिळतं. मी यशवंतराव चव्हाणांचा एक विचारवंत म्हणून इथे उल्लेख करतो आहे.

लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही तीन मूल्ये सामाजिक परिवर्तनाचा आधार होत. आणि यशवंतराव मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी इथल्या वैचारिक क्रांतीला जी चालना दिली त्याच्यात हे तीन विचार अतिशय प्रमुखपणे लोकांच्यापुढे आले–त्या मूल्यांसाठी आवश्यक असणाऱ्या सामाजिक परिवर्तनावरच बोलावे म्हणून मी हा आजचा विषय निवडला. आता हा विषय

निवडताना माझ्या पुढे एक अडचण अशी होती की 'राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन' हा मथळा तसा मोठा आकर्षक नाही. राज्यघटना हा विषय तसा क्लिष्ट वाटतो लोकांना. लॉ कॉलेज मधील विद्यार्थी सुद्धा वर्गात येत नाहीत तर मग बाहेरचे तरी का येतील? असा प्रश्न माझ्यापुढे होता. मी कायद्याचा एक प्राध्यापक असल्यामुळे आगि या विषयाचे अध्ययन व अध्यापन करीत असताना मला असं वाटल की ज्या घटनेची सुरवातच मुळी We the Peopel of India या अक्षराने होते - म्हणजे आम्ही भारताचे नागरिक आम्ही स्वतःला ही राज्यघटना देतो आहोत - हे संविधान भारताच्या लोकांनी केलेलं आहे - हे काही वकिलांनी केलेलं नाही. काही न्यायाधीशांनी केलेलं नाही - विद्यापीठातील विद्वान प्राध्यापकांनी केलेलं नाही किंवा त्यांच्यासाठी ते नाही - तर या भारतातला सामान्य माणूस जो आहे त्या सामान्य माणसासाठी हे संविधान आहे. ही राज्यघटना आहे. आणि म्हणून या राज्यघटनेमध्ये जी मूल्ये आहेत, जे विचार आहेत ते सामान्य माणसापर्यंत जर नेले तरच ही घटना मजबूत होते. नाहीतर या घटनेला काही अर्थ रहात नाही. एक गोष्ट आपल्याला सांगण्यासारखी म्हणजे अशी की नुकतेच आपण १९७७ साली एका अतिशय बिकट अशा परिस्थितीतून बाहेर आलो. १९७५ ते ७७ हा काळ आणिबाणीचा आणि या आणिबाणीच्या काळामध्ये जर सगळ्यात कोणती गोष्ट झाली असेल तर ती ही की या घटनेमध्ये अनेक दुरुस्त्या झालेल्या आहेत. आणि या घटनेवर प्रेम असणाऱ्या लोकांना असे वाटायला लागले की या घटनेची मोडतोड फार मोठ्या प्रमाणात होत आहे. त्या परिस्थितीतही त्या घटना - दुरुस्तीविरुद्ध लोकमत तयार करण्याचा प्रयत्न झाला. परंतु पुन्हा जर लोकशाही धोक्यात यायची नसेल तर आपणाला ही राज्यघटना सामान्य माणसापर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे आहे. या राज्यघटनेत ही जी मूल्ये आहेत त्या मूल्यांबाबत सामान्य माण-

साला काहीतरी जिव्हाळा वाटला पाहिजे. त्याला ही मूल्ये आपली आहेत असे वाटले पाहिजे. याच्यासाठी एक खास लोकशिक्षणाचा कार्यक्रम – जो गेली ३० वर्षे कोणी घेतला नाही – तो घ्यायला पाहिजे. याची जाणीव आणिबाणीच्या काळात झाली. कारण आणिबाणीचा काळ असा होता की त्यावेळेला भाषण स्वातंत्र्य हे संपूर्ण नष्ट झालं होतं. आज आपण इतक्या मोकळेपणानं इथं बोलू शकतो. आणिबाणीच्या काळात इतक्या मोकळेपणाने बोलता आले नसते. पण त्या कालात छोट्या छोट्या सभा होत होत्या. त्या सभांना बरेच लोक जमत आणि त्यावेळेला असं वाटलं की हा जो सामान्य माणूस आहे. याला याच्यात काहीतरी रस आहे. याच्यापर्यंत हा विषय घेऊन जाण्याची आवश्यकता आहे. आणि म्हणून हे लोकशिक्षणाचे कार्य आणिबाणी गेल्यानंतर थांबता कामा नये ते सतत चालू राहायला पाहिजे. कारण ही लोकशाही – म्हणजेच ही राज्यघटना – कारण लोकशाही राज्यघटनेवर आधारित आहे. ती जर मजबूत व्हायची असेल तर त्या राज्यघटनेचा खरा आधार सामान्य माणूस हाच आहे.

न्यायालये, संसद या संस्था अतिशय प्रभावीपणे कार्यान्वित व्हायच्या असतील तर त्यांच्यावर लोकमताचा अंकुश असायला हवा. असे प्रभावी लोकमत नसेल तर न्यायालये लोकशाहीचे रक्षण करू शकणार नाही. संसद ही लोकशाहीच रक्षण करू शकणार नाही. आता हे लोकमत तयार करणं आणि या घटनेच्या बाजूनं हे लोकमत उभं करणं याच्यासाठी मला असं वाटतं की सतत परिश्रम करण्याची आवश्यकता आहे. आणि म्हणून या वेळी या व्याख्यानमालेचं आमंत्रण मी स्वीकारलं त्यावेळी मी याना हा विषय दिला. याच कारण मला असं वाटलं की केवळ वर्गांच्या चार भिंतीमध्ये हा विषय डांबून ठेवता येणार नाही. केवळ पदवीसाठी येणाऱ्या लोकांसाठी हा विषय नाही. तर हा विषय सामान्य माणसाचा आहे. त्याला या विषयामध्ये रस

निर्माण करायला पाहिजे. त्याला या विषयातलं काहीतरी सांगायला पाहिजे. तेव्हा ही राज्यघटना आहे तरी काय ? या राज्य घटनेला काय अभिप्रेत आहे ? आणि का म्हणून ही राज्यघटना आपण पवित्र मानायची ? राज्यघटनेची मोडतोड झाली तर काय बिघडलं ? हे जे प्रश्न आहेत या प्रश्नांची उत्तरं सामान्य माणसाला देता यावीत म्हणून या राज्यघटनेबद्दल काहीतरी सारख बोलत रहाणं आवश्यक आहे आणि मग असं वाटतं की यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेसाठी हा विषय अतिशय योग्य होईल. कारण यशवंतरावांची लोकशाहीवरची निष्ठा वादातीत आहे. समाजवादावरची त्यांची निष्ठा वादातीत आहे. आणि धर्मनिरपेक्षता, जातिविरहित राजकारण याच्यावरचीही त्यांची निष्ठा वादातीत आहे. आणि म्हणून यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेच्या निमित्तानं हा विषय आपल्यापुढे मांडण्यासाठी आलो आहे.

या व्याख्यानाची सुरुवात करावयाच्या पूर्वी मला एक गोष्ट सांगावयाची आहे की भारताची राज्यघटना ही एका पुस्तकात लिहिली आहे. त्याच्यात ३९५ च्या वर कलमे आहेत. त्याला जोडलेले अनेक शेडयूल्स् आहेत. पण ही राज्यघटना जी आहे ती फक्त या ३९५ कलमांत समजायची नाही. कारण ही राज्यघटना जर समजून घ्यावयाची असेल तर – एक राजकीय, सामाजिक असा संदर्भ त्याला आहे – तो राजकीय आणि सामाजिक संदर्भ समजल्याशिवाय ही राज्यघटना समजून येणार नाही. कुठलाही देश जेव्हा एखादी राज्यघटना घेतो तेव्हा ते नुसतं बाजारात जाऊन एखादी वस्तू आणण्यासारखं होत नाही. आपल्या राज्यघटनेबद्दल एक आक्षेप नेहमी असा घेण्यात येतो. राज्यशास्त्राचे प्राध्यापक किंवा घटनाशास्त्राचे प्राध्यापक सुद्धा एकळदा असं सांगतात की ही राज्यघटना परदेशाची नक्कल आहे.

ाच्यात भारतीयत्व नाही. याच्यात इंग्लंडसारखी संसदीय लोक-
ाही आहे, आस्ट्रेलिया सारखं संघ राज्याचे तत्त्व आहे, अमेरिके
ारखी न्यायालयीन पुनार्वलोकनाची यंत्रणा आहे, आयर्लंडसारखं
ाच्यात डायरेक्टीव्ह प्रिन्सिपल्स् (मार्गदर्शक तत्त्वे) आहेत.
शा अनेक देशाच्या तरतुदी एकत्र गोळा केल्या आणि या घटनेत
कत्र टाकून ही घटना तयार झालेली आहे. म्हणजे असं की
ारताचे घटनाकार जणू काही जगाच्या बाजारात हिंडत होते,
ाणि हिंडता हिंडताना चांगल्या गोष्टी ज्या ज्या दुकानात
मळतील तिथून त्यांनी त्या खरेदी केल्या आणि त्याचं असेंब्लिंग
याला म्हणतात ते फक्त भारतात केलं. आता या विचारामध्ये
क दोष असा आहे, की इंपोर्टेड वस्तू बाकीच्या आणता येतील
ारण त्या आपणाला वापरता येतात. पण कायदा हा खऱ्या
र्थाने कधी इंपोर्टेड असू शकत नाही. राज्यघटना त्याचा अर्थ
ाय? राज्यघटनेमध्ये काय असतं? आपलं शासन कसं असाव?
ापल्या शासनावर काय मर्यादा असाव्यात? आपलं शासन
ुठल्या पद्धतीनं चालावं? शासनाने व्यक्तीचे कुठले अधिकार मान्य
रावेत? अनेक प्रश्न संविधानात किंवा राज्यघटनेत सोडविलेले
सतात. आता हे प्रश्न मूलभूत आहेत कुठल्याही समाजाच्या
ृष्टीने की हे जर प्रश्न सोडवावयाचे झाले तर त्याची उत्तरे त्या
माजाच्या अनुभवांतूनच यावी लागतात. ती केवळ बाहेरच्या
शांनी काय चांगलं घेतलं आहे याच्यावरून येऊ शकत नाही.
ाणि म्हणून जे लोक असं म्हणतात की राज्यघटना ही फक्त
नेक देशाच्या चांगल्या तरतुदी एकत्र गोळा करून केलेली
ोधडी आहे, त्यांना असं उत्तर द्यावं लागेल की या राज्यघटने-
्या तरतुदींचा जर आपण विचार केला आणि त्या त्या
रतुदींचा भारताच्या स्वातंत्र्य लढ्याशी संबंध लावला तर
ापल्याला असं दिसतं की ही राज्यघटना भारताच्या जनतेच्या
ाकांक्षा आणि अपेक्षा यातून निर्माण झालेली आहे. उदा. संसदीय

लोकशाही पद्धत इंग्रजांच्या राज्यापासून या देशात कार्यान्वित झाली. इंग्रजांनी इथे अनेक वाईटही गोष्टी केल्या पण त्यांनी काही चांगल्याही गोष्टी केल्या. त्यांनी एक चांगली गोष्ट केली ती ही या देशाला एकराष्ट्रीयत्व दिले – जे इंग्रजी काळाच्या पूर्वी कधीही नव्हतं. सबंध भारत देश एकराष्ट्रीयत्वाने जोडला गेला आणि इथं एक कायदे पद्धती राबविली गेली. आता ही एक कायदेपद्धती ज्यावेळी राबविली गेली त्यावेळी त्यांनी इथं कायदेमंडळं काढली, इथं न्यायालयं स्थापन केली आणि हे करत असताना त्यांनी इथं संसदीय लोकशाही आणली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सगळ्यात जो पक्ष अतिशय प्रखरपणे लढला तो म्हणजे काँग्रेसपक्ष. त्या काँग्रेस पक्षात अनेक विचाराचे लोक एकत्र असत. डावे होते, उजवे होते. आणि या सगळ्यांना एकत्र घेऊन स्वातंत्र्यासाठी लढा उभारण्यात आला. तेव्हा हा काँग्रेस पक्ष ज्या ज्या वेळेला राजकारणात किंवा राज्य करण्यामध्ये सहभागी झाला तेव्हा या संसदीय लोकशाही पद्धतीत सहभागी झालेला आहे. आता ज्या वेळी नवीन घटना झाली त्यावेळी हा सगळा अनुभव लक्षात घेता संसदीय लोकशाही पद्धत हीच पुढे चालू ठेवावी असे ठरले. स्वातंत्र्य कशासाठी ? स्वातंत्र्य म्हणजे फक्त इंग्रजांना घालवणं एवढंच स्वातंत्र्य चळवळीचं उद्दिष्ट कधीही नव्हत. नेहरूंच्या आत्मचरित्रात त्यांना एक प्रश्न विचारला आहे. की स्वातंत्र्य म्हणजे काय? त्याला त्यांनी असं उत्तर दिलं की स्वातंत्र्य म्हणजे गोऱ्यां माणसाच्या राज्याऐवजी गहूवर्णीय माणसाचं राज्य येणं येवढेच नाही. तर स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक न्यायावर अधिष्ठित असा नवा समाज घडवणं. येथे स्वातंत्र्य पाहिजे होतं कारण आमची अशी एक खात्री होती की इथली गरिबी, इथलं अज्ञान, इथली पिळवणूक. परक्याचं राज्य जोपर्यंत आहे तोपर्यंत येथून जाऊ शकत नाही. त्यामुळे इथली गरिबी, इथली पिळवणूक, इथलं शोषण हे सगळं जाण्यासाठी पहिल्यांदा आम्हांला आमचं स्वतःचं

राज्य इथं निर्माण व्हायला पाहिजे.

आपण राजकीय स्वातंत्र्य म्हणतो त्याची तर आवश्यकता होतीच. पण केवळ राजकीय स्वातंत्र्याने हा प्रश्न सुटणारा नव्हता. हा समाज बदलायचा जर असला तर त्या समाजाला अनेक जुन्या रूढींपासून, जुन्या पद्धतींपासून मुक्त करण्याची आवश्यकता होती. समाजात फार मोठं परिवर्तन घडवून आणायचं आणि ते घडलं तरच खरे स्वातंत्र्य येईल अशी भारताच्या नेत्यांची श्रद्धा होती म्हणून कॉंग्रेस पक्ष ज्या ज्या वेळेला भारताच्या स्वातंत्र्याचा विचार करत असे त्या वेळेला तो फक्त इंग्रज जाण्याची गोष्ट विचारात घेत नसे. तर इंग्रज गेल्यानंतर इथला भारतीय समाज कसा असेल याचं एक चित्र आपल्या डोळ्यासमोर ठेवत असे. नवीन भारतीय समाज घडावा म्हणून हे स्वातंत्र्य मिळवायचं अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणजे सामाजिक परिवर्तन हे एक उद्दिष्ट होतं. स्वातंत्र्य तर पाहिजेच पण स्वातंत्र्य आणि सामाजिक परिवर्तन या दोन गोष्टी त्यांनी अभेद्य अशा मानल्या होत्या. एकमेकाला पूरक अशा मानल्या होत्या. आणि म्हणून इथं व्यक्तीचं स्वातंत्र्य हे मूल्य त्यांनी मान्य केलं, सामाजिक न्याय हे मूल्य त्यांनी मान्य केलं, इंग्रजांच्या राज्यात गोऱ्या लोकांना आणि काळ्या लोकांना निरनिराळी वागणूक दिली जात असे. इथे भारतात स्वातंत्र्य ज्या वेळी येईल त्यावेळी सगळ्यांना समान वागणूक मिळावी हे एक उद्दीष्ट समोर होते. आणि त्याच्याच बरोबर व्यक्ति स्वातंत्र्य हे मूल्य आम्ही मानलं. खरं सांगायचं तर ही व्यक्तिस्वातंत्र्याची चळवळ आणि स्वातंत्र्याची चळवळ यादोन चळवळी हातात हात घालून पुढं जात आहेत असं आपणाला दिसतं.

लो. टिळक यांच्यावर राजद्रोहाचा खटला ज्यावेळी झाला त्या

वेळी लो. टिळकांनी कोर्टात जे सांगितलं ते असं की, मी राजद्रोह केलेला नाही. कारण सरकारवर योग्य अशी टीका करणं हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य आहे. त्यांनी इंग्रजी न्यायाधिशाला प्रश्न विचारला की तुमच्या देशात तुम्ही तुमच्या नागरिकांना तुमच्या सरकारवर टीका करू देता की नाही? जर तुम्ही तुमच्या नागरिकांना ते स्वातंत्र्य देत असालं तर आम्हांलाही ते स्वातंत्र्य पाहिजे. म्हणजे टिळकांचा राज्यद्रोहाचा खटला ही एक भाषणस्वातंत्र्यासाठी सुद्धा चळवळ होती.

ॲनी बेझंट यांनी १८९५ च्या काँग्रेसमध्ये एक ठराव आणला होता. तो ठराव मूलभूत हक्कांच्या रक्षणाचा होता. १८९५ पासून काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात या मूलभूत स्वातंत्र्या बद्दलचा ठराव सारखा येत राहिलेला आहे. १९२८ साली मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली होती. तीत मोतीलाल नेहरू होते, सप्रू होते आणि जवाहरलाल नेहरू हे त्या समितीचे चिटणीस होते. या समितीने ज्या शिफारशी केल्या त्यांच्यात सगळ्यात अग्रक्रम असणारी शिफारस म्हणजे या देशाची नवीन घटना ज्या वेळी होईल त्या वेळी त्या घटनेमध्ये मूलभूत हक्क मान्य व्हावेत. याला दुसरी एक बाजू आहे. भारताच्या स्वातंत्र्यामध्ये एक अडचण हिंदु-मुसलमान संघर्षाची होती. मुसलमानांचे नेतृत्व करणारे जिना हे स्वतंत्र राष्ट्राची मागणी करत होते. आणि काँग्रेसचे पुढारी त्याला असे उत्तर देत होते की हिंदु आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे होऊ शकत नाहीत. तर एका राष्ट्रातच या दोन्ही जमाती राहू शकतील आणि ते जर व्हायचं असेल तर इथं धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण व्हायला पाहिजे. मूलभूत अधिकारांत त्यावेळी धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व समाविष्ट होते. १९३१ मध्ये कराची येथे काँग्रेसचे अधिवेशन भरलेले होते आणि त्या अधिवेशनात

जवाहरलाल नेहरूंनी मूलभूत हक्काचा एक ठराव मांडला. तो ठराव जर आपण वाचून पाहिला तर आपल्याला असं दिसेल की त्या ठरावातील सर्वच्या सर्व तरतुदी भारताच्या राज्यघटनेत अंतर्भूत झालेल्या आहेत. हे मी सांगण्याचं कारण असं की आपली राज्यघटना उधार उसनवारीवर केलेली राज्यघटना नाहीच, तर तिच्यामागे एक इतिहास आहे. आणि या इतिहासाचा संदर्भ जर आपण सारखा लक्षात घेतला तर आपल्याला असं दिसतं की या घटनेच्या ज्या अतिशय महत्त्वाच्या अशा बाबी आहेत त्या सगळ्या आपल्या अनुभूतींतूनच निर्माण झालेल्या आहेत. संसदीय लोकशाही असो किंवा व्यक्तींचे मूलभूत अधिकार असो. त्याच्यामागे एक इतिहास होता आणि म्हणून या तरतुदी घटनेत आहेत. पण पुन्हा सांगायचं कारण असं की आणिबाणीमध्ये एक असा प्रचार सारखा करण्यात येत असे की काही मूठभर लोकांनाच फक्त या व्यक्तीस्वातंत्र्याची जरूरी असते. सामान्य माणसाला याची जरूरी नसते. तर त्याला उत्तर असं आहे की व्यक्तीस्वातंत्र्याची जरूर फक्त मूठभर बुद्धिवाद्यांना असते ही एक चुकीची समजूत आहे- प्रा. ग. प्र. प्रधान यांनी यावर एक पुस्तक लिहिलं आहे. “ भाकरी आणि स्वातंत्र्य ” त्यात त्यांनी अतिशय प्रभावितपणे दाखवून दिलेलं आहे की सामान्य माणसाला सुद्धा स्वातंत्र्याची जरूरी असते. कारण लोकशाही राज्यात आपला निषेध तुम्ही कसा दर्शविणार ? राज्यावर जर काही अंकुश ठेवायचा असेल तर तो अंकुश फक्त लोकमतातच असू शकेल. आणि ज्या राज्यात व्यक्तीस्वातंत्र्य नाही तिथं लोकमतसुद्धा असू शकत नाही. हुकूमशाहीत राज्यकर्ते म्हणतात तसेच लोक बोलत असतात. कारण त्यांना दुसरा कुठलाही विचार कधी ऐकायलाच मिळत नाही.

एक अशी गंमत सांगतात की एकदा दोन राष्ट्राचे प्रतिनिधी

भेटले. एक हुकूमशाही राष्ट्राचा होता व एक लोकशाही राष्ट्राचा होता. समजा की, भारत आणि पाकिस्तान यांचे प्रतिनिधी भेटले. तर भारताचा प्रतिनिधी अतिशय गर्वाने म्हणाला, की माझ्या राज्यात इतकं स्वातंत्र्य आहे की भारताचे लाडके पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे अतिशय चुकलेलं आहे असं कुठलाही नागरिक म्हणू शकतो. ( आणि आपल्याला माहित आहे की ते स्वातंत्र्य आपण पुष्कळदा घेतलं आहे. नेहरूंच्या चीन विषयक धोरणावर लोकांनी खूप टीका केली. आता ही गोष्ट दुसरी की नेहरूंचं राजकारण किंवा नेहरूंचं धोरण हे पुढच्या भविष्यात अतिशय योग्य होतं असं निर्वाळा आज जवळ जवळ सगळे देत आहेत. नेहरूंच्या धोरणावर अतिशय कडवे असे टीकाकार अटल बिहारजी आज जवळ जवळ नेहरूंच्याच धोरणांचा पाठ पुरावा करीत आहेत. तरी सुद्धा या देशामध्ये इथल्या पंतप्रधानावर टीका होऊ शकते. नेहरूंवर होत असे, शास्त्रीजींवर होत असे, आज मोरारजी देसाईवर होत आहे. आणि इंदिरा गांधीवरही १९६९ पासून १९७५ पर्यंत होत असे. १९७५ ते १९७७ ची टीका सर्वस्वी बंद झाली आणि म्हणूनच आम्ही असं म्हणतो त्यावेळी लोकशाहीचा संपूर्ण संकोच झाला.) तर हा भारताचा प्रतिनिधी अतिशय गर्वाने म्हणाला की आमच्या देशात इतकं स्वातंत्र्य आहे की आम्ही मोरारजी देसाई यांचं मत चुकीचं आहे. त्यांना काही कळत नाही. असं देखील म्हणू शकतो. त्यावर पाकिस्तानचा जो मुत्सद्दी होता तो लागलीच म्हणाला की त्यात काय आश्चर्य आहे ? माझ्या देशातही इतकंच स्वातंत्र्य आहे. पाकिस्तान मधला कुठलाही नागरिक उठून म्हणू शकतो की मोरारजी देसाई हे अगदी मूर्ख आहेत. त्यांना काही येत नाही. प्रश्न असा आहे की पाकिस्तानचा नागरिक हा पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांविरूद्ध फारसा बोलूच शकत नाही. आता आपल्याला दिसतंय की हुकूमशाही राष्ट्रांमध्ये सुद्धा काही वेळेला उद्रेक होतो आणि लोक बंड करून उठतात. इराणमध्ये

आपणास कळलं असेल. काल इराण मध्ये बायकांनी बुरखा घेतला पाहिजे असं जे एक फर्मान सुटलं आहे त्याच्या विरूद्ध अनेक बायकांनी निदर्शने केली. आणि बायकांवर सुद्धा छडीमार करावा लागलेला आहे. बायकांवर सुद्धा असे म्हणताना मी स्त्रियांना कुठल्याही तऱ्हेने कमी लेखत नाही. स्त्री पुरुष समान आणि संपूर्णपणे मानतो पण स्त्रियांचा मोर्चा एका हुकूमशाही राष्ट्रात सुद्धा निघू शकतो ही गोष्ट उल्लेखनीय आहे. तेव्हा इथे लोकशाही असावी आणि म्हणूनच हे मूलभूत अधिकार असावेत. कारण मूलभूत अधिकार असले म्हणजे तुम्हांला एका प्रश्नाच्या सर्व बाजू कळतात. नेहरूंच चुकलं म्हणणारे ही लोक असतात. नेहरूंच बरोबर आहे म्हणणारे ही लोक असतात. आणि मतदार जे असतात हे त्याच्यातून आपला निर्णय करत असतात. भारताचा मतदार आता दिवसे दिवस शहाणा होत चाललेला आहे. आपल्याला असं दिसून येईल की भारताच्या मतदारांवर आता राज्यकर्त्यांना पूर्वी सारखा विश्वास ठेवता येणार नाही. ते परंपरागत एकाच माणसाला निवडून देतील अशी परिस्थिती राहिलेली नाही. त्यामुळे भारतातला हा जो मतदार आहे याचं लोकशिक्षण कोठून झालं तर लोकशाहीमुळेच त्याचं शिक्षण झालेलं आहे. मतदानाचा अधिकार त्याला मिळाल्यामुळेच त्याचं हे शिक्षण होत आहे. तो सारखा घडतो आहे. ही फार महत्वाची गोष्ट आहे.

याचा इतिहास जर पाहिला तर ही जाणीव आपल्या स्वातंत्र्य चळवळीतून निर्माण झालेली आहे असे दिसेल. म. गांधींच्या राजकारणाचा एक सगळयात महत्त्वाचा पैलू हा आहे. गांधींच्या आधी अनेक पुढारी होते. गांधींच्या एवढा जनता संपर्क कुठल्याही पुढाऱ्याला कधी जमलेला नाही. गांधींच्या इतकं लोकांना गुंतवणं कुठल्याही पुढाऱ्यांना जमलेलं नाही कारण गांधीजी जी भाषा बोलत असत ती अतिशय सामान्य माणसाची भाषा होती. पोषाखापासून सामान्य माणसाशी असलेलं आपलं नातं सारख ते

सिद्ध करत असत, गांधींच्या चळवळीत स्त्रिया सुद्धा अतिशय मोठ्या प्रमाणात त्या पहिल्यांदा बाहेर पडल्या आणि या चळवळीत सामील झाल्या. तेव्हा गांधींची चळवळ ही भारताच्या लोकशाहीला समृद्ध करणारी अशी चळवळ होती. आणि त्या चळवळीतून जी मूल्ये बाहेर पडली त्याच्यातूनच हे व्यक्ती-स्वातंत्र्याचं मूल्य बाहेर पडलेलं आहे. अर्थात व्यक्तीस्वातंत्र्याचे मूल्य आपण ज्या वेळेला म्हणतो त्यावेळेला आपणाला हे मान्य करावयाला पाहिजे की स्वातंत्र्यावर नेहमीच मर्यादा असतात. स्वातंत्र्य भोगताना नेहमी आपल्याला काही जबाबदारीची जाणीवही लागते. स्वातंत्र्य म्हणजे मला तुम्हाला मारायचं स्वातंत्र्य नव्हे – तुम्हाला आता ऑडिअन्स मध्ये बसून माझ्यावर अंडी किंवा बटाटे फेकायचं स्वातंत्र्य याला आपण स्वातंत्र्य म्हणत नाही. व्यक्तीला त्याचं व्यक्तीमत्त्व फुलविण्यासाठी जे स्वातंत्र्य लागतं ते स्वातंत्र्य आपल्याला अभिप्रेत असतं. आणि ते स्वातंत्र्य हुकूमशाहीं राष्ट्रांत कधीही नसतं.

तरूण पिढीमध्ये मला असं नेहमी दिसतं की हुकूमशाहीबद्दल अतिशय प्रेम असतं. ते म्हणतात की लोकशाही पेक्षा कोणीतरी येथे डिक्टेटर आला आणि लोकांना सरळ केलं तर बरे होईल. त्यांना मी नेहमीच सांगतो की जगाच्या इतिहासात लोकांच्या कल्याणासाठी झटणारा डिक्टेटर अजून जन्माला आलेला नाही. प्रत्येक डिक्टेटरनी स्वतःच्या फायद्यासाठीच स्वतःची सत्ता वापरलेली आहे. कम्युनिस्ट डिक्टेटरशिप मध्ये सुद्धा. कम्युनिझम मध्ये लोक असे सांगत की एकदा लोकांच राज्य आलं की तिची पिळवणूक संपेल, शोषण संपेल आणि मार्क्सने असं लिहून ठेवल होत की तिथं मग सरकारची काही जरूरीच लागणार नाही. State Withers. पण परिस्थिती काय आहे ? सोव्हिएत युनियनमध्ये स्टॅलिन काळात लाखो लोकांची कत्तल झाली हे

आपणास ठाऊकच असेल. आणि चीनमध्येही तोच प्रकार झालेला आहे. हुकूमशाही राजवट ही काही गोष्टी साध्य मानत असते. त्या निर्माण करण्यासाठी कुठलीही किंमत द्यावी लागली तरी ती किंमत फारशी नाही अशी तिची श्रद्धा असते. आजपर्यंत कुठलाही डिक्टेटर निःस्वार्थ बुद्धीने वागल्याचे उदाहरण नाही पण डिक्टेटरशिपचं खरं स्वरूप असं आहे की माणसांची मनं संपूर्णपणे मरून जातात. आपणाला हा थोडासाच अनुभव आणिबाणीच्या १९ महिन्यांत आलेला आहे. टेलिव्हिजन आणि रेडिओ यांच्या-वरून सारखं सांगण्यात येत असे की अमुक अमक व्यक्ती म्हणजे देशाची रोशनी आहे. आणि त्या व्यक्तीने दिलेले काहीतरी पाच कलमी कार्यक्रम किंवा ४ कलमी कार्यक्रम हे अतिशय लोकांच्या हिताचे होते. त्याबद्दल मी थोडेसे पुढे बोलीन. हे जे कार्यक्रम आहेत त्यांना अतिशय मोठ्या प्रमाणावर पीछेहाट स्विकारावी लागली. कारण ते अतिशय चुकीच्या तऱ्हेने अंमलात आले होते. पण त्या वेळेला आपणाला असं दिसलं की दुसरा कुठलाही विचार लोकांपुढं जर आला नाही तर लोक असं मानायला लागतात की हाच एक विचार फक्त शक्य आहे. दुसरे असे की या हुकूमशाहीमध्ये राज्यकर्त्यांचीही चुकीची भावना होते. काही वेळेला राज्यकर्ते लोकांना फसवत असतात. पण पुढे राज्यकर्ते स्वतःच फसत असतात.

इंदिरा गांधीनी ज्या वेळी निवडणूक घेतली त्या वेळी त्यांची स्वतःची अशी फसगत झालेली होती. त्याच लोकांच्यापासून दूर पडलेल्या होत्या. या लोकशाहीकरताच मुळी स्वातंत्र्य आलं. लोकशाही म्हणजे फक्त निवडणूक असा त्याचा अर्थ नाही. लोकशाहीत सामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे. आणि तो जर न्याय मिळायचा असला तर सामाजिक न्याय हे तत्त्व आपण अतिशय दृढपणे स्वीकारलं पाहिजे. आणि याची जाणीव

आपल्या राज्यघटनेमध्ये अतिशय समर्थपणे आहे. ही राज्यघटना फक्त आहे त्या परिस्थितीत चालविणारी नाही. बाकीच्या राज्यघटना ज्या झाल्या – अमेरिकेची राज्यघटना काय किंवा ऑस्ट्रेलियाची राज्यघटना काय – या राज्यघटनांमध्ये आपणाला असं दिसतं की सरकार कसं चालावं, सरकारवर कुठली बंधनं असावी यांचा ऊहापोह या राज्यघटनांत आहे. इतर राज्यघटना-मध्ये समाजाची जी असलेली मूल्ये असतात त्यांचं रक्षण केलं जातं. पण भारतीय समाज कसा होता ? जातींवर आधारलेला समाज. निरनिराळ्या धर्मांचे लोक एकत्र रहात आहेत – कोणी एकमेकाचा दुस्वास करत आहेत असा समाज, भोळ्या समजुती, गंडेदोरे, ताईत यांच्या अंधश्रद्धेने पोसलेला समाज. तेव्हा या समाजाला बदलण्यासाठी ही राज्यघटना आहे आणि या परिवर्तनाच्या दिशा या घटनेत अतिशय स्पष्टपणे मांडलेल्या आहेत. आर्थिक न्याय पाहिजे होता आणि म्हणून मालमत्तेच्या अधिकारांवर बंधनं घालण्यात आली. कुळकायदे झाले, शेती बद्दल अनेक कायदे झाले. कोणी किती शेती ठेवावी याच्यावर मर्यादा लादण्यात आल्या, हे सगळे कायदे जर आपण पाहिले तर याच्या मागे मालमत्तेच्या न्याय्य वाटपाची भूमिका आहे. आर्थिक पुनर्रचना फार मोठ्या प्रमाणावर करावी लागणार होती. अगदी घटना समितीच्या चर्चेपासून असं दिसतं की या प्रश्नावर खूप तीव्र मतभेद काँग्रेसपक्षामध्ये सुद्धा होते. आपल्याला माहीतच आहे की काँग्रेसपक्षामध्ये नेहमीच डावे आणि उजवे एकत्र रहात आलेले आहेत. आणि डावे आणि उजवे एकत्र रहात असल्याने त्या सगळ्यांना घेऊन काही तडजोडी करून हा काँग्रेसपक्ष पुढे जात असे. घटना समितीत ज्यावेळी मालमत्तेच्या अधिकारावर चर्चा झाली त्यावेळेला आपणाला असे दिसते की दोन विचार पुढे आले. एका विचारा-प्रमाणे मालमत्ता सरकारने फक्त पूर्ण नुकसान भरपाई देऊनच

घेतली पाहिजे. तर दुसऱ्या विचाराप्रमाणे नुकसान भरपाई किती असावी हे ठरविण्याचा अधिकार संसदेला असायला हवा. ती ठरवताना सामाजिक, आर्थिक प्रश्नांचा विचार व्हावा. दुसऱ्या मताचा विजय झाला. त्यात जे संदेह मूळ घटनेत राहिले ते पुढे घटना दुरुस्ती करून काढण्यात आले. आर्थिक पुनर्रचनेचे उद्दिष्ट घटनेच्या २९ व्या कलमात स्पष्ट आहे.

इथें अस्पृश्यता होती. ती अस्पृश्यता जावी असं संविधानात स्पष्टपणे म्हटलं आहे. इथें कायद्यापुढे सगळे समान. म्हणून इथे Right to Equality ज्याला म्हणतात तो समानतेचा हक्क हा लोकांना देण्यात आला. आता इथे प्रश्न असा आहे की जर लोक सगळे सामाजिकदृष्टया समान असले तरच त्या कायद्याचा समानतेला काही तरी अर्थ असतो. पण इथं हा समाजच अतिशय एका मोठ्या विषमतेवर आधारलेला होता आणि म्हणून ही विषमता जर घालवायची असेल तर कायद्याने काही तरी करावे लागेल. म्हणजे इथं पहिल्या प्रथमच नवीन समाज निर्माण करायचा. ही जी नवीन मूल्ये आहेत, त्याच्यावर श्रद्धा असलेला समाज निर्माण करावयाचा. आणि मग त्यांना ते खरे न्यायाचे अधिकार मिळतील. पाश्चिमात्य देशाची नुसती तुलना जर करत राहिलो तर आपली वंचना होते. कारण पाश्चिमात्य देशासारखा नागरिक भारतामध्ये नाही. भारताचा नागरिक अत्यंत सहनशील होता. अन्यायाविरुद्ध त्यांने कधी ब्रही काढलेला नव्हता. त्याला जागा करायचा होता. त्याला शिकवायचं होतं की न्याय मिळवायचा असतो. ज्या जुन्या श्रद्धा होत्या त्या घालवायच्या होत्या. त्याच्यासाठी नवीन लोकशाहीशी सुसंगत अशा श्रद्धा निर्माण करायच्या होत्या. दैववादामुळे लोक आपल्यावरचा अन्याय सहन करीत. या जन्मी मला त्रास होत आहे. पुढच्या जन्मी मला चांगला जन्म येईल म्हणून या जन्मी जी पिळवणूक

आहे, जे शोषण आहे ते सहन करीन. लोकशाही हे पुनर्जन्माचें तत्त्व मानत नाही. लोकशाहीत या जन्मात त्या माणसाला न्याय मिळाला पाहिजे. आणि याच जन्मात न्याय मिळविण्याकरिता या राज्यघटनेने त्याला काही अधिकार दिलेले आहेत तेव्हा जी नवीन मूल्यपद्धती आहे ती या राज्यघटनेत दिलेली आहे. राज्यघटनेत धर्मस्वातंत्र्य दिलेले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपला धर्म पाळावा. धर्माबद्दलचं स्वातंत्र्य आहे. पण या धर्माच्या स्वातंत्र्यावर शासनाला अनेक मर्यादा लादता येतात. आणि मुख्य म्हणजे समाज सुधारण्यासाठी ज्या मर्यादा लादायच्या असतील त्या लादायचा अधिकार शासनाला दिलेला आहे. उदा. हिंदू देवालयें ही फक्त अमुकच जातीच्या लोकांसाठी असावीत किंवा अमुक जातीच्या लोकाना त्याच्यातून मज्जाव असावा असं जर कोण धर्माच्या नावानं म्हणायला लागेल तर ते भारतीय राज्यघटनेला खपणार नाही. म्हणजे इथं आपणाला असं दिसतं की इथे धर्माचं स्वातंत्र्य तर दिलेलं आहे. पण धर्माच्या स्वातंत्र्याची व्याप्ती, त्याच्या ज्या मर्यादा आहेत त्यांत काहीतरी नवीन घडविण्याचा प्रयत्न संविधान, राज्यघटना करते आहे. आणि ही क्रांती आहे. या परिवर्तनाच्या दिशा आहेत. परिवर्तन असं व्हावं की नवीन समाजाजी उभारणी इथं व्हावी. त्यांच्याकरिता कायदे केले जावेत, आणि ते लोकशाही मार्गाने व्हावेत. हे कुठेच घडलेले नाही. दुसऱ्या महा युद्धानंतर अनेक देश स्वतंत्र झाले. आशिया मधले स्वतंत्र झाले. आफ्रिकेमधले स्वतंत्र झाले. भारत हाच एक देश असा आहे की जेथे लोकशाही राहिली आहे बाकी सगळीकडची सरकारं सैन्याच्या हुकूमशाहीखाली आलेली आहेत. काही ठिकाणी निरनिराळ्या तऱ्हेच्या हुकुमशाही आलेल्या आहेत. इथल्या लोकशाहीवर काही वेळा संकटं आली, काही वेळा तिचा संकोच झाला. पण इथली लोकशाही शाबूत राहिलेली आहे. ही फार मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. कारण इथं सामाजिक परिवर्तन हे लोकशाहीच्या मार्गाने

होणार आहे. संविधानाच्या मार्गाने करायचा प्रयत्न आपण केला. आता संविधान हे लिहिलेलं असतं. लोकांच्या आकांक्षा, अपेक्षा पुऱ्या करण्यासाठी ते सिद्ध असते, हे जर आपण मान्य केलं तर या संविधानात वारंवार बदल हे व्हावेच लागतात. कुठलाही कायदा हा अपरिवर्तनीय असू शकत नाही. कायद्यात सारखे बदल व्हावे लागतात. तेव्हा या संविधानात सुद्धा बदल व्हावे लागतात. आपली घटना गेल्या ३० वर्षांत ४४ वेळा दुरुस्त करण्यात आली. आता या ४४ दुरुस्त्यांना घाबरून जाण्याचे कारण नाही. अमेरिकेत २०० वर्षात फक्त २० दुरुस्त्या झाल्या. आपल्याकडे मात्र ४४ दुरुस्त्या फक्त ३० वर्षांत झाल्या. या ज्या ४४ दुरुस्त्या आहेत त्याच्यातील अनेक दुरुस्त्या या तपशीलाच्या दुरुस्त्या आहेत. आपली घटना जी आहे ती अमेरिकेच्या घटनेसारखी नाही. अमेरिकेची घटना आपल्या घटनेच्या एका प्रकरणा एवढी आहे. कारण आपल्या राज्यघटनेत अनेक गोष्टींचा तपशील लिहिलेला आहे. आपल्या राज्याच्या मर्यादा कशा असाव्यात, राज्याचा भूप्रदेश कोणता असावा या सगळ्या गोष्टी आपल्या राज्यघटनेत लिहिलेल्या आहेत. अमेरिकेच्या राज्यघटनेत असं काही लिहिलेलं नाही. आता जी राज्यघटना अतिशय तपशील-वार असते त्याच्यात थोडा जरी बदल झाला तरी ती दुरुस्त करावी लागते. भारताने गोवा मिळविला. राज्यघटना दुरुस्ती झाली. पांडेचरी आले – राज्यघटनेत दुरुस्ती झाली. अशा क्षुल्लक दुरुस्त्या बऱ्याच झालेल्या आहेत. त्या मुळे या दुरुस्त्यांच्या आक-ड्यावरून आपण पाहिलं तर असं वाटतं की इतक्या दुरुस्त्या झाल्या. फार महत्त्वाच्या दुरुस्त्या ज्या झाल्या आहेत त्या फक्त थोड्याच आहेत. ३-४ च आहेत. आणि त्यांच्या बाबतीत दोन कालखंड आहेत. ज्या मुख्य दुरूस्त्या १९७१ पर्यंत झाल्या. त्या मालमत्तेच्या अधि-काराबातच्या होत्या. कारण मालमत्तेच्या अधिकाराबाबत न्यायालयांनी एक विशिष्ट भूमिका घेतली – की नुकसान भर-

पाई दिली पाहिजे – ती बाजारभावाने दिली पाहिजे. तेव्हा त्या न्यायालयीन निर्णयावर मात करण्याकरीता काही दुरूस्त्या करण्यात आल्या. त्या दुरूस्त्यांच्या बाबतीत जनमत अनुकूल होतं. नेहरूंच्या काळात बऱ्याच दुरूस्त्या झाल्या. १७ दुरूस्त्या नेहरूंच्या काळात झालेल्या आहेत. आणि इंदिरा गांधींनी १९७१ साली २४, २५, २६ अशा अनेक दुरूस्त्या केल्या. या दुरुस्त्यांचं प्रमाण मात्र आणिबाणीमध्ये फार वाढलं. आणिबाणीमध्ये भारताची कार्यक्षमता खूप वाढलेली होती असं आपण ऐकलेलं असेल, लोक रांगेमध्ये उभे रहायला लागले, ऑफिसमध्ये वेळेवर जायला लागले वगैरे. भारताच्या लोकांना रांगेत उभे राहण्यासाठी जर आणिबाणी आणावी लागत असेल तर ते अतिशय भयावह आहे. असे मला स्वतःला वाटते पण त्यावेळी आमची पार्लमेंट सुद्धा अतिशय कार्यक्षम झालेली होती. आपणाला असं दिसतं की पार्लमेंटमध्ये वारंवार लोक अडथळे आणतात. काम होत नाही. आता काँग्रेसचे लोक ही पूर्वी विरोधक वागत तसेच वागत आहेत. परवाच मी श्री. अच्युतराव पटवर्धन यांचे एक व्याख्यान वाचत होतो. त्याच्यात शेवटी त्यांनी असं सांगितलय की आजचा विरोधी पक्ष उद्या जर राज्यावर आला तर लोकांना असं दिसून येईल कीं त्यांचा तोंडवळा आजच्या अधिकाररूढ पक्षाशी ती दोन जुळी भावंड आहेत. इतका मिळता जुळता आहे. आणिबाणीमध्ये मात्र हे काही होत नसे. आणिबाणीमध्ये बिल आणलं रे आणल की लोक हात वर करीत आणि ते पास करून टाकत. त्यामुळे या ज्या घटना दुरुस्त्या झाल्या त्या अतिशय वेगाने झाल्या आणि त्यांनी घटनेची जी काही थोडीशी मोडतोड केली त्या घटना दुरुस्ती बाबत आमचा आक्षेप निश्चित आहे. कारण ३८ न्या घटना दुरुस्तीपासून फक्त १९ महिन्यांत ३८, ३९, ४०, ४१ आणि ४२ अशा पाच दुरुस्त्या झाल्या. आणि ६ वी एक दुरुस्ती लोकसभेने पास केलेली होती

पण राज्यसभेकडे ती गेली नाही. कारण त्या दुरुस्तीचा आशय असा होता की पंतप्रधानांनी पंतप्रधान असताना कुठलाही गुन्हा केला तर त्यांच्यावर कुठलाही खटला भरण्यात येऊ नये. ही दुरुस्ती लोकसभेने पास केलेली होती पण तेवढ्यात सुप्रीम कोर्टाचा निर्णय आला. इंदिरा गांधींच्या खटल्यात त्यांच्या पूर्वीची घटना दुरुस्ती रद्द बातल ठरली. त्यामुळे त्यावेळचे कायदामंत्री श्री. हरिभाऊ गोखले यांना असं वाटलं की आता आपण जर अशी घटना दुरुस्ती आणली तर कदाचित सर्वोच्च न्यायालयात पुन्हा ती रद्द बातल करील म्हणून आपण थोडा वेळ थांबूया. म्हणून ती घटना दुरुस्ती आली नाही. घटना दुरुस्तीच्या प्रक्रियेबद्दल आक्षेप असण्याचे कारण नाही. पण ज्या पद्धतीनं या घटना दुरुस्त्या झालेल्या होत्या त्याच्या बद्दल लोकांचा आक्षेप असणे साहजिक आहे. आपणाला माहित असेल की अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरविली त्याच्या विरुद्धचं अपील सुप्रीम कोर्टात खोळंबलं होतं. न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांनी एक निर्णय दिलेला होता त्या प्रमाणे इंदिरा गांधींना पंतप्रधान पदावर रहाता येत होतं फक्त लोकसभेत त्यांना मतदान करता येत नव्हतं. पण अपीलाची तारीख जवळ येत होती त्या वेळेला एक ३९ वी घटना दुरुस्ती पार्लमेंट मध्ये आली. या दुरुस्तीत असं म्हटलं होतं की कुठल्याही न्यायालयाचा निर्णय काय वाटेल तो असो, पंतप्रधानाची निवडणूक ही वैधच राहील. आता अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले होते की ती अवैध आहे. आणि ही घटना दुरुस्ती अशी की त्याच्यात असं म्हटलं होतं की हा न्यायालयीय निर्णयच मुळी रद्द करण्यात येत आहे. आणि ही निवडणूक वैध आहे. आताही जी दुरुस्ती आली तिची गंमत अशी आहे की ही ८ ऑगस्टला लोकसभेत आली; ८ ऑगस्टला लोकसभेनं पास केली. ९ ऑगस्टला राज्यसभेनं पास केली, १० ऑगस्टला ८ राज्यांच्या

विधान सभांनी तिला अनुमती दिली आणि ११ ऑगस्टला राष्ट्रपतींनी त्याला आपली मान्यता दिली. कारण १२ ऑगस्टला सुप्रीम कोर्टात हे अपील येणार होतं. ज्या घाईने या घटना दुरुस्त्या झाल्या तिच्यामुळे या घटनेचा अतिशय तोल ढळलेला आहे. आम्ही घटना दुरुस्तीवर टीका करत होतो त्यावेळी आम्ही एक गोष्ट मान्य करीत होतो. की या घटनेत परिवर्तन होणं अतिशय आवश्यक आहे. संसदेला या घटना दुरुस्त करण्याचा अधिकारही असायला पाहिजे. प्रश्न हा फक्त आता असा आहे की या घटना दुरुस्त कशा करता करायच्या तर ही घटना जास्त लोकाभिमुख करण्यासाठी. घटना लोकांना न्याय देणारी करण्या-साठी जर काही बदल करायचे असले तर ते करावेत. अधिकार शाहीचं समर्थन करण्यासाठी घटना दुरुस्ती नसावी. घटना दुरुस्ती ज्या मुळे घटनेचा तोल ढळेल, घटनेची काही मूलभूत तत्त्वे डावलली जातील अशी असू नये. उदा: घटना दुरुस्ती करून तिथला राष्ट्रपती हा फक्त हिंदूच असला पाहिजे. असं जर कोणी कलम आणलं तर ते आमच्या तत्त्वास विसंगत होईल. आणि म्हणून अशा तऱ्हेची घटना दुरुस्ती संसदेला आणता येऊ नये अशा प्रकारचा सर्वोच्च न्यायालयानं सुद्धा एक निर्णय दिला आहे.

तर या घटनेत हे जे बदल होत राहतात, मी मघाशी सांगितले तसे. आता पर्यंत ४४ दुरूस्त्या झालेल्या आहेत. त्यां पैकी बऱ्या-चशा दुरूस्त्यांचं समर्थन करता येईल आणि अगदी अपवादात्मक दुरुस्त्या ज्या आहेत. ज्या आणिबाणीत झाल्या त्यांच्याबद्दल असं म्हणता येईल की त्या दुरुस्त्या अतिशय घाईघाईने झालेल्या होत्या, त्यांच्यामागे पुरेसा विचार नव्हता. आता याचबरोबर मी असा एक विचार मांडणार आहे की या देशामध्ये सबंध कायदे जे आजपर्यंत केले गेले आहेत आणि सबंध घटना दुरुस्त्या

ज्या झालेल्या आहेत त्या कुणाच्याही मागे फारसा विचार आजपर्यंत कधी कोणी केलेला आहे हे दिसत नाही. इथे विचार करून कायदे कधीही केले गेले नाहीत ही माझी तक्रार आहे. ती मी थोडयाशा तपशीलाने पुढे मांडणार आहे. आता पहिल्यांदा गोष्ट अशी की आपल्यापुढे मी आता या राज्यघटनेचा एक ऐतिहासिक संदर्भ मांडला. त्याच्यानंतर मी आपल्याला असं ही सांगितलं की या राज्यघटनेत परिवर्तनाच्या दिशा सांगितल्या आहेत. सामाजिक न्याय वा व्यक्तीच स्वातंत्र्य असावं, इथे धर्मनिरपेक्ष असं राज्य निर्माण व्हावं, आधुनिक असं राज्य निर्माण व्हावं. या सगळया दिशा या घटनेत अतिशय स्पष्ट आहेत. आणि ही घटना गेली ३० वर्षे आपण राबवतो आहे. आता सद्य: परिस्थिती काय आहे याचा थोडक्यात आढावा घेऊन मग मी या पद्धतीतील दोष सांगणार आहे. आपल्याला असं दिसतं की राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अशा तीन पातळयांवरची ही क्रांती आपल्या घटनेने इथं आरंभलेली आहे. आज जर आपण पाहिलं की १९४८ साली आपण कुठं होतो आणि १९७८ साली कुठ आहोत तर आर्थिक बाबतीत आपण खूप प्रगती केलेली आहे हे निश्चित, तांत्रिक बाबतीतही आपली प्रगती आहे. तंत्रज्ञान आपल्याला फार चांगलं झालेलं आहे. आता न्यूक्लर (Nuclear) सायन्सही आपल्याला अवगत आहे. आणि शांततेसाठी आपण अणुशक्तीचा वापरही करणार आहोत. अणुबॉंब आपण करणार नाही असं आपण पुन्हा पुन्हा जाहीर केलेलं आहे. आणि मला वाटतं भारताची तशी इच्छा नसावी. तेव्हा तांत्रिक प्रगती आपण खूप केलेली आहे. औद्योगिक प्रगती आपण खूप केलेली आहे. भारताचा माल आता खूप बाजारपेठा काबीज करतो आहे उत्पादन वाढलेलं आहे पण हे सगळं झाल्यानंतरसुद्धा आर्थिक आणि सामाजिक क्रांती आपल्याला जी अभिप्रेत होती ती कितपत झाली आहे ? राजकीय क्रांतीच्या बाबतीत असं म्हणता

येईल की इथं मतदार आहे. तो डोळस झालेला आहे. तो जास्त चांगल्या प्रकारे मतदान करतो आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की निवडणुकींच्या राजकारणात संधी साधुपणाचं राजकारण गेल्या दहा वर्षात अतिशय फोफावलं आहे. पक्षांतराचा प्रश्न आपण बघतोच आहोत. अतिशय थोडक्या थोडक्या कारणाकरीता लोक पक्षांतर करतात. एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जातात. आणि जे पक्षांतर करीत नाहीत त्यांच्यावर पुष्कळदा आपण टीका करतो त्यांनी पक्षांतर केलयं, त्यांचा पक्षांतराचा रोख कसा आहे ? आपल्याला असं दिसलं की १९७७ साली इंदिरा गांधींचा पराभव झाल्याबरोबर कॉंग्रेस सोडून बाहेर लोक आले आणि काही महिन्यांतच पुन्हा इंदिरा गांधींच्या पक्षात जाऊन दाखल झाले. नेहरूंचं धोरण असं होतं की इथं सगळ्यांना बरोबर घेऊन पुढे जायचं. इथल्या विरोधी पक्षाला सुद्धा काही तरी थोडसं आपल्याला महत्त्व आहे असं वाटलं पाहिजे. म्हणून त्याला त्याच्यात सामावून घ्यायचं. लोकांना बरोबर घेऊन जाण्याचं राजकारण ज्याला आम्ही Consensus चं राजकारण असं म्हणतो. सर्वांना संमत असं राजकारण नेहरू करत असत. १९६९ पासून याच्यात बदल झाला. कारण जुने जें कॉंग्रेसचे लोक होते त्यांनी इंदिरा गांधींना अडथळे करावयास सुरवात केली. पण झालं काय की त्यानंतर पक्षात जे लोक आले ते जुन्या निष्ठेचे लोक आले नाहीत. आणि नवीन राजकारणाला तिथूनच सुरवात झालेली आहे. संधीसाधूपणाचं राजकारण हे सन १९६९ पासून अतिशय जोमानं इथं सुरू झालं आणि आज आपल्याला दिसते जी जनतापक्षातील भांडणे आहेत त्याचीही तीच परिणती आहे. आज कुठलाही पक्ष असा एकसंघ राहिलेला नाही. कॉंग्रेसमध्यें युतीबद्दल चर्चा चालू आहे पण आज युती होते उद्या युती होत नाही. अशा तऱ्हेची परिस्थिती आहे. इंदिरा कॉंग्रेसमध्यें सुद्धा निरनिराळे

विचारप्रवाह आज असल्याचे दिसतात. जुनी काँग्रेस जी आहे ती पुन्हा नेटाने उभे राहण्याचा प्रयत्न करते आहे. आज तरी तिचं भवितव्य काहीच सांगता येत नाही. जुने पक्ष अस्तंगत झालेले आहेत. अतिशय अनिश्चितीचं असं वातावरण आहे. राष्ट्रीय-दृष्टचा अतिशय अनिश्चिततेचा हा काळ की ज्याच्यामुळे भारतीय लोकशाहीचं भवितव्य काही थोडसं शंकास्पद वाटावं; त्याच्या बद्दल थोडोशी भीती वाटावी. दुसऱ्या बाजूला आपणाला असं दिसतं की जातीचं राजकारण अतिशय मोठ्या प्रमाणावर वाढलेलं आहे. जात निरपेक्ष, धर्म निरपेक्ष-तेच्या आपण गोष्टी बोलतो पण इथे सगळ्या बाबतींत जातीचं राजकारण आणि जातीसाठी अनुनय करणं आणि धर्मासाठी अनुयायी करणं हे तर अतिशय मोठ्या प्रमाणात इथे वाढलेले आहे. निवडणूकीच्यासाठी उमेदवार निवडण्या पासून जातीचे राजकारण सुरु होतं ते थेट अगदी मंत्री म्हणून घेण्यापर्यंत चालतांना दिसतं तेव्हा एका बाजूला पक्ष फुटलेले आहेत त्याच्यात काही साधर्म्य नाही. दुसऱ्या बाजूला असं दिसतं की जातीच राजकारण. मताचा अधिकार अतिशय महत्त्वाचा आहे पण मताच्या अधिकाराचा जातीच्या तत्त्वावर वापर व्हावा याच्यासाठीच प्रयत्न फार मोठ्या प्रमाणात चालू आहेत. प्रत्यक्षात श्रीमंत जास्त श्रीमंत झालेले आहेत. गरीब जास्त गरीब झालेले आहेत. पूर्वी होती त्याच्यापेक्षा विषमता वाढलेली आहे. आणि सामाजिक बाबतीत जर जास्त भयावह अशी परिस्थिती आहे. सामाजिक परिस्थितीची परिणती राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत होती. इथल्या लोकशाही मूल्याबद्दलची निष्ठाच काही कमी होतेय. आपण काही वेळेला अतिशय भाबडे-पणाने म्हणातो की १९७७ साली मतदारांनी लोकशाहीच्या बाजूने कौल दिला वगैरे वगैरे. खरं सांगायच तर इतकं सोपं ते नाही. हा कौल लोकशाहीच्या बाजूने आहे का लोकांना एक राजवट

नको होती तिच्या विरुद्ध तिने दिलेला कौल आहे ? लोकशाही मूल्ये लोकांपर्यंत पोहोचली आहेत का याचा जर आपण शोध घ्यायला लागलो तर आपल्याला असं दिसतं की सामाजिक बाबतीत तर आपण जास्त मागे गेलो आहोत. सामाजिक बाबतीतला ज्यावेळी आपण विचार करतो त्यावेळी राजा राममोहन रॉयांपासून ते म. जोतिबा फुल्यांपर्यंत, नंतर म. गांधी पर्यंत झालेली जी सामाजिक क्रांती असते तिचा विचार करतो. त्या क्रांतीच्या बाबतीत कुठली भावना होती ? फुल्यांनी ज्यावेळी प्रस्थापितांवर कोरडे ओढायला सुरवात केली त्यावेळी ते एका सामाजिक पद्धतीवर तुटून पडत असत. आणि आज आपल्याला असं दिसतंय की त्या सामाजिक पद्धतीवर कोरडे ओढायचे तर सोडा पण त्या सामाजिक पद्धतीचं आपण समर्थन करतो आहोत. धर्माच्या नावाखाली जुन्या अंधःश्रद्धा पुन्हा अतिशय मोठ्या प्रमाणावर फोफावत आहेत. तुम्हाला धर्म पाळावयाचा असेल तर जरूर पाळा. आपल्या घरात जरूर पाळा पण प्रश्न असा आहे की सामाजिक वर्तणुकीवर जर त्या धर्माचा परिणाम होत असेल तर तेथं धर्माला थोडासा पायबंद बसायला पाहिजे.

या देशातल्या कला काय, सिनेमा काय, नाटक काय यांना जर प्रचार करायचा असला, यांना जर काही करायचं असलं, लोकामध्ये नवीन मूल्ये घडवायची असली तर लोकांना दैववादावरून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न व्हायला पाहिजेत. ते लोकशिक्षण आहे. मध्यंतरी मी एक सिनेमा पाहिला, भयंकर सिनेमा की त्याच्यात काहीतरी शेवटी असं आहे की त्या गावावर पुराचं संकट येतं आणि कोणी म्हणतं पाटलाची सून ओली बाळंतीण असून तिला जर बळी दिलं तरच हा पूर ओसरेल आणि ती सून जाऊन आत्महत्या करते. आणि लोकसमुदाय तिला अतिशय साध्वी म्हणून थिएटरच्या बाहेर पडतो. मला असं वाटतं हे

तिशय चुकीचं आहे. त्या बाईनं आत्महत्या केली. त्याला एक कारची ग्लोरीफिकेशन दाखवितो. ही गोष्ट जुन्या अंधश्रद्धांना तपाणी देण्यासारखं आहे. आणि आज हा प्रकार अतिशय ोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. मोठे मोठे बाबा आहेत. गुरूंचं माण वाढलेलं आहे. मोठे मोठे श्रीमंत लोक अगदी ज्यांच्या रात रिफ्रेजिटर आणि टेलिव्हिजन असतो ते लोकसुद्धा या गळ्या गोष्टींच्या मागे असतात. माणूस आधुनिक बनलेला ाही. त्याने काही वागायच्या पद्धती घेतलेल्या आहेत. घरात अगदी सबंध अद्वितीय, आधुनिक सुसज्जता असते आणि माणसं विचारने अतिशय बुरसटलेल्या आणि जुन्या मताची असतात. मला परवा कुणीतरी सांगितलं की अमेरिकेत राहिलेले किंवा इंग्लंडमध्यं राहिलेले आपले लोक (तो मला अतिशय अभिमानाने सांगत होता) तिथं सुद्धा मुलांच्या मुंजी करतात आणि सगळे धर्मविधी बरोबर पार पाडतात. एवढच नाहीतर तिथं भटजी लोकांना अतिशय मोठी मागणी आहे. आता मला प्रश्न असा आहे जातिपद्धतीवर आधारलेल्या या समाजात खऱ्या अर्थाने जर क्रांती करायची असली तर जातीची जी जी सिंबॉल्स आहेत त्याच्यावर आपणाला तुटून पडायला पाहिजे. असं असताना ही माणसं परदेशात राहिलेली, इंग्रजी बोलणारी ही माणसं मात्र आपले सगळे जुने विचार तसेच्या तसेच ठेवतात. त्यांचे कपडे बदललेले असतात, त्यांचे आचार, विचार बदललेले असतात. चमच्याने ते खातात. हातांनी ते खात नाहीत. आणि तरीसुद्धा त्यांचे विचार मात्र अतिशय जुने असतात. जुन्या परंपरा जपणारे असतात. माझा परंपरेवर आक्षेप असा आहे की ज्या परंपरांमुळे भारताच्या सामाजिक परिवर्तनाला खीळ बसते त्या परंपरा आपण निश्चितपणे त्याज्य समजायला पाहिजेत आणि त्या त्याज्य करण्यासाठी सारखा प्रयत्न व्हायला पाहिजे. मला एक समजतं की एखादा साधा माणूस जर असं करत असेल तर ते

ठीक आहे. पण ज्यांनी लोकांच्या समोर आदर्श ठेवायचे त्यांनीच जर या गोष्टीचा पाठ पुरावा केला तर या समाजाला बदलणारे कोण ?

संसदेत राज्यघटना दुरूस्त करून न्यायालयावर आक्रमण केलं की आम्ही वकील लोक अगदी चिडतो. एखाद्या सरन्यायाधीशाचा जेष्ठताक्रम डावलला की लोकशाहीवर फारमोठा आघात झाला वगैरे वगैरे भाषणे सुरू होतात. पण गावामध्ये अस्पृश्यावर ज्या वेळी आत्याचार होतात त्या वेळी त्याच्याबद्दल निषेध करणारा त्याच्यासाठी कोर्टात जाऊन दाद मागणारा असा किती वकील वर्ग आम्ही निर्माण केला आहे? आणि याचं उत्तर जर द्यायचं असेल तर ते अतिशय नकारात्मक द्यावे लागेल. आणि म्हणून मला असं म्हणायच आहे की आपण राज्यघटनेचा विचार करतो तो फक्त शासन यंत्रणेचा करतो. राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या मूल्यांचा आपण अजिबात विचार करत नाही. म्हणून आजचे आपल्याला हे चित्र दिसतंय ते याच्यामुळे.

आता न्याय पद्धतीबद्दल मी थोडंसं बोलणार आहे. इथं कायदे चिक्कार झालेले आहेत. प्रश्न असा आहे की इतके कायदे केले जातात त्या कायद्याची कार्यवाही काय होते? हिंदूंचा एक कायदा झालेला आहे की हिंदू माणसाला दुसरा विवाह करता येत नाही. लोक नेहमी म्हणतात की मुसलमानांना चार बायका करता येतात पण हिंदूंना मात्र एकच करता येते. बंगलोरमध्ये मी मागच्या महिन्यात गेलो असतांना तिथे एका समाजशास्त्राच्या प्राध्यापकाने मला सांगितलं की त्यांनी एक सर्व्हे घेतला त्याच्यात त्यांना असं दिसलं की हिंदूमध्ये द्विभार्यांचे प्रमाण ४ ते ५ टक्के आहे आणि मुसलमानामध्ये ते ६ टक्के आहे. आता द्विभार्या प्रतिबंधक कायदा झाला म्हणून दुसरी बायको करायचं थांबलेलं

आहे असं नाही. कारण दुसरी बायको लोक करतात आणि न्यायालयें म्हणतात की दुसरा विवाह कायदेशीर असला तरच तो विवाह होतो. जर कायदेशीर नसला तर तो दुसरा विवाह होत नाही, म्हणजे गुन्हा घडला नाही. म्हणजे तो माणूस त्या बाईबरोबर चक्क नवरा म्हणून राहू शकतो. न्याया-लयाच्या दृष्टिकोनातून तो दुसरा विवाह होत नाही. लहानमुलां-च्या विावहाबद्दलही हेच म्हणता येईल. खेड्यापाड्यांत लहान मुलांची लग्नं होत आहेत. केवळ आपण कायदे करुन आपलं कर्तव्य संपलं असं मानलं तर हे परिवर्तन होणार आहे कां? तर हे कायदे नुसते करून भागणार नाहीत. या कायद्याच्या जोडीला या समाजाला सारखं काहीतरी सांगायला लागेल. हे कायदे जे झालेले आहेत त्यांचं पालन करायला पाहिजे. त्याच्यासाठी दोन गोष्टींची जरूरी आहे एक तर सारखं लोकशिक्षण व्हायला पाहिजे. होते काय तर फक्त कायदे होतात. त्या कायद्यांची कार्यवाही कोणीच करत नाही. अधिकाऱ्यापासून ते खालच्या माणसापर्यंत कोणीही कायद्याची कार्यवाही करीत नाही. कारण इथं कायद्याबद्दल नियोजन नावाची पद्धतच नाही. कायदे करायचे म्हणून करायचे. पुष्कळदा एखादी चळवळ उभी राहते. काही लोक म्हणतात हुंडा प्रतिबंधक कायदा करा. की आमचे राज्यकर्ते म्हणतात हुंडा प्रतिबंधक कायदा आम्ही करून टाकू. आणि ते कायदा करून मोकळे होतात. प्रश्न असा आहे की हुंडा घेणारा माणूस आणि देणारा माणूस दोघंही पोलीसाकडे जाणारे नाहीत आणि म्हणून हुंड्याचा कायदा हा फक्त कागदावर रहातो. कोणता माणूस जाऊन सांगेल हा माणूस हुंडा मागतोय म्हणून? त्याच्या त्या मुलीचं लग्न होणार नाही. नुसते कायदे करुन काय उपयोग आहे? आणि तोच प्रश्न बहुतेक कायद्याच्या बद्दलच आहे. इथें अनेक कायदे झालेले आहेत. पण या कायद्याबद्दलचे नियोजनच नाही. आपण आर्थिक नियोजन ऐकलं असेल जसे आर्थिक नियोजन

व्हायला पाहिजे तसेच कायद्याचेही नियोजन असावं लागतं. उदा:- लोकसंख्या वाढ रोखलीच पाहिजे. त्याच्यासाठी कायदेशीर उपायही करावे लागतात. फक्त ते कायदेशीर उपाय कसे करायचे, त्याची यंत्रणा काय असायची, ते कशातऱ्हेने अंमलात आणायचे याच्या मागं नियोजन लागतं. ते नियोजन इथं कधीही नव्हतं. आजपर्यंत नाही. आणि ते नियोजन असल्याशिवाय इथले कायदे यशस्वी होणार नाहीत. दुसरे असे की प्रस्थापितांच्या हिताचे कायदे असतात. त्यांचीच कार्यवाही होते, कारण ते कोर्टात जातात. गरिब माणूस कोर्टात जात नाही. आता इथं अनेक दिवस आम्ही ऐकतो की इथं कायद्यापुढे सगळे समान आहेत. पण कायद्यापुढे सगळे समान आहेत का? आमच्या घटनेमध्ये कलम आहे. कलम ३२. याच्यात असं म्हटल आहे की मूलभूत अधिकाराचा जर अधिक्षेप झाला तर कुणाही नागरिकाला सर्वोच्च न्यायालयाकडे जाऊन दाद मागता येते. पण कुणाला जाता येते सर्वोच्च न्यायालयात? जर एक दिवस वकीलाला उभं राहायचं असेल तर तो १६८० रु. घेतो. तेव्हा हा अधिकार कुणाला मिळालेला आहे? हा अधिकार ज्याला १६८० रु. देणे परवडते त्याला मिळालेला आहे. वर्गात सांगताना आम्ही मुलांना सांगतो – आम्हाला सांगावं लागतं – की हा अगदी मूलभूत अधिकार आहे. पण ती खरी परिस्थिती नाही. म्हणजे कायद्याची जी यंत्रणा आहे तीच मुळी सामान्य माणसाला मिळत नाही. मग या माणसांचा कायद्यावरचा विश्वास वाढावा कसा? आणि लोकशाहीवरची त्याची निष्ठा वाढावी कशी? लोकांना अन्न मिळालं पाहिजे, कपडा मिळाला पाहिजे, रोजगार मिळाला पाहिजे, त्याला वैद्यकीय मदत मिळाली पाहिजे. या साऱ्या कल्याणकारी राज्यात अतिशय मूलभूत अशा समजलेल्या गरजा आहेत. त्यांच्याच बरोबर लोकशाही सामाजात ही एक महत्वाची गरज आहे की कायद्याच्या अज्ञानामुळे आणि न्याय परवडत नाही म्हणून माणसाला

न्यायापासून आणि कायद्यापासून वंचित व्हावे लागू नये. आणि म्हणून इथं कायद्याची मदत सामान्य, गरिब माणसाला मिळाली पाहिजे असा आग्रह आज बरीच वर्षे आहे. पूर्वीच्या सरकारनं एक कमेटी नेमली होती. न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांच्या अध्य-क्षतेखाली कमेटी नेमली. न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांनी ४–६ महिने बरेच काम केलं. खूप लोकांच्या भेटी घेतल्या, खूप पुरावे जमा केले आणि मोठा रिपोर्ट तयार केला. तो रिपोर्ट तयार केल्यानंतर सरकारने सांगीतलं या रिपोर्टावर पुन्हा एकदा विचार करून त्याच्याबद्दल शिफारस देण्यासाठी आम्ही एक दुसरं मंडळ नेमतो. म्हणून त्यांनी न्यायमूर्ती भगवती आणि न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांची एक कमेटी नेमली न्यायमूर्ती भगवती आणि न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांनी पुन्हा त्याच्यावर सखोल विचार करून दुसरा रिपोर्ट दिला. तो रिपोर्ट आल्यावर सरकार म्हणालं आता हा रिपोर्ट आम्ही सेक्रेटरी लोकांकडे धाडतो. आणि सेक्रेटरी लोक याच्यावर विचारकरुन पुन्हा आपला अहवाल सादर करतील तो अहवाल अजून आलेला नाही. तर इथं सगळ्या चांगल्या योजना ह्या सरकारी दप्तरी अशा पडून रहातात. म्हणून या घटनेत बदल व्हायला पाहिजेत ते कशा तऱ्हेचे बदल व्हायला पाहिजेत की ही घटना जास्त लोकाभिमुख होईल. सामान्य माणसाला कायद्याची मदत मिळावी. मला आता सांगायला आनंद वाटतो की महाराष्ट्र सरकार गरजूंना कायद्याची मदत देण्यासाठी एक योजना करत आहे. ही मदत गरिबाना मिळावी वकिलांना मिळू नये. नाहीतर काय होईल ? गरिबांना मदत, या नावा–खाली चंगळ दुसऱ्या लोकांची होईल. केवळ मानधन देऊन हे काम होणार नाही. या योजनेवर श्रद्धा असणारा व त्याकरीता वेळ देऊ शकणारा कायदेतज्ञांचा वर्ग निर्माण झाला

पाहिजे. आज जे कायद्याचे शिक्षण देण्यात येते त्याच्यातच मुळी असा वकीलवर्ग निर्माण करण्याची क्षमता नाही. आजच्या कायदे शिक्षणातून फक्त तंत्रज्ञ निर्माण होतात. पैश्याकरता लढणारा माणूस आम्ही निर्माण करतो. पण या कायदेपद्धतीत काही अभिप्रेत अशी मूल्ये आहेत. त्या मूल्यांसाठी झगडणारा वकील वर्ग आम्ही निर्माण करतो आहोत का ? मघाशी मी म्हटलं तसं. सरन्यायाधीशाचा जेष्ठताक्रम डावलल्यामुळे अस्वस्थ होणारा वकील ठीक आहे. लोकशाहीत त्याची जरूरी असते. पण मुख्य म्हणजे इथं दलितांवर होणाऱ्या अत्याचारासाठी अस्वस्थ होणारा वकीलवर्ग आहे का ? गरिबांवर होणाऱ्या अन्यायाकरीता अस्वस्थ होऊन काही तरी संघटना उभारणारा वकीलवर्ग आहे का ? आमच्या कायदेशिक्षणात त्या नवीन समाजासाठी लागणाऱ्या मूल्यांचं शिक्षण नाही. आमचा तीन वर्षाचा अभ्यासक्रम बघा. त्या तीन वर्षाच्या अभ्यासक्रमात आपल्याला कुठं ही असं दिसत नाही की या बदलत्या समाजाचं जे चित्रं आहे ते त्याच्यात आहे, नवीन जमीन सुधारणा कायदे, झालेले आहेत. सेलिंगचा कायदा झालेला आहे. त्याच्याप्रमाणे मजुरांना लँडलेस लेबररना काही जमिनी द्यायच्या आहेत. त्याचा कुठेही उल्लेख आमच्या कायदेशिक्षणात नाही. अभ्यासक्रमातच नाही. तेव्हा जी कायद्याची मदत आहे. त्याच्यामागे अतिशय मोठ्या नियोजनाची आवश्यकता आहे. कारण हे जर नियोजन झालं नाही तर ही योजना फुकट जाईल.

**5 9 2 4 6 1**

आपल्याकडे एक प्रश्न फार मोठा आहे. तो प्रश्न म्हणजे भ्रष्टाचाराचा प्रश्न. त्याच्यावर मी अतिशय थोडंसं बोलून मग हे भाषण संपविणार आहे. फार लांबलेलं आहे. मी मघा म्हटलं तस चांगल्या योजना आपल्याकडे असतात. लिगलएडची योजना फार चांगली आहे. पण एखाद्या माणसाला आपण अधिकार

दिला की तो अधिकार कसा वापरतो यावर त्या योजनेचे यश अवलंबून असते. भाईबंदांसाठी, जातवाल्यांसाठी याचा वापर माणस सुरू करतात. भ्रष्टाचार हा आपल्या संस्कृतीतच आत-मध्ये दडलेला आहे. या भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी आपण प्रयत्न करतो. आपण कायदे करतो. कायदे पुन्हा पुन्हा नवीन करतो. पण त्याला यश येत नाही. कारण भ्रष्टाचार जो आहे तो अतिशय सूक्ष्म आहे. दिल्लीत मला असं सांगितलं. दिल्लीच्या सचिवालयात आपण जर गेलात – आणि मी दिल्लीचा उल्लेख करतो म्हणून आपण असं समजू नका की बाहेर बाकीच्या ठिकाणी हे प्रकार नाहीत – कारण भ्रष्टाचार हा प्रकार असा आहे की त्याच्याबद्दल इथं राष्ट्रीय एकात्मता आहे. – त्यामुळे आपल्याला दिसतं की दिल्लीच्या ऑफिसमध्ये आपण गेल्यानंतर तिथला माणूस काय म्हणतो ? "मेरे हाथमे क्या है ?" त्याला असं म्हणायचं असतं की माझ्या हातात काहीतरी दिल्याशिवाय तुझं काम होणार नाही. आणि हा अगदी सर्वसाधारण अनुभव आहे की कुणाकडे काहीतरी चिरीमिरी दिल्याशिवाय आपलं काम होत नाही. आणि ही अशा तऱ्हेची समजूत दृढ होणे म्हणजे लोकशाहीवरच्या श्रद्धेला फार मोठं भगदाड पडणं. कारण लोकशाही वरची श्रद्धा म्हणजे कायद्याचं राज्य या गोष्टीवरची श्रद्धा आहे.

शेवटी हे भाषण संपवायच्या आधी मला फ़क्त एक गोष्ट सांगा-वयाची आहे. की मी आता जे चित्र आपल्यापुढं उभं केल ते आपल्याला निराश करण्यासाठी उभं नाही केलं, मला एक सांगायचं होतं की शासनातर्फे अमूक व्हावं तमूक व्हावं हे सगळं ठीक आहे. पण शासन शेवटी आपल्या लोकांचे शासन असते. आणि सामान्य माणसाचं लोकशिक्षण केल्याशिवाय हे होणार नाही. म्हणून इथं 'पुनश्च हरि ओम्' असं टिळकांनी एकदा

म्हटलं होतं. तसच पुन्हा म्हणून आमच्या लोकांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून द्यायची–लोकशाही मूल्यांची जाणीव करून द्यायची – या सामाजिक परिवर्तनाबद्दलची त्यांच्यात अस्मिता निर्माण करायची हे कार्य फार मोठं आहे. हे कार्य केल्याशिवाय कुठलीही लोकशाही स्थिर होणार नाही. अमूक पक्ष लोकशाही आणतो, तमूक पक्ष लोकशाहीवर गदा आणतो हें चुकीचं आहे. भारताचा सामान्य नागरिक हाच इथल्या लोकशाहीचं रक्षण करणार आहे. तो नागरिक जर सुबुद्ध असेल, याची जर लोकशाहीवरची निष्ठा अतिशय ज्वलंत असेल तर इथली लोकशाही स्थिर राहील.

यायालये काय किंवा वृत्तपत्रे काय किंवा कुठलेही जे लोकशाहीचे ाधार स्तंभ आपण समजतो ते जर प्रखरपणे चांगले कार्य करीत ासतील तर त्याच्यामागे प्रभावी लोकमत असायला हवे. लोक-ाहीचा खरा आधार इथला सामान्य माणूस आहे, सामान्य ागरिक आहे. इंग्रजीत असं म्हटलं आहे की " We Mus ducate Our Masters " हा इथला खरा मालक आहे. त्यांनी ारताची राज्यघटना निर्माण केलेली आहे ' We the People oft dia ' या शब्दाने आपल्या घटनेची सुरवात होते. तेव्हा या णसाला शिक्षित करणं आणि या माणसाला उभं करणं हे तिशय जरूर आहे. मला एक अनुभव असा आहे की तो आणि-णीत अनुभव आलेला आहे. की या माणसाला जर बरोबर गोष्टी गितल्या तर हा माणूस उभा राहतो. हा काही मूल्यांकरिता ाडतो. असा या भारतातला नागरिक आहे म्हणूनच मी ाशी सांगितलं की इतर सगळ्या ठिकाणच्या लोकशाही पडत ाताना या देशात लोकशाही टिकून आहे. त्याचं श्रेय संसदेला ही की सर्वोच्चन्यायालयाला नाही. ते इथल्या सामान्य गसाला आहे आणि त्या सामान्य माणसाला शिक्षित करून

ोकशिक्षण हे फार मोठ्या प्रमाणावर दिलं तरच इथल्या राज्य-
टनेला काही अर्थ आहे, तरच इथल्या लोकशाहीला काही अर्थ
ाहे.

ाझं भाषण संपविण्याच्या पूर्वी मी आपल्या या नगरपालिकेचे
आभार मानतो. त्यांनी मला इथं येण्याची संधी दिली. आणि
आपण जवळ जवळ एका तासा पेक्षा ज्यास्त अतिशय शांतपणाने
भाषण ऐकून घेतलंत या बद्दल आपले सगळ्यांचे आभार मानून
मी माझं भाषण संपवितो.

सध्यंतर साठे

या व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषय :–

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष : पहिले | |
| १९ ७३ : | |
| श्री ।. देवदत्त दाभोळकर<br>प्रा चार्य,<br>फ र्युसन कॉलेज पुणे. | राजकारण आणि समाजजीवन |
| आ ामदार<br>म ा. पं. मंगुडकर<br>पु णे. | भारतीय समाजवाद कांही विचार |
| प्र ा गं. बा. सरदार<br>पु णे. | भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा |
| व र्ष : दुसरे | |
| १९७४ : | |
| ा. ए. एम्. खान<br>ी. शाहू मंदीर महाविद्यालय,<br>ुणे. | भारतीय लोकशाही : कांही विचार |
| श्री. वि. अ. नाईक<br>न्यायमूर्ती, पुणे. | लोकशाही समाजवाद |
| श्री. सदाशिव बगाईतकर<br>पुणे. | अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप |


| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष : तिसरे<br>१९७५ : | |
| **श्री. भा. शं भणगे**<br>प्राचार्य,<br>चिनाई कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड अिकॉनॉमिक्स, मुंबई. | आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग |
| **श्री. त्र्यं. कृ. टोपे**<br>कुलगुरु,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई | समाज सुधारणेच्या समस्या |
| **डॉ. प्र. चिं. शेजवलकर**<br>संचालक,<br>इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अॅन्ड रिसर्च, पुणे. | सद्यःस्थिती |
| वर्ष : चौथे<br>१९७६ : | |
| **श्री. गोपाळराव मयेकर**<br>माजी शिक्षण मंत्री, गोवा व प्राचार्य,<br>देवगड कॉलेज, देवगड. | भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग |
| प्रसिद्ध चरित्रकार<br>**पद्मभूषण धनंजय कीर**<br>मुंबई. | राजर्षी शाहू छत्रपती आणि नवभारताची मागणी |

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष सहावे<br>१९७८ : | |
| **डॉ. भालचंद्र फडके**<br>व्याख्याते<br>मराठी विभाग<br>पुणे विद्यापीठ, पुणे. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती |
| वर्ष सातवे :<br>१९७९ : | |
| **आमदार**<br>**पी. बी. साळुंखे**<br>कोल्हापूर. | महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे |
| **डॉ. सत्यरंजन साठे**<br>प्राचार्य,<br>लॉ कॉलेज, पुणे. | भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन |

आणि यंदाच्या ( १९८० ) व्याख्यानमालेत

| | |
|---|---|
| **डॉ. जनार्दन वाघमारे**<br>प्राचार्य,<br>राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर | महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण :<br>कालचे, आजचे व उद्याचे |
| **मा. श्री. प्रतापराव भोसले**<br>माजी राज्यमंत्री,<br>महाराष्ट्र राज्य. | शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान |

CH... TRAW... MUM...




प्रीतिसंगमावरील सांस्कृतिक केंद्र -- कऱ्हाड नगरपरिषद - नगरभवन व ग्रंथालय